म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ११७८.
११८६८

राष्ट्र ग्रंथालय संघ प्रकाशन

# ग्रंथपालनाचे आप्त

* * *

वा. पु. कोल्हटकर
बी. ए., बी. टी., डिप्. लिब्. (मद्रास)
ग्रंथपाल, महाराष्ट्र ग्रंथालय, पुणें

REFBK-0013810

१९६४

किंमत रु. २

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

১১৮৪

महाराष्ट्र ग्रंथालय संघ प्रकाशन

# ग्रंथपालनाचे आप्त

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३६८७१ वि: ...[illegible]
[illegible] ......११७४.... नों दि ...[illegible]

वा. पु. कोल्हटकर
बी. ए., बी. टी., डिप्. लिब्. ( मद्रास )
ग्रंथपाल, महाराष्ट्र ग्रंथालय, पुणें

REFBK-0013810

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. [illegible]
[illegible] शाखा (स्थळ प्रत)

किंमत रु. २

प्रकाशक—वा. दि. भट
कार्यवाह महाराष्ट्र ग्रंथालयसंघ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
नायगाव क्रॉसरोड, दादर, मुंबई १४.

सर्वाधिकार—लेखकाकडे.

आवृत्ति १ : १९६४.

मुद्रक—यशवंत जोशी बी. ए. ( ऑनर्स ),
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणे २.

# एका ज्येष्ठ आप्ताचा आशीर्वाद

श्री. वासुदेव पुरुषोत्तम कोल्हटकर बी. ए., बी. टी., डिप्. लिब्. (मद्रास-१९४२), ग्रंथपाल-महाराष्ट्र ग्रंथालय पुणें, हे स्वतः एक उत्तम ग्रंथपाल असून त्यांनीं प्रत्यक्ष ग्रंथपालाचें काम केलेल्या, ग्रंथालयांविषयीं आस्था बाळगून उत्तेजन देणाऱ्या आणि ग्रंथालयाच्या कामाचें दिग्दर्शन करविणाऱ्या, ग्रंथ-पालनाचें स्वयंप्रज्ञेनें शास्त्र निर्माण करणाऱ्या अशा एकूण दहा जणांचीं जीं स्वभावचित्रें वेळोवेळीं काढलीं त्यांना 'ग्रंथपालनाचे आप्त' असें नांव देऊन पुस्तकरूपानें हा एकत्र संग्रह केलेला आहे. त्या चित्रांचें अवलोकन करतांना ग्रंथालयाचें शास्त्र, ह्या शास्त्रांतील निष्णातांची होऊन गेलेली व चालू असलेली कामगिरी डोळ्यांपु उभी राहून ग्रंथालय आणि ग्रंथपाल यांच्या गुणकारित्वाचें ज्ञान सहज मिळतें. श्री. कोल्हटकरांच्या लेखनांत चटकदारपणाचा उत्तम गुण असल्यामुळें त्यांची या पुस्तकांतील विविध व्यक्तींच्या कामगिरीचीं वर्णनें वाचकांना चित्तवेधक वाटल्याशिवाय राहाणार नाहींत.

यांत आलेल्यांपैकीं अनेकांची अनेकांना ओळख असेल; परंतु त्यांची काम करण्याची हातोटी सर्वांनाच ठाऊक असण्याचा संभव नाहीं. त्या हातोटीचा परिचय प्रस्तुत पुस्तकाच्याद्वारें करून घेणाऱ्यांना. इच्छा असेल तर ग्रंथ, ग्रंथपाल, ग्रंथालययोजना आणि ग्रंथालयें यांच्या संबंधानें बहुमोल बोध मिळवतां येईल. ग्रंथ हें दैवत आणि ग्रंथपाल हा त्यांचा रखवालदार व पुजारी असा प्रकार निदर्शनास येऊन सामान्य ग्रंथसंग्राहक वाचकांना देखील ग्रंथांची काळजी कशी बाळगावी लागते याचीहि नीट कल्पना येईल. ग्रंथांचे व्यासंगी आपली ग्रंथसंपत्ति जपतात. अशा जपणुकींत ज्या उणीवा असतील त्या दूर करण्याला या पुस्त-काचा उपयोग होईल याबद्दल संशय नको.

ज्यांचीं शब्दचित्रें या पुस्तकांत आहेत, तें सर्व ग्रंथपालविषयक व्यवहा राच्या आघाडीवरील म्हणजे ग्रंथालयाच्या प्रारंभकाळांतील कामकरी असल्या-मुळें, ग्रंथालयांच्या प्रौढावस्थेचा काळ येईल तेव्हां ते लोकांच्या स्मरणांत राहतीलच, असा भरंवसा नाहीं. कदाचित् श्री. रंगनाथन्, श्री. पारखी,

श्री. शं. ग. दाते यांनीं जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांच्या योगानें त्यांचें स्मरण कांहीं काळ जीवंत राहण्याची शक्यता आहे. परंतु ग्रंथालयसेवक श्री. कुलकर्णी किंवा प्रा. नारळकर, श्री. वि. द. घाटे ( हे दोघे ग्रंथालयकार्यांच्या संदर्भात ) स्मरणीत्वाचे मानकरी कालान्तरानें राहातीलच याबद्दल वानवा वाटते. श्री. वा. पु. कोल्हटकर यांचें हें पुस्तक या विचारानुसार अतिशय महत्त्वाचें आहे.

महाविद्यालयांतून प्राध्यापक थोडे नसतात. ग्रंथालयें आज पुष्कळ आहेत व पुढें मोठ्या संख्येनें निघतील. म्हणून ग्रंथपालांचीहि संख्या वाढेल. त्यांच्या हाताखालचीं शिपायांपर्यंतचीं माणसें ग्रंथालयांतून वावरतील. परंतु ज्ञान-प्रसाराचें साधन म्हणून ग्रंथसंग्रहाला उत्तेजन देणारे प्राध्यापक किती सांपड-तील ? ग्रंथालयें म्हणजे ज्ञानोपासनेचीं पवित्र मंदिरें समजून तेथें येणारांचें यथाशक्ति समाधान करणारे ग्रंथपाल कितीसे आढळतील ? ग्रंथरूप दैवताची कोणत्याहि रीतीनें अवहेलना न व्हावी म्हणून कडक शिस्तीनें वागणारे ग्रंथालयाचे कनिष्ठ सेवकसुद्धां विरळाच दृष्टीस पडतील. विद्यापीठांतील, महा-विद्यालयांतील, किंबहुना प्राथमिक शाळांतील अशीं बहुविध ग्रंथालयें किती कडव्या खबरदारीनें जपायला पाहिजेत, याचे धडे श्री. कोल्हटरांच्या प्रस्तुत पुस्तकांतील प्रत्येक शब्दचित्रांत दिसतील. ते धडे कोणी ध्यानांत घेतील, कोणी घेणार नाहींत, परंतु श्री. कोल्हटकरांनीं वर म्हटल्याप्रमाणें ग्रंथालयाच्या पहिल्या मार्गदर्शकांना चिरस्थायित्व आणलें याचें मोल केव्हांहि अधिक वाटण्यासारखें आहे व यासाठींच ते महाराष्ट्राच्या धन्यवादास सदैव पात्र ठरतील असा विश्वास वाटतो.

मुंबई

**न. र. फाटक**
२६-१-६४

# लेखकाचें मनोगत

गुलगुल प्रेमालापांची गुंफण करणारें, सुकुमार तनुलतेचे मिष्ठास खुमासदारीनें वर्णन करणारें, योजनाबद्ध सुरगाठ-निरगाठ लक्षपूर्वक उकलणारें, फार तर मोर्चे-चढाया-लढाया-खणाखणी-शह-तह वगैरे सत्रांशें छप्पन्न तपशील मांडणारें तें वाङ्मय. ललितगुण त्याचेच ही आजवर समजूत दिसे. ही समजूत अजूनहि रेंगाळते आहेच. पण अलिकडे अदृष्टपूर्व अशा ग्रंथसूची, ग्रंथपालन, संदर्भ, विज्ञानें या नवनव्या विषयोपविषयांवरचें आणि ललितगुणांचेंहि लेखन होत आहे आणि प्रादेशिक वा वार्षिक साहित्यसंमेलनांमध्यें गुणज्ञ नि प्रोत्साहक अध्यक्षांकडून नवविषयांच्या नवीन कृतींचा उल्लेख होतो आहे. नवविषयांच्या लेखकांना हें निस्संशय आनंद नि हुरूप देणारें आहे.

मराठी साहित्यांत जे नवे प्रकार रुजत आहेत त्यांतलाच आमचा नवा विषय ग्रंथपालन हाहि आहे. या ग्रंथपालनाचा एकेक उपविषय तसाच त्याचा सर्वसामान्य प्रचार यांवर खूप लेखन हवें आहे. माझ्याबरोबरच या विषयांतले अनेक नवे—आजगांवकर, उजळंबकर, उमराणीकर, टिकेकर, दीक्षित, पेठे, महाजन, माहकळकर, कु. रानडे, रेगे, हिंगवे इत्यादि कांहीं ना कांहीं लिहीत आहेत. पूर्वी फक्त एक पारखी हें नांव होतें. आज हीं इतकीं आहेत. ही संख्या एकेक करीत इतकी वाढली. याचा केवढा तरी आनंद मला नेहमी वाटतो. कालगतींतच हें वाढलें. हें खरें. पण अशा वाढीमागें किमान चार दोन जण अत्यवश्य असतात. या अत्यवश्य आरंभिकांपैकीं मी एक होऊं शकलों याचा तर निरतिशय आनंद साहजिकच होतो.

पाश्चात्य देशांत अनेक वर्षें अनेक तंत्रांचा अनेक बाजूंनीं अनेकांकडून अनेक तऱ्हांनीं अभ्यास चाललेला आहे. या सर्व प्रयत्नांच्या मुळाशीं स्वतंत्रता आणि तिच्या पोटचीं समृद्धि हेंच बलवत्तर कारण आहे. परंतु आपणहि आतां स्वतंत्र झालों आहों. स्वातंत्र्य येण्याआधींच मुक्तद्वार ग्रंथालयांचा सार्वत्रिक आरंभ झाला व तें काम जोरावत चाललें आहे. त्यामुळें आपणहि उघड्या नजरेनें, शोधक बुद्धीनें व स्वयंप्रेरणेनें आपल्या तंत्रमंत्रांचा विचार

करूं लागलों आहों. या विचारांत केवळ तंत्राच्या चौकटींतील, गटांतील व भट्टींतील लेखनाची मजल अलिकडेच आपण ओलांडतों आहों. ती आत्तां-चींच. त्यांतच हें नवें, अगदी नव्या धर्तीचें पुस्तक मी ठेवतो आहे.

या माझ्या विषयाचें—व्यवसायाचें लेखन, अध्यापन, संघटन इत्यादि जें तें काम मी एकांडेपणानेंच करीत असतो—करीत आलो, असा माझ्यासाठी एक काळा रबरी शिक्का कोणीतरी करून ठेवलेला मला माहिती आहे. त्या माझ्यासारख्याला माझें ग्रंथपालनविषयाचें अत्यल्प असलें तरीहि वीसवर वर्षांवर अप्रतिहतपणें चाललेलें हें सर्व लेखन, अध्यापन, ग्रंथनिर्माण आमच्या ग्रंथालयजगतांतील सर्वसामान्य कनिष्ठ सहकाऱ्यांच्या माफक महत्त्वाकांक्षांमध्ये वसणाऱ्या किमान तीन आकड्यांतल्या कमाल वेतना-प्रमाणेंच सर्व बहुमोल वाटत आलें आणि निरंतर वाटेल. कारण एकांडेपणाचा अर्थ सिंग्युलॅरिटी -- सिंगल्नेस ऑफ् पर्पझ् हाच माझ्या बाबतींत पक्का ठरून गेला आहे. त्या काळ्या शिक्क्यामुळेंच निघालेला हा नवा शिक्का मात्र माझा स्वतःचा आहे. मीच तो स्वतः तयार केला आहे. त्याची शाई काळी नाहीं. ती अणूरेणूंत घरगुती, नैसर्गिक, स्वाभाविक आहे. दोन तपें ती टिकली आहे. त्यामुळेच यापुढेंहि ती काळाला पुरून टिकेल असें निर्वि-वादपणें वाटतें.

मराठी वाङ्मयांत मला शिरोधार्य वाटलेलीं अत्रे, श्री. वा. काळे, प्र. श्री. कोल्हटकर, न. वि. गाडगीळ, वि. द. घाटे, दि. वा. दिवेकर, व. शां. देसाई, नित्सुरे, पर्वते, ना. सी. फडके, के. वा. भोळे, मधुकर मंगरूळकर, लिमये या मानकऱ्यांची अर्घ्यप्रदान, ऋणानुबंधी, कलावंतांच्या सहवासांत, कांहीं म्हातारे व एक म्हातारी, जयां अंगीं मोठेंपण, दूर्वा आणि फुलें, मराठी माणसें मराठी मनें, महाराष्ट्राचे सुपुत्र, माझे समकालीन, मुजरे, रियाझ, संगीताचे मानकरी, सह्याद्रींचीं शिखरें, स्वभावचित्रें इत्यादि व्यक्तिचित्रपुस्तकें आहेत. त्यांत ही या आतांची भर अडगळ म्हणून टाकण्याची माझी किंचिन्मात्रहि इच्छा नाहीं. केवळ माझा विषय ग्रंथपालन, व्यवसाय ग्रंथपाल, वसणूक ग्रंथालय यांच्याकडे इतर सर्वसामान्यांचें लक्ष ओढण्यासाठी या आतांना आग्रहानें आमंत्रन संग्रहितो आहे. यांनीं व अशा सर्वांनीं ग्रंथपालनांत रंग आला तर मी धन्य होईन.

यांतील वर्णित विषयांमुळे ग्रंथालयांसंबंधीं, ग्रंथपालनासंबंधीं, ग्रंथपालांसंबंधीं, ग्रंथालयसंचालनासंबंधीं, ग्रंथालययोजनेसंबंधीं, ग्रंथलयांमधील दलित–गलित सम्मीलित–सेवकांसंबंधीं सर्व संबंधितांना म्हणजे शास्त्यांना नि शासितांना किमान अवश्य तो शोधबोध मिळावा असा माझा हेतू आहे. हा हेतू तशी व ती निकड असल्यामुळेच या आतांच्या ठायीं ओतप्रोत भरलेला आढळेल. तो अगदी शुद्ध आहे. त्यांतल्या अनेक गोष्टी निवड व निवळ करूनच योजल्या आहेत. माझ्या एका ज्येष्ठ, वरिष्ठ सुहृदानें एक अतिमोलाची सूचना दिली कीं, 'जरी खरें असलें तरी तें नेहमींच बोलून दाखवतां येत नाहीं.' व्यवहारवेदांतली ही एक अविस्मरणीय अमोल ऋचा आहे. प्रत्येकाला–मलाहि ती शिरोधार्य आहे. तीमुळेच मी अनेक तपशील निवडून व निवळून घेतांना कित्येक गाळले आहेत. हेतू एकच कीं जें मला अगदीं ठीक नाहीं असें वाटलें तें ठीक व्हावें. सर्वे सन्तु निरामयाः। यापरता अन्य कांहींहि हेतू नाहीं.

गेलीं वीसवर वर्षें विशेषानें आपल्या महाराष्ट्रांत ग्रंथपालनाविषयीं नैसर्गिक वा नकली आस्था सर्वत्र उत्पन्न झाल्याचें-लागल्याचें दिसत आहे. ही आस्था नैसर्गिक असेलहि. कारण आपल्या व्यवस्थेखालचें ग्रंथालय नीट सजावें, चालावें, त्याचा बोलबाला होऊन आपलें नांवहि इतरांमुखीं यावें असें चालकांना व सरकारलाहि वाटणें नैसर्गिक आहे. ही आस्था नकलीहि असेल. कारण सरकारनेंच या ज्ञानसाधनाचा साक्षात् योजनेनें पुरस्कार केल्यापासून सरकारपासून आपण दूर नाहीं हें दाखवण्याकरतां ती आस्था असेल. किंवा अलिकडेच मुख्यतः सरकारी योजनेनेंच ग्रंथालयांचा जो बोलबाला सुरू झाला आहे तो भरपूर गाजावाजांत, अर्थात् शक्य त्या काटकसरीनेंच, चालावा–वाढावा या हेतूनें असेल.

हेतू वा विचार कोणताहि असला तरी तो प्रत्यक्षांत येणार जाग्यावरच्या ग्रंथपालाच्याच द्वारें. आणि म्हणून ग्रंथपालाची जडण घडण कशी आहे, ती कोठें झालेली आहे याचा विचार, अद्यापिहि होत नाहीं तो प्रामुख्यानें झाला पाहिजे. ग्रंथालयांना म्हणजेच आमच्या ग्रंथपालन व्यवसायाला अलिकडे सरकारनें हात दिल्यामुळें व्यवसाय त्याच्या झुंझुरकाळांत आहे. या काळीं अळबत्ये-गलबत्ये, आमंत्रित-अनाहूत, अधिकारी-अनधिकारी, गवश्ये–

नवस्ये, यच्चयावत् सगळेजण आपलें सोळेंभांडें कोणी लपवून, कोणीं बगलेंत चुटपुरतें दिसतें ठेवून, कोणीं प्रकटपणें घेऊन पेशवाई पुण्यांत रमण्याकरता जमणाऱ्या वे. शा. सं. च्या चालीवर कोणीहि ग्रं. मा. ( म्हणजे ग्रंथपालन-मान्य ) वा ग्रं. प्र. ( ग्रंथपालन प्रशस्त ) यांच्या बरोबरच घुसत आहेत. ग्रंथालयमंदिरें स्थापन होऊन आतां नीट उभीं राहून चालत आहेत. ग्रंथालय-मंदिरें म्हटल्यावर आणि हा त्यांचा प्रभातकाळ म्हटल्यावर पंढरीसारख्या मंदिरांतील प्रभातींच्या काकडआरतीची आठवण हटकून होते. श्री पांडुरंगाच्या काकड आरतीला सोळे-ओळे, शुचिर्भूत-मुखमार्जनहि न केलेले, चांगले जागृत-डोळ्यावरची झोप न उडालेले, सनातनी-नवमते, तेलचंदनाचा सुगंध देणारे-( ! ) असे सर्व वर्णनांचे व वैचित्र्यांचे प्रभु-प्रसादेच्छू गर्दी करीत आहेत. त्या दृश्याची येथें आठवण होत आहे. अशा गर्दी-गल्लतींतून कोणीहि ग्रंथपाल बनून त्याच्या हातीं तो प्रभुप्रसाद म्हणजे ती दक्षिणा, ते मंत्रतंत्र, ती गादी नि ते उपभोग जाण्यापेक्षां सत्पात्र अशाच कोणाकडे हें सर्व जावें हें कोणा-सहि मान्य व्हावें. नाहींतर ? नाहींतर हें जेथें कोणी जाणत नाहीं तेथें ती गादी सर्वांगीं बोचूं लागते, ते उपभोग उरत नाहींत-असह्य भोग बनतात. सर्व सभोंवार कुरकुर, गुरगुर, बजबज, अस्ताव्यस्तता येते-वाढत वाढत अनिवार्य होते.

हें सर्व अन्योक्तीनें, अर्थांतरानें, उपमेनें पाहाता यावें या हेतूनें मी हे दहा आप्त सर्वांसमोर आणले आहेत. हे माझे आहेतच. पण मुख्यतः ग्रंथ-पालनाचे आहेत. ग्रंथपालन गेल्या वीस वर्षांत सतत नि सत्वर वाढत आहे. या काळांत माझ्या मनांत चाललेल्या व्यवसायाच्या चिंतनांत मी असतांना हे व असे कित्येक दिसले. मीं माझ्या बाजूनें ५० % व त्यांनीं त्यांच्या बाजूनेंहि शक्य त्या टक्केवारीनें असा एकमेकांशीं संबंध जुळवला. एकमेकांस अंतरंग दाखवलें. आम्ही असे जवळ आल्यामुळेंच मी त्यांना आप्त–ग्रंथपालनाचे आप्त म्हणत आलों.

आपल्या सभोवार पसरलेल्या विश्वाकडे आपलें नेहमींच नकळतसुद्धां लक्ष असतें. पण त्यांतहि विशेषानें माझें लक्ष माझ्या ग्रंथालयीन जगांतच घोटाळलेलें असतें आणि त्यांतहि त्यांतले माझे सगेसोयरे, मामक-प्रेमिक, स्नेही-संबंधी, वरिष्ठ-कनिष्ठ, सहचर-अनुचर, नातेवाईक-गोतेवाईक, हितरक्षक-हितनाशक अशीं

मंडळी माझें चित्त व्यापून टाकीत असतात. त्यांची विविधता, विपुलता नि चमत्कृति यांमुळें कित्येकदां मनांत नसलें, चित्त नको म्हणत असलें तरीहि त्यांच्याकडे तें वळतेंच. कारण या सगळ्यांना मी आप्त म्हणतों.

आप्त म्हणजे मिळवलेला, जोडलेला, बरोबरीचा, बरोबर असलेला-घेतलेला, बरोबरी करूं पाहाणारा नातेवाईक. उपकारानें, मोबदल्यानें, स्नेहानें, साह्यानें,विरोधानें, जिवाभावानें वा जन्मजात रक्ताच्या नात्यानें असंख्यजण आपण जोडतों वा आपणाशीं जोडले जातात. ही जोड कांहीं वेळां मानीव असते. कांहीं वेळा भक्तिभावाची असते. कांहीं वेळा विरोधाची-वितुष्टाचीहि असते. वर स्पष्ट केलेल्या अर्थानें वितुष्ट असलें तरी तें नातेंच, एका मार्गांत येणाऱ्यांचे संबंध जुळतेमिळतेच्च राहतील असा काय नेम सांगतां येतो ?

हे सर्व आप्त केव्हां आपणासन्निध असतात. केव्हां दुरूनहि भावभावनांनीं आपलें आप्तत्व ते पटवतात. आपणांस टाळणारे असतात, आपणांकडे वळणारे असतात. एकदिलानें खेळीमेळीनें वर्तणारे असतात. जीवनांत आमची निर्लेप जीत व्हावी असें इच्छिणारे असतात, आम्हांस फजित झाल्याचें पहाण्यास टपणारे असतात. हसणारे असतात, डसणारे असतात. रुसून दुरावणारे असतात, दुरून रुसवूं पाहाणारे असतात. जवळून बाजूस लोटणारे असतात, बाजूस असल्यास जवळ ओढणारे असतात. पाठ राखणारे असतात, पाठलाग करणारे असतात. वरिष्ठ असतात, कनिष्ठ असतात. खरे मित्र असतात, मुखवटे घेणारे अमित्रहि असतात. कोणी बांडगूळ, कोणी वटवाघूळ. कांहीं दिल्दार, कांहीं उरफाटे वेदरकार. असे तऱ्हातऱ्हांचे तऱ्हेवाईक नातेवाईक अनेक उदाहरणांत दिसून येतात.

संत तुकारामांनीं मानवी नात्यांविषयीं एक दुहेरी बाजूचा सिद्धांत मांडलेला आहे. त्यानुसार “ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी तो हृदयीं ” असे एक ज्येष्ठ वरिष्ठ सुहृद जसे मला भेटले तसेच “ निंदकाचें घर असावें शेजारीं ” याची महती प्रत्ययाला आणून देणारेहि जीवनांत आले. आपले दोष आपणास कसे दिसणार ? निंदकाच्या भिंगामुळेंच ते दिसतात. म्हणून तोहि आपला मार्गदर्शक, सुधारक आप्तच.

दैव म्हणजे आपला जीवनक्रम आपणास आपले आप्त देत असतो. त्यांच्यामधून आपण आपले नातेवाईक-गोतेवाईक इत्यादींस ओळखून वागावें लागतें.

ओळख पटल्यावर ती धरून चालावें लागतें. कारण आप्त आपणास हवे असतात. पण ते सभोवार येणें हें श्रीमंतीवर अवलंबून असतें. गरिबांजवळ आप्त म्हणून कोणी फिरकत नाहीं. आम्ही ग्रंथालयांमधले बहुतेक सगळे कामकरी गरीब आहोंत. धडपडत जगतो आहोंत. या धडपडींत आम्ही सर्वच ज्यांच्याशीं बोलत आलों, ज्यांना लिहीत-सांगत आलों, ज्यांचें ऐकत आलों, ज्यांच्या बरोबर वा विरोधानेंहि पण व्यवसायाचीं कामें करीत आलों, ज्यांच्या अडथळ्यांमुळें कुचंबलों-अचंबलों, ज्यांच्या शब्दस्पर्शानें सुखावलों, ज्यांच्या कृतीमुळे प्रगति जुळत गेली ते सगळे आप्त म्हणून संबोधले आहेत.

यांच्यापैकी अनेकांचीं चित्रें ती वहात्या काळामध्ये काढीत आलो. त्यांच्या पैकीं दहाच येथे आहेत. त्यांकडे पाहातांना मला एका विचारानें हसू येत आहे. गीतेचा आरंभ शरक्षेपणविषय म्हणून टाकलेल्या असंख्य आप्तांच्या दर्शनानें झालेला आहे. ती आठवण मला येथे होत आहे. परंतु अर्थातच त्याहून अगदीं उलट प्रकार या ग्रंथपालनाच्या आप्तांचा आहे. ते शरक्षेपणविषय नसून चित्ररेखनविषय आहेत. त्यांना शर मारायचे नाहींत. योग्य रंगच्छटांचे फरपाटे मारून त्यांचे रंग मनोवेधक नि मनोबोधक करावयाचे आहेत. हे रंग जसे ज्यांच्या ठायीं असतील तसे त्यांच्या पार्श्वभूमीसह उठणाऱ्या चित्रांमध्यें उतरावे हा माझा प्रामाणिक व मनःपूर्वक प्रयत्न आहे नि राहील. माझ्याबरोबरच माझ्याप्रमाणें अन्यहि कोणी अशीं चित्रें तुरळक काढण्यास सुरुवात केलेली आहे. या सर्वांमुळें आमचें ग्रंथपालनाचें साहित्य 'सुधीर ठेउनी उरांत । ठाम ध्येय धारणा' (विदाउट हेस्ट विदाउट रेस्ट, कीप दि मॉटो टु दाय ब्रेस्ट) वाढतें आहे. अशा आम्हां सर्वांच्या उद्योगानें 'अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत ह्या आशा' आणखी कालक्रमशः विस्तारत आहेत.

अशीं हीं वेळोवेळीं काढलेलीं आप्तचित्रें ग्रंथरूपांत सुचिर साकार करण्याची माझी कल्पना मी संघकार्यवाहांपुढें ठेवली. त्यांनीं क्षणभरच विचार करून आनंदानें व योजकतेनें बैठकींची व्यवस्था केली. त्यांवर ज्यांना ज्यांना आणून बसवता आलें त्यांचेंच दर्शन येथे होतें आहे. भावी काळांत याप्रमाणेंच व वर अर्थापन केल्याप्रमाणें अनेक आप्तमंडळींचीं चित्रें ग्रंथरूपांत ठेवतां येतील. हीं चित्रें रेखाटतांना–रंगवतांना मिळाल्या अवधींत व संभाळाव्या लागलेल्या

अवधानांत कांहीं फरपाटे नाजूक रीतीनें बसले नसतील. पण आज मी रडत-रखडत पोंचलेल्या वयाच्या, चुकत-माकत केलेल्या कामाच्या, जीवनजोष नि जिद्द यांच्या उसळीच्या अशा अवस्थेला पोचलो आहे कीं माझ्या हाताचे फटके लागलेसें कोणालाहि भासृ नये. आणि मुळांत ते फरपाटे अगदी शुद्ध मनानें नि हेतूनें मारले. तो कोणीहि फटका मानून घेऊं नये.

हीं सर्व चित्रें १९४५ मार्चपासून आज फेब्रुवारी १९६४ च्या दरम्यान केसरी, गर्जना, ग्रंथपाल, चित्रमयजगत्, तरुणभारत-नागपूर व पुणें, नवयुग, भारत, मनोहर, मराठा, मौज यांमध्ये त्यांनीं पुढे केलेल्या मोजमापांच्या चौकटींत बसवून दिलीं होतीं. त्या त्या वेळीं त्या त्या मान्यवर संपादकांनीं दिलेल्या प्रसिद्धी-प्रोत्साहनाबद्दल मी चिरऋणी आहे. हा संग्रह संघप्रकाशन म्हणून घेऊन माझें एक दीर्घवांछित पूर्ण करण्याबद्दल संघकार्यवाह श्री. भट आणि इतर पदाधिकारी यांचा मी अत्यंत आभारी आहे. छायाचित्रांच्या ठशांकामीं केसरी, मराठा, माझे ग्रंथपालनलेखकस्नेही-उपग्रंथालयाधिकारी श्री. उजळंबकर आणि विशेषानें सकाळ यांचें मोलाचें साह्य झालें आहे. हें ऋण या मंडळींनीं आणखी मागेन तेव्हां द्यावें असें म्हणतो. सर्वांत शेवटीं आमचे एक ज्येष्ठ ग्रंथपालनआप्त गुरुवर्य प्रा. न. र. फाटक यांनीं नेमकी वेळ साधून प्रस्तावनारूपांत जे आशीर्वाद दिले त्याचा विनम्र उल्लेख करून सर्वांना चित्रें पहाण्याची विनंती करतो.

५८० सदाशिव,
ब्रॅ. गाडगीळ रस्ता, पुणें २.
ता. २।२।६४

वा. पु. कोल्हटकर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| एका ज्येष्ठ आप्ताचा आशीर्वाद | तीन |
| लेखकाचें मनोगत | पांच |
| छायाचित्रें | |
| १ पद्मश्री डॉ. शि. रा. रंगनाथन् | १ |
| २ प्रा. ना. ग. नारळकर | १० |
| ३ प्रा. वि. द. घाटे | १८ |
| ४ श्री. पु. पां. गोखले | २५ |
| ५ श्री. र. श. पारखी | ३४ |
| ६ श्री. शं. ना. बर्वे | ४३ |
| ७ डॉ. पु. म. जोशी | ५१ |
| ८ श्री. शं. ग. दाते | ६२ |
| ९ श्री. वे. श्या. केशवन् | ७४ |
| १० कुळकर्णी म्हणजे ज. पं. मोंढे | ८२ |


* * *



१. डॉ. रंगनाथन्



२ नू. म. वि. चे प्रा. ना. ग. नारळकर



३ प्राचार्य वि. द. घाटे



४. पु. पां. गोखले



५. र. श. पारखी



६. शं. ना. बर्वे



७ राज्यदप्तरदार डॉ. पु. म. जोशी



८. ग्रंथसूचीकार शं. ग. दाते



९. पहिले राष्ट्रीय ग्रंथपाल केशवन



१०. शिपाई कुलकर्णी
( ज. पं. मोंढे )

अनुक्रम ३६८७९ दि:
क्रमांक ११८४ नों दि.
क्र. १२८१०

# १. ग्रंथपालनाचे अग्निहोत्री—

## ग्रंथपाल डॉ. रंगनाथन् पद्मश्री

झाले बहु, होतील बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा!

गेलीं सुमारें चाळीस वर्षें भारताच्या ग्रंथालयीन जीवनाला बहुमान्यता व सुप्रतिष्ठा प्राप्त करून देण्यांत मग्न असणाऱ्या, ग्रंथालयाच्या भूमी यूरप व अमेरिका यांमध्यें आदर व सन्मान मिळवणाऱ्या, इंग्रजी भाषेंतून ग्रंथपालनाच्या साहित्यांत विस्मयकारक भर घालणाऱ्या, साधें धोतर, साधा सदरा, क्वचित् एखादें उत्तरीय हाच पोषाख बहुधा नित्य परिधान करणाऱ्या आणि गुरुवर्य महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदारांप्रमाणें नित्य नियमानें भालप्रदेशावर गंध रेखणाऱ्या पहिल्या पद्मश्री ग्रंथपालाचें हें एक मूल्यमापन आहे.

आज असंख्य स्थळीं लहानलहान ग्रंथालयें निघालेलीं आहेत. मोठीं ग्रंथालयें आणखी मोठीं होत आहेत. प्रत्येक लहानशा स्थळीं कोणी तरी 'ग्रंथपाल' म्हणून प्रस्थापित होत आहेत. संख्येनें थोड्याच असणाऱ्या मोठाल्या स्थळीं कोणीतरी शिरून सुप्रतिष्ठित होत आहेत. इतकें हें काम आज फैलावलेलें, सवंग झालेलें आहे. पण चाळीस वर्षांपूर्वी विद्यापीठांमध्येंसुद्धां 'ग्रंथपाल' नसे. 'ग्रंथपाल' हा शब्दच अलिकडचा आहे. सन १९४०च्या सुमारास प्रा. चिं. वि. जोशी यांनीं 'नवा ग्रंथपाल' लोकांना दाखवला आणि मग हळूहळू 'ग्रंथपाल' माहिती होऊं लागला. पण १९२५ पावेतों 'ग्रंथपाल' नव्हताच. ग्रंथपालाची विद्येची यत्ता, पैशांमधली प्रतिष्ठा, किंचित्सुद्धां मानाची मोजणी यांविषयीं कोणत्याहि कल्पना प्रस्थापित नव्हत्या.

अशा काळीं सन १९२४ मध्यें मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजासारख्याच मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांतली गणिताची सुप्रतिष्ठित प्राध्यापकी सोडून एका अश्रुतपूर्व, अदृष्टपूर्व खुर्चीकडे बी. ए. मध्यें पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झालेले व गणित घेऊन एम्. ए. झाल्यावर गणिताचे प्राध्यापक असणारे रंगनाथन् वळले. त्यावेळीं ती प्राध्यापकी सोडण्यांत त्यांनीं केवढें धाडस केलें व धोका पत्करला तें आपोआप कळणार नाहीं.

बी. ए. ला इंग्रजी विषयांत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाल्यामुळें प्रा. रंगनाथन् उत्कृष्ट इंग्रजी बोलून गणितासारखा विषय मनोरंजक करणारे अशी ख्याति पावले होते. अध्यापनपटुत्वामुळे विद्यार्थ्यांमध्यें परम प्रिय झाले होते. त्यांच्यापुढें फार उज्ज्वल भविष्यकाळ हात जोडून उभा होता. पण तरीहि त्यांनीं ग्रंथपालन या नव्या, अजिबात रूढ नसलेल्या बहुतांस अज्ञात असलेल्या व्यवसायाकडे दुर्दम्य आत्मविश्वासानें, अज्ञात प्रदेश शोधण्याच्या कोलंबसाच्या प्रवृत्तीनें आपलीं पावलें वळवलीं. त्यावेळीं त्यांच्या अनेक जिवलगांनीं व नातलगांनीं त्यांना " ही काय नसती अवदसा आठवली ? गणिताच्या प्राध्यापकाची ही सुखाची नोकरी सोडतां ? हीं रुळलेलीं सुखं सोडण्यांत नक्कीच धोका पत्करता आहां. कुणीं हें मृगजळ दाखवलं तुम्हाला ? कीं आहेत त्या पदव्या कमी वाटून आणखी एक विलायती शेपूट लावून घ्यायचं एवढंच कांहीं आहे ? " अशीं असंख्य शेलकीं कुत्सावचनें ऐकवलीं. त्यांच्याकडे साभिप्राय कटाक्ष पुनः पुन्हा फेकले. पण त्यांनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. त्यांचें विद्याव्यसन त्यांनीं ग्रंथपालनावर केंद्रित केलें आणि भारतांतील ग्रंथपालनाचा द्रष्टा त्यांच्या रूपांत भारताला मिळाला. एक नवें शास्त्र फुलविण्याचें, प्रस्थापिण्याचें, भरदार करण्याचें कार्य ग्रंथपाल रंगनाथन् यांनीं अंगीकारलें व आजतागायत ते तें पार पाडीत आहेत. ह्या नव्या व्यवसायाकडे वळून त्यांनीं सुखासीन सरकारी नोकऱ्यासंबंधींच्या रूढ समजुतींस फार जोराचा धक्का दिला. जेव्हां व जेथे ग्रंथालयें, ग्रंथपालन, ग्रंथपाल यांच्यासंबंधीं कोणताहि विचार कोणाच्याहि मनांत आलेला नव्हता तेव्हां व तेथें त्यांनीं तो जोमांत रुजविला. यासंबंधीं असलेले विचार जेथे विपरीत दिसले तेथें ते कसे असणें अवश्य आहे हें त्यांनीं निर्भयपणें सांगितलें.

" ग्रंथालयें सर्वांकरतां आहेत. त्यांचा फायदा शक्य तें करून सर्व जनांस

मिळावा. त्यासाठीं तीं सदैव सुव्यवस्थित ठेवणें इष्ट आहे. शक्य तेवढा अधिक वेळ तीं उघडीं ठेवलीं पाहिजेत. ज्या स्थळीं अधिकांत अधिक वाचक नित्य क्रमानें गोळा होतात असेंच नगरांतील वा विद्यालयांतील स्थळ ग्रंथालयासाठी नियुक्त व्हावें. ग्रंथपाल हा फक्त देवघेवीच्या टेबलाशीं बसून मागितलेलें पुस्तक काढून देऊन त्याची बिनचूक नोंद करण्याइतपतच शिकलेला असणें अत्यंत चुकीचें आहे. त्याची शैक्षणिक यत्ता व आर्थिक दर्जा योग्य प्रमाणांत असणें, अत्यवश्य आहे. त्याचें मुख्य काम पुस्तकें जाग्यावर ठेवणें वा तेथून काढणें हें नसून अमक्या पुस्तकाचा नेमका उपयोग कोणता किंवा आमक्या अभ्यासकाला नेमकें उपयोगाचें पुस्तक कोणतें हें वाचकांस दाखवणें हें आहे. विविध विषयांचे चालू घडीपर्यंतचे संदर्भ शोधून अध्यापकांना, प्राध्यापकांना, कायदे मंडळांच्या लोकनेत्या सदस्यांना, लेखकांना वृत्तपत्रकारांना, व्याख्यात्यांना, संशोधकांना, व्यवसायकारांना देणें हें खऱ्या ग्रंथपालाचें आणि ग्रंथलयाचें काम आहे. ग्रंथालयांकरतां त्यांच्या उद्दिष्टांस धरून योग्य बांधणीच्या स्वतंत्र इमारतीच हव्यात. वाटेल ती इमारत नेमक्या व खऱ्या उपयोगाच्या दृष्टीनें तोटकी पडेल." इत्यादि तत्त्वें त्यांनीं शैलीदार वक्तृत्वानें, दीर्घानुभवाच्या अधिकारानें व अखंडित लेखनानें लोकांसमोर मांडलीं आहेत. हें ज्ञान देण्यासाठींच जणूं रंगनाथन् हे ग्रंथपालनाचे द्रष्टे आपणांत अवतीर्ण झाले आहेत. ज्ञान प्रसाराकरतां उच्च शिक्षण उपयोगिणारा, ग्रंथालयाचा अचूक उपयोग दाखवून देणारा, निदिध्यास घेऊन दीर्घकाळ कार्य करीत राहाणारा, ह्या व्यवसायाला सुप्रतिष्ठा प्राप्त करून देणारा एक असामान्य ज्ञानप्रसारक ग्रंथालयीन कार्यांत जागृति आणण्यासाठींच जणूं जन्म पावला आहे.

हें कार्य त्यांच्या बाळपणापासूनच त्यांच्या ठायीं बीजरूपांत वसत होतेंसें दिसतें. ग्रंथपाल ही उपाधी पैदा केल्यानें तें सुरू झालेलें नाहीं. शाळा कॉलेजांमधील विद्यार्थीदशेंत तसेंच अध्यापकीय पेशांत यशस्वी होण्यास अवश्य होणाऱ्या सर्व सिद्धी त्यांनीं अचूक आणि आवश्यक संदर्भवाचनानेंच हस्तगत केल्या. 'कुशाग्रबुद्धीचे विद्यार्थी', 'विद्यार्थीप्रिय प्राध्यापक' असा लौकिक त्यांस लाभला तो ग्रंथालयाचा योग्य उपयोग करण्याचें मर्म त्यांनीं प्रारंभींच जाणल्यामुळें व तें अंगीं बाणून घेतल्यामुळेंच.

मद्रास राज्यांतील तंजावर या इतिहासप्रसिद्ध शहराजवळच्या शियाळी

या गांवांत रंगनाथन् यांचा ९ ऑगस्ट १८९२ या दिवशीं जन्म झाला. १९०८ त ते प्रशालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. प्रशालेय जीवनांत प्रारंभापासून त्यांचा प्रथम क्रमांक अबाधित होता. महाविद्यालयांतहि त्यांनीं ती सर्वोच्च श्रेणी संभाळली. बी. ए. ला त्यांचा इंग्रजी वाङ्मय हा एक विषय होता. एम्. ए. ला त्यांनीं गणित हातांत घेतलें. त्या काळचे मद्रासकडील प्रसिद्ध गणित-प्राध्यापक ई. बी. रॉस यांचा या शिष्योत्तमावर अपार लोभ होता. १९१७ त ते एल टी. म्हणजे आपल्या इकडची बी. टी. ऊर्फ बी. एड्. परीक्षा उत्तम गुणांनीं उत्तीर्ण झाले. त्यांच्या मतानें महाविद्यालयांतील प्राध्यापकास त्याच्या विषयाचें भरीव, उच्चतम सर्व ज्ञान जसें अवश्यमेव हवेंच तसेंच त्याचे ठायीं अध्यापनपटुत्वाची पदवीहि हवी. त्या पदवीनें ते पूर्ण झाल्यानंतर त्यांची मद्रास विद्याखात्यानें प्राध्यापकांच्या रांगेत नियुक्ति केली. आपल्या प्राध्यापकीय कारकीर्दीत त्यांनीं आपलें अध्यापनपटुत्व जसें प्रगट केलें, तसेंच नकळत संदर्भमार्गदर्शन—कौशल्यहि कामीं आणलें. सर्वच विद्यार्थ्यांना व विशेषानें कमी बुद्धिमानाच्या विद्यार्थ्यांना त्यांनीं नेमकीं नि आवश्यक अशीं पुस्तकें दिलीं आणि परीक्षांमध्ये ते सर्व विद्यार्थी चमकले. तो त्यांचा प्रयोग कमालीचा यशोदायक ठरला. या प्रयोगामुळें असेल, त्यांस मद्रास विद्यापीठानें १९२४ त आपला ग्रंथपाल नेमून ग्रंथपालनाच्या अभ्यासाठी इंग्लंडला पाठवलें.

इंग्लंडमधील वर्षभराच्या वास्तव्यांत त्यांनीं ग्रंथालयव्यवस्थापन, त्याच्या विविध पद्धती, त्यांत साह्यकार असणाऱ्या वर्गीकरणाच्या व सूचीच्या पद्धती, त्यांमधील विशेष, तसेंच वैगुण्यें, त्या निर्दोष होण्यासाठीं जरूर असलेले बदल यांवर अविरत विचार केला. त्या अभ्यासांत व विचारांत मग्न असतांना आपल्या आयुष्याचा क्षण न् क्षण, अंगच्या उत्साहाचा लेशन् लेश ग्रंथपालनाच्या कारणीं लावण्याची उत्कट ध्येयभावना त्यांचे ठायीं एकरूप झाली. इंग्लंडांत असतांना वर्गीकरणाविषयींच्या कांहीं कल्पना त्यांच्या मनांत वेगानें वावरत होत्या. पण तेथें त्यांनीं आपला सर्व वेळ ग्रंथपालनाच्या नानाविध अभ्यासांत लावल्यामुळें त्या कल्पनांना मूर्तस्वरूप आलें नाहीं. विलायतेहून परत फिरल्यावर वाटेंत बोटीमध्ये मोकळा वेळ मिळतांच त्यांनीं आपल्या त्या कल्पना '**कोलन पद्धती**'च्या चिन्हांमध्यें सूत्रबद्ध केल्या. विलायत ते भारत या प्रवासांत उधळ्या दर्यावरील लाटांनीं हलविलेल्या बोटीच्या पाळण्यांत

त्यांच्या वर्गीकरण पद्धतीचें '**कोलन**' हें नामकरण झालें!

मद्रासला पोंचतांच त्यांनीं पुस्तकांच्या पर्वतप्राय ढिगांत बैठक मारली व 'कोलन' पद्धतीनें वर्गवारी करीत करीत तो ढीग हातावेगळा केला. प्रयोग कल्पनेबाहेर उपयुक्त ठरला. 'प्रत्येक वाचकाला त्याचें पुस्तक देणें' व 'प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक देणें' हे ग्रंथालयाचे व ग्रंथपालाचे मुख्य दोन हेतू त्यांनीं वर्गवारी करतांना व तीवरून सूची करतांना मनांत धरले होते. ते तंतोतंत साध्य होणार असें दिसलें आणि कालक्रमांत तें साध्य झालें असें प्रत्ययास आलें.

या बहुविध कामांमधून आलेले अनुभव व त्यांवरील चिंतनें यांस अगदी आरंभापासून आजपावेतों ते लेखरूप, ग्रंथरूप देत आले. त्यांचें एकूण ग्रंथालयीन साहित्य ज्या एका ग्रंथपालनमूलग्राही ग्रंथामधून क्रमशः विकास पावलें त्या पंचखंड प्रसिद्ध ग्रंथाचें नांव '**ग्रंथपालनाचीं पांच सूत्रें**' म्हणजे 'फाइव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स'. १९३१ मध्यें हा ग्रंथ प्रसिद्ध झाला व जगभर प्रख्याति पावला. तेथपासून गेल्या सुमारें तीन तपांत आपले अनुभव, निरीक्षण व प्रयोग यांवर आधारलेले एकंदर आडाखे ग्रंथरूपांत ते सुलभ करून ठेवीत आले. त्यांचीं '**ग्रंथपालनाचीं पांच सूत्रें**' वेदवाणी-प्रमाणें सांगत आहेत कीं 'प्रत्येक देशानें सर्व जनांकरतां ग्रंथालयें चालवलीं पाहिजेत'. **कोलन वर्गीकरण** म्हणतें 'सर्व ग्रंथसंग्रह या क्रमानें आपल्या कपाटांमध्यें किंवा शिडाळांमध्यें लावा म्हणजे कोणत्याहि वाचकाला त्यानें मागितलेलें पुस्तक मागताक्षणीं मिळेल'. कलकत्त्याच्या वाटेवर आगगाडींत लिहून झालेले '**विषयवार सूचीचे नियम**' कोणत्याहि क्षणीं मागणी आलेल्या पुस्तकाचा, त्याच्या लेखकाचा, ग्रंथांशाचा, मालेचा, अन्य नामाचा किंवा असाच कोणताहि पत्ता क्षणभरांत सांगतील. अलिबाबानें केलेल्या 'तिळा दार उघड' या मंत्रोच्चाराबरोबर जसें तें रत्नभांडार समोर खुलें होई तसेंच 'विषयावर सूची'चें कपाट उघडताक्षणीं ग्रंथपालासमोर वा अभ्यासकासमोर संपूर्ण वाङ्मयभांडार खुलें होतें. 'वर्गीकरणाचीं सूत्रें', 'संदर्भसाह्य', 'शालेय व महाविद्यालयीन ग्रंथालयें', 'ग्रंथालय जगाचा फेरफटका', 'ग्रंथालय कायदा' इत्यादि चाळीसवर पुस्तकें केवळ ग्रंथपालन याच विषयाचीं त्यांचीं प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं कांहींचीं मराठी, हिंदी, गुजराती भाषांतरेंहि

झालीं आहेत.

ते ग्रंथपाल झाले तो काळ इंग्रजीच्या व साहेबाच्या प्रभावाचा नि उसनवारीचा होता. सर्वच गोष्टी साहेबाकडच्या पहायच्या नि इकडे आणायच्या यांतच विक्रम असे. परंतु त्यांनीं इंग्रजीची अजिबात उसनवारी केली नाहीं. आयतीं इंग्रजी उपकरणें घेणें विनकष्टाचें नि सोपें होतें. परंतु त्यांची स्वतंत्र प्रज्ञा व सूक्ष्मावलोकन यांची झेप फार मोठी असल्यानें त्यांनीं सर्व गोष्टी भारतीय बनावटीच्या करून वापरांत आणल्या. सन १९२५ त त्यांनीं लंडन येथला ग्रंथपालनाचा अभ्यास क्रम पुरा केला तो प्रथम क्रमांकानें आणि स्वतःच्या ग्रंथपालनविषयक स्वयपूर्ण विचारांनीं तेथल्या प्राध्यापकांना स्तिमित करून. स्वतःची कोलन वर्गीकरण पद्धती इंग्रजी ए ते झेड् या मोठ्या व लहान अक्षरांवर बसविलेली असल्यानें ती भारताच्या नागरी लिपींत आणण्याची त्यांना फार वर्षें अडचण वाटली होती. एक राष्ट्राची, एक भाषेची त्यांना अतिशय तळमळ आहे. पण कोलन पद्धतीचें कांहीं जुळवतां येत नव्हतें. सानुस्वारांच्या उपयोगानें ती पद्धती नागरींत बसविण्याची चपखल युक्ति ग्रंथसूचीकार श्री. शं. ग. दाते यांनीं अकल्पितपणें शोधून दिल्याबरोबर " युरेका ! युरेका ! ऑल दि ऑनर टु दाते !—सांपडली ! युक्ति सांपडली ! दात्यांना शतधा धन्यवाद!!" असें मुक्तकंठानें प्रा. रावसाहेब रंगनाथन् म्हणाले. सन १९२५ पासून मद्रास इलाख्यांत त्यांनी चिकाटीनें चालविलेलें ग्रंथपालन कार्य पाहून तत्कालीन ब्रिटिश सरकारनें त्यांना रावसाहेब हा किताब दिला होता.

ग्रंथपालनावर त्यांनीं जें खरोखरी प्रचंड लेखन केलें आहे त्या लेखनाआधीं त्या विचारांचा सतत अध्यापनप्रयोग केलेला आहे. १९३० च्या आगेमागेपासून आजवर त्यांचें हें ग्रंथपालनाध्यापनकार्य अखंड चालू आहे. ज्ञानोपासनेची केवढी ही दीर्घ परंपरा ! वाचन, लेखन, चिंतन, अध्यापन ह्याशिवाय त्यांना दुसरें जीवनच नाहीं. ग्रंथपालनविचारांचें अग्निहोत्रच जणू त्यांनीं प्रज्वलित करून ठेवलें आहे ! ही तपश्चर्या नि अधिकार किती ग्रंथपालांचा आहे ?

त्यांनीं काय काय वाचलें असेल हें अजमावूं लागलों तर अचंबा वाटूं लागतो. त्यांची स्मरणशक्ती घट्ट आहे. संस्कृत, इंग्रजी, तामिळ वाङ्मयांतलीं रसमय स्थळें दृढ परिचित आहेत. रामायणांतले असंख्य हृद्य प्रसंग मुखोद्गत

आहेत. अनेक वेचक काव्यमय संदर्भवचनें सेवेस सतत सिद्ध आहेत. त्यांच्या प्रतिभेचा विहार व व्यासंगाची विशालता पाहून वाचक व श्रोते थक्क होतात. ते वाचतात केव्हां नि विचार तरी केव्हां करतात, हें एक जबरदस्त कोडें वाटतें. कारण चोवीस तासांपैकीं बराच काळ ते बोलतां बोलतां चालत किंवा चालतां चालतां बोलत असतांना आपणाजवळची असंख्यविध माहिती आपल्या अंतेवासीयांना देत असतात. पण कालिकांच्या संपादकांना त्यांचे लेख वेळच्या वेळीं पोंचतात. १९३१ पासून सुरू झालेलें त्यांचे ग्रंथनिर्माणकार्य बहुशः दर दीडदोन वर्षांनीं अगदी सहजपणानें व सकसतेनें चालू आहे. प्रत्येक लेखांत व ग्रंथांत त्यांचा खोल अभ्यास नि दूरस्पर्शी रसिक-मार्मिकदृष्टि दाखविणारे अनेक मनोरंजक संदर्भ जागोजाग आढळतात. त्यांच्या सर्वच लेखनांत जिवंतपणा व जिव्हाळा भरून राहिलेला असतो. कारण खुर्चीतल्या खुर्चींत बसून मिळणाऱ्या अनुभवाचें तें लेखन नाहीं. भारतभर घडत असणारें ग्रंथालयीन जीवन त्यांनीं कोठें घनिष्ट तर कोठें किमान स्पष्ट संबंध ठेवून जाणून घेतलेलें आहे. "ग्रंथालय अधिकअधिक लोकप्रिय व प्रभावी करण्यासाठीं तें व्यापक समाजजीवनाशीं अधिकाधिक समरस केलें पाहिजे." असें तें नेहमीं सांगतात. ते लिहितात तें बोलतात असें भासतें आणि त्याप्रमाणेंच बोलतात तें मनावर मनोहर परिणाम करीत ठसतें. त्यांचें भाषण काय किंवा लेखन काय व्यापक असूनहि प्रसन्न, ढंगदार असूनहि सोपें, साधें असूनहि खटकेबाज, तत्त्वविवेचक असूनहि गोड लागतें. गंभीर विषयांचा परामर्श घेतांनाहि नर्मविनोदाची पेरणी करणारें, तेजदार, धारदार, वेगवान तें असतें. त्यांच्या "ग्रंथपालनाचीं पांच सूत्रें" या ग्रंथराजांत त्यांच्या शैलीचे अनेक विशेष गोळा झालेले आहेत. त्यांत नाट्य आहे. प्रभावी व्याख्यान आहे. काव्य आहे. संवाद आहेत. आणि आपल्या संस्कृतीचा ठायीं ठायीं उच्चार नि आविष्कार आहे. ह्या ग्रंथाच्या बैठकींतून त्यांनीं ग्रंथपालनाचें सुंदर लेणें उभारलें आहे.

त्यांचें अखंड सेवाव्रत नीट समजावून घेतल्याखेरीज त्यांच्या कार्याचा नि द्रष्टेपणाचा बोधच होणार नाहीं. त्यांचें विद्वत्त्व ज्यांनीं जवळून अवलोकिलें आहे, त्यांचें वक्तृत्व ज्यांनीं ऐकलें आहे, त्यांचें दिगंतरींचें कर्तृत्व ज्यांना सुपरिचित आहे, त्यांच्या पायाशीं ज्यांना अध्यायक म्हणून बसतां आलें आहे, त्यांचें अंतेवासी प्रेम ज्यांनीं अनुभवलें आहे अशी मंडळी महाराष्ट्रांत

एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच कालपरवांपावेतों होती. अगदीं अलिकडेच पुण्याचे एक नवे ग्रंथपाल श्री. त्र्यं. ह. लागू हे बंगलोर येथे गुरुवर्य रंगनाथन् यांच्याजवळ एकदीड महिना राहून शिकून आले. ते त्यांच्या अनेक ताज्या व हृद्य हकिगती आणि आठवणी सांगतात. गुरुवर्य रंगनाथन् यांचें स्मरण होतांच पारखींसारखे चोखे शिष्य किती हेलावतात, कां सद्गदित होतात याची कल्पना इतर उतावळ्या उथळांना करून देणें कठिण आहे. हिंदुधर्मप्रचारक स्वामी विवेकानंदांप्रमाणेंच ग्रंथपालनप्रचारक म्हणून ग्रंथालयांच्या भूमीमध्यें म्हणजे युरोप अमेरिकेंतहि डॉ. रंगनाथन् लोकमान्य झाले आहेत. १९४६ मध्ये सर मॉरिस ग्वायर हे भारताचे सर्वोच्च न्यायाधीश व दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरु होते. त्या गुणज्ञ अधिकाऱ्यानें रंगनाथन् यांची योग्यता जाणून पंडित जवाहरलालजी व मौलाना आझाद यांच्याबरोबरच गुरुवर्य रंगनाथन् यांना लॉर्ड माउंटबाटन यांच्या हस्तें खास पदवीदान समारंभसमयीं डी. लिट्. ही बहुमानाची पदवी दिली.

युरोप अमेरिकेंत आणि इतिहासगत ब्रिटिश अधिकाऱ्यांना रावसाहेब डॉ. रंगनाथन् यांची खरी ओळख झाली. पण येथे भारतांत? त्यांची सुजाणपणें ओळख करून घेणारांप्रमाणेंच त्यांच्या कार्याविषयीं गैरसमज नि विपर्यास करणारे व अपसमज फैलावणारे आढळतात. त्यांच्या विचारांविषयीं, आचाराविषयीं, मतांविषयीं, आकांक्षांविषयीं, एकूण जीवनाविषयींच कुत्सेनें बोलणारे, त्यांचें नांव टाळण्याचेंच मनांत असणारे, पण तें टाळल्यास मत्सर नि क्षुद्रता उघडी होईल म्हणून वरवर चांगलें बोलण्याचें प्रदर्शन करणारे आढळतात. सगळ्या द्रष्टयांच्या व थोर पुरुषांच्या वाट्याला आलेलीच ही गोष्ट आहे. शास्त्रासंबंधीं मतभेद, सत्यासंबंधीं शंका, उपयुक्ताविषयीं अविश्वास हें सर्व पांचवीच्या दिवशींच पूजलें जातें. ग्रंथपालनांतील गोष्टी वेगळ्या कशा असतील? डॉ. रंगनाथन् यांची गोष्ट वेगळी नाहीं. अशा विरोधामधून, त्यांच्यासंबंधींच्या शंकाकुशंकांमधून त्यांच्या कार्याला जास्त उठाव मिळण्यासच साह्य होतें. त्यांचें जीवन नीट समजून घेतल्याखेरीज त्यांचें कार्य, त्यांचें सेवाव्रत कळणार नाहीं. स्वतःचे उद्योग सोडून दुसऱ्यांच्या कार्याविषयीं अपशब्द उच्चारण्यासाटीं त्यांनीं कधींहि तोंड उघडलेलें नाहीं. उलट त्यांच्या स्वतःसंबंधीं तसें बोलणारांमध्यें काय चांगलें आहे तें पाहून त्याचा उपयोग करावा असें ते

म्हणतात. त्यांचें ' ग्रंथपालनाचीं पांच सूत्रें ' प्रसिद्ध होऊन ख्याति पावल्यावर एकानें " पांचच का ? आम्ही दहा सांगतों " असें म्हणून चेष्टा करणारा एक संवाद लिहिला. त्याला उमज पडावा म्हणून नाट्यछटेच्या मर्मच्छेदक रूपांत मी त्याचें चरित्र–चित्र रंगवलें. पण गुरुवर्य रंगनाथन् म्हणाले, " त्यानें खोद-लेल्या गटाराचा उपयोग त्याचा त्यालाच लखलाभ होतो. गटारं उपयुक्तच आहेत. पण आपण मुद्दाम गटाराकडे धावूं नये. " असा उपदेश ते नेहमींच करीत आले. ते म्हणतात, " ग्रंथपालांनीं आपल्या उन्नत्तीचा प्रयत्न स्वतःच केला पाहिजे. इतर कोणी तपश्चर्या केल्यानें कांहीं मला मोक्षप्राप्ति व्हायची नाहीं. त्याप्रमाणेंच दुसऱ्यांच्या प्रयत्नांनीं ग्रंथपालांची खरी नि टिकाऊ उन्नति व्हायची नाहीं. " असे थोर ग्रंथपालनविचारवंत रंगनाथन् रामामृत शियाली-कर यांचें कार्य व गुण पाहून अलिकडे भारत सरकारनें त्यांना पद्मश्री हा किताब दिला आहे. पुण्यश्लोक सयाजीराव गायकवाडांनीं आपल्या बडोदें राज्यांत नमुन्याचें ग्रंथालय स्थापण्याचें व संचालनाचें कार्य केलें. त्यांच्या-मागून तसेंच किंबहुना कालक्रमांत त्याहूनहि फार मोठ्या प्रमाणावरचें कार्य डॉ. रंगनाथन् पद्मश्री यांनीं भारतभर केलें आहे व तें अजून सत्तरीच्या पुढेंहि चालूच आहे. म्हणून म्हणतो—

ग्रंथालयींच्या गणनाप्रसंगीं । कनिष्ठिकाधिष्ठित रंगनाथ ॥
अद्यापि तत्तुल्य कुणा अभावें । अनामिका सार्थवतीच राही ॥

* * *

# २. ग्रंथालयांची शक्ति आकळणारे–

## प्रा. नानासाहेब नारळकर

" ऑफ् हिम् वुई मे से जस्ट्‌ली हिअर बॉझ् वन्
हू न्यू ऑफ् मोस्ट थिंग्ज मोअर दॅन एनी आदर,
हू ल्व्हड् ऑल लर्निंग अंडर्नीथ दि सन्
अँड लुक्ड् ऑन एव्हरी लर्नर अॅज ए ब्रदर. "

काय योग तरी पाहा ! आम्हा विद्यार्थ्यांचे, ग्रंथपालांचे स्फूर्तिदाते गुरुवर्य नारायण गणेश म्हणजेच नानासाहेब नारळकर यांची मुलाखत घेऊन त्यांचें व्यक्तित्व व ग्रंथालयाशीं संबंधित कर्तृत्व यांवर प्रकाश टाकणारा लेख लिहा-वयाचा गेल्या सव्वा दीड तपाहून अधिक काळ मी संकल्प केला होता. परंतु त्या कामासाठीं सोईचा समयच सांपडला नाहीं. प्रथम प्रथम एवढ्या मोठ्या माणसाची मुलाखत घेण्याच्या दृष्टीनें मी अगदींच चिमुकला माणूस आहे अशी ठाम भीति व संकोच मला वाटे. पुढे त्यांच्यासारख्यांच्या आशीर्वादानें कांहीं पुण्य गाठीं जमूं लागून आपलें चिमुकलेंपण कमी होत चालल्याची कल्पना मनांत धीटपणानें उभी होऊं लागली. पण त्यावेळीं त्यांचा मुक्काम मुंबईमध्यें वेस्टर्न इंडिया हाउसच्या एका मजल्यावर होता. तेथवर सावकाशीनें आधीं टरवा-टरवीनें पुण्याहून मुद्दाम जाण्याइतकी उसंत नि मोकळीकच मला माझ्या प्रादेशिक ग्रंथालयामधील जिकीर नि फिकीर यांनीं गुंताळलेल्या पहिल्या अकरा बारा वर्षांच्या संपूर्ण जीवनांत आत्तांआत्तांपावेतों मिळूं शकली नाहीं. अलिकडे

ते पुण्यांत आल्याचें कळल्यावर मुलाखतीची कल्पना जोरावूं लागली. पण तेवढ्यांतच त्यांच्यावर अर्धांगाचा आघात झाल्याचें वृत्त एका सकाळीं वाचलें. तेव्हां त्यांना त्रास न व्हावा म्हणून पुन्हा ही माझी कल्पना माझ्या संकल्पितांच्या टाचणांच्या ढिगाऱ्यामध्यें मीं खुपसून ठेवली.

त्यानंतर कांहीं कालावधीनें ते पुनरपि पूर्ववत् झाले असें कोणीतरी सांगितलें आणि म्हणून त्यांच्या घरांत गुरुभेटीची उत्कंठा, त्यांच्या प्रकृतीविषयींची आशंका, अनेक वर्षांचें ईप्सित पुरें होणार याविषयीं आनंद नि आतुरता या भावना कोंदाटलेल्या मनःस्थितींत मीं पाऊल ठेवलें. समोरच ते होते. त्यांनीं डोळे स्थिर करून व हात हलवून मला जवळ येण्यास खुणावलें. एका क्षणांतच मला जाणीव झाली कीं ज्यांचें वर्णन मी " ग्रंथालयाची शक्ति आकळणारे सर्व शक्तिमान नारळकर " असें सार्थपणें करीत आलों ते गुरुवर्य प्राचार्य नारळकर अगदी पांगळेदुबळे होऊन पलंगावर पडलेले आहेत. आम्हा विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत नि हृदयांत कायम ठसलेली 'ही भव्य गुरुमूर्ति' विकलांग होऊन गेली आहे. जीवनांतील कमी अधिक तीन कर्तृत्वपूर्ण तपेंपावेतों ज्यांनीं आल्यागेल्या विद्यार्थ्याला, संघटकाला, व्यवसायनिमग्नाला हटकून उपयोगी होणारा व यश देणारा सल्ला दिला, प्रत्येकाला प्रोत्साहक व आशावर्धक वाणीनें सतत हुरूप दिला ती ढंगदार वाणी, ती भरदार तनु दुबळी बनून अत्यंत निरुपायाच्या असह्य अवस्थेनें अगतिकतेचें दुःख भोगत आहे. मला एकदम उमाळाच आला तें बघून. त्यांनीं नू. म. वि. चा निरोप घेतला तेव्हां त्यांच्यावर असंख्यांनीं गहिवरल्या आवाजांत स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. पण त्या धीरोदात्त मनाच्या पुरुषोत्तमाच्या वृत्ती अगदी अविचल होत्या. त्या स्तुतीचा नि गहिवराचा कसलाहि ढम्मसुद्धां परिणाम झाला नाहीं असें दाखवणारें त्यांचें तें निरोपाचें खंबीर, तोलदार, दिलखुलास भाषण मला आठवलें. त्या भाषणानें त्यांच्या उंचीची आम्ही मित्रांनीं मोजमापें काढण्याचा प्रयत्न केला होता तें आठवलें आणि आज जास्त कांहींच बोलवत नाहीं या जाणिवेचा भार बहुतेक मनावर येऊन त्यांनीं मान पलीकडे वळवली. तें माझ्या लक्षांत आलें आणि त्यामुळें मला खरोखर अनावर असा उमाळा आला. तीं दोनतीन मिनिटें दोघांनाहि जुन्या गोष्टींची जाणीव व आठव देणारीं होतीं. मनांतली कालवाकालव, निदान त्यांची तरी अधिक वाढूं नये म्हणून, मी आवरली व " नाना,

मला ओळखलंत ना ? " असें कांहीं बोललों. तों त्यांनीं तें माझें बोलणें मागील जुन्या काळाप्रमाणेंच पुरें होण्यापूर्वीच जणूं विनचूक अंदाजून, " ओळखलं. मला आठवण आहे. मी मधूनमधून तुमचं कांहीं वाचतों " अशा आशयाचें मनोगत खुणांनीं, डोळ्यांनीं व त्रुटित शब्दांनीं व्यक्त केलें.

मला १९४१ ची आठवण आली. मद्रासच्या ग्रंथपालनवर्गांत मला प्रवेश मिळाला होता. गुरुवर्य नानांनीं नू. म. वि. च्या ग्रंथालयावर रुपयांच्या सहस्रधारा धरल्याचें मी ऐकत होतों. माझे बालपणापासूनचे एक ज्येष्ठ स्नेही, राज्यसरकारचे निवृत्त उपग्रंथालयाधिपाल श्री. कृ. ग. भागवत यांस मुद्दाम कलकत्ता व मद्रास येथें पाठवून ग्रंथपालनाचीं मान्यतापत्रें घेण्याची संधि मुख्याध्यापक नारळकरांनीं दिली होती व नंतर शाळेचें ग्रंथालय आपल्या खास मार्गदर्शनानें त्यांच्या करवीं चालवलें होतें. इतर कोठेंहि, कोणत्याहि शाळेंत नसलेलें ग्रंथालयखातेंच नानांनीं नू. म. वि. मध्यें निर्माण केलें होतें. शाळेंतल्या अध्यापकांयोग्य, सर्वसामान्य विद्यार्थ्यांयोग्य, शाळेंत चालविलेल्या अनेकविध गुणविकासवर्गांयोग्य, शाळेशीं संबंधित असणाऱ्या बी. टी. कॉलेजच्या अध्यापन विद्यार्थ्यांयोग्य अशीं हजारों रुपयांचीं व हजारांच्या संख्येनें, आकर्षक वेष्टनांचीं, विवेचक गुणांचीं पुस्तकें–मासिकें इत्यादि ज्ञानसाधनें प्राचार्य नानांनीं ग्रंथालयांत गोळा केलीं. ग्रंथपाल श्री. भागवत यांच्या करवीं तीं सर्व दैनंदिन कामांत आणलीं. ग्रंथपालांच्या मदतीस ' राजाराम ' म्हणजे राजाराम बळवंत कोकाटे यांच्यासारखा बहुगुणी सहकारी आपल्या अचूक गुणपारखी नजरेनें हेरून ग्रंथालयाला दिला. आणि त्या दोघांवर आपला वरदहस्त धरला. आज त्यानंतरच्या वीसवर वर्षांमध्यें ग्रंथनिर्मितीचें प्रमाण खूप वाढलें आहे हें खरें असलें तरी त्या १९४० च्या आसपासच्या काळांतहि कांहीं कमी ग्रंथनिर्मिति नव्हती. नू. म. वि. च्या ग्रंथालयांत प्रत्येक महत्त्वाचें व मुलांना आवडणारें बारीकसारीकहि पुस्तक टिपून आणलें जात असे. " महिन्यांत किमान एक पुस्तक वाचा " असें वर्गावर्गांत जाऊन खुद्द नाना सांगत. ते स्वतः वर्गांमध्यें जाऊन मुलांना अनेक पुस्तकांची माहिती देऊन नंतर ग्रंथालयांत किती व कोण कोण मुलें मागणी करून गेलीं ही चौकशी नेहमीं करीत.

ग्रंथालयाला लागून असलेल्या लांब सज्जांत दुतर्फा व शाळेच्या चौकांत प्रवेशद्वारानजीकच डाव्या उजव्या हातांच्या भिंतींलगत विस्तीर्ण लांबीरुंदीचे प्रदर्शन-

फळे मुलांच्या डोळ्यांच्या पातळींत सहजगत्या येतील असे खिळवून घेतले. त्यांवर ग्रंथालयाद्वारें व कोणा सुबक अक्षराच्या निरलस अध्यापकांकडे तें काम सोपवून संकलित केलेली विविध माहिती कात्रणरूपांत, चित्ररूपांत, तक्त्यांत, प्रत्यक्ष वस्तुरूपांत किंवा सुरेख हस्तलेखनानें प्रदर्शित करण्याची दैनंदिन कार्यक्रमाची गोष्ट म्हणून त्यांनीं सुरू केली.

एवढ्या मोठ्या सव्वाशेंवर अध्यापक असणाऱ्या प्रशाळेंत रोज कोणी ना कोणी अध्यापक रजा घेणारच. ते न आल्यामुळें अध्यापकावांचून मोकळे रहाणारे वर्ग घेण्याचें काम अन्य शाळांप्रमाणेंच इतर अध्यापकांच्या गळ्यांत वास्तविक टाकलें जाणें अपरिहार्यच होतें. या कामाला ‘ चट ’ ही संज्ञा आहे. हें ‘ चटावरचें ’ काम अध्यापक मंडळींना बहुशः आवडत नाहीं. आणि चटावर जाणारे जर विद्यार्थ्यांना आवडणारे नसले, कंटाळवाण्या रीतींचे असले तर विद्यार्थ्यांनाहि तसल्या कामाविषयीं नाराजी वाटते.

नानांनीं एक अगदीं वेगळा प्रयोग केला. त्यांनीं यत्तावार त्या त्या यत्ते-योग्य रंजक, वेधक, वेचक अशा एकाच पुस्तकाच्या प्रत्येकी चाळीस प्रती, त्या काळीं प्रत्येक वर्गांत बहुशः चाळीस विद्यार्थीच असत त्या संख्येनुसार, खरीदून त्या एका एका पेटींत ठेवून दिल्या. अशा पंचवीस पेट्या होत्या. रजा असणाऱ्या अध्यापकाच्या मोकळ्या वर्गांत कोणातरी दुसऱ्या अध्यापकास पाठवून देण्यापेक्षां यांपैकी योग्य ती पेटी पाठवून देण्याची प्रथा सुरू केली. वेळापत्रकाप्रमाणें मोकळा वेळ उपभोगूं न देता अध्यापकाला त्याच्या मनाविरुद्ध एखाद्या वर्गांत जायला लावणें, त्या अध्यापकाला अप्रकटपणें चरफडावयास लावणारें असतें. याविषयीं त्याच शाळेंतला एक चुटका येथे सांगतों.

सुप्रसिद्ध प्राध्यापक डॉ. के. ना. वाटवे व श्री. मुकुंदराय मिरजकर यांची ही गोष्ट आहे. श्री. मिरजकरांना त्यांच्या वेळापत्रकांत पहिला तास मोकळा ठेवलेला असे. तो तास मोकळा ठेवण्यांत तत्कालीन मुख्यांचा निश्चित कांहीं हेतु आहे अशी श्री. मिरजकरांची खात्री होती. कारण बहुतेक प्रत्येक दिवशींच त्यांना चिठी येऊन चटावर रवाना व्हावें लागे. परंतु एक दिवस शाळेच्या वेळेपूर्वींच साधारणपणें त्यांना असा अंदाज आला कीं सर्व वर्ग ज्याअर्थीं शांत आहेत त्याअर्थीं सर्व अध्यापक उपस्थित असावे. थोड्याबहुत निश्चित मनानें त्यांनीं गळ्याभोंवतालचें उपरणें काढलें व तें पायांकडे फडकवून त्यांत आंतील

बाजूनें पाय अडकवून दुसरें टोक डोक्यावर लपेटून ते आराम करूं लागले. त्यांच्या बाजूसच त्यांचे सहाध्यापक गीर्वाणपंडित वाटवे बसलेले होते. श्री. मुकुंदरायांना कधीं नव्हे त्या आरामांत पहुडतांना पाहून ते शीघ्र उच्चारते झाले ' मुक्तो मुकुंदो यमराजवक्त्रात् । ' परंतु हा उद्‌गार पूर्ण होत आहे, नाहीं तोंच दारांतून हातांत एक चिठुरडें धरलेला शिपाई ' मिरज़कर सर ' म्हणून पुकारत शिरला आणि शीघ्रकवि मुकुंदराय यांनीं आधीं उच्चारल्या गेलेल्या शीघ्र कविता पंक्तीची पूर्ति ' पुनश्च तेलंगमुखे पपात ॥ ' अशी प्रमुख तेलंग याच्या नांवाचा उच्चार करून केली.

मानसशास्त्रज्ञ नारळकरांनीं ' चटपेट्या ' हा रूढ चटतासांच्या पद्धतीपेक्षा अगदी वेगळा प्रयोग केला. तो अध्यायकांप्रमाणेंच अध्यापकांनाहि अत्यंत स्वागतार्ह वाटला. अध्यापक नसतांनाहि दंग्याऐवजीं अध्यायक वाचनांत दंग आहेत हें दृश्य दिसूं लागलें. अध्यापकांच्या चरफडण्याऐवजीं त्यांचे ठायीं प्रसन्नता आली. या दृष्टींनीं नानांचा तो प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला. अर्थात् शाळेसाठीं नानाहस्तें पैसा गोळा करूं शकणाऱ्या केवळ नानांनाच तो खर्चाचा प्रयोग निभणारा नि शोभणारा होता. एकाच समयीं सबंध वर्गातल्या प्रत्येक अध्यायकाच्या हातांत एकाच मनोरंजक वाचनीयाच्या प्रती देऊन त्यांस अध्यापक उपस्थित नसतांहि वाचनमग्न ठेवणें ही एक करामत होती. अभूतपूर्व होती. तिचा उपयोग निर्विवादपणें चांगला झाला. मुलें त्या तासांत आपल्या पुस्तकांत बुडून गेलेलीं असत. शब्दोच्चारांचा गल्का नाहीं. शिट्ट्यांची चलाखी नाहीं. बाक वा भुई ठोकणें नाहीं. एकाचें दुसऱ्याच्या वाचनीयांत डोकावणें नाहीं. जो तो आपल्या वाचनांत एकतान. एकाहून जास्त पुस्तकांच्या प्रतींनीं हें जुळणारें नाहीं. एकाच पुस्तकाच्या सर्व प्रतींमुळेंच हें शिस्तबद्ध असें चटसमयींचें वाचन शक्य झालें. त्यामुळें मोकळ्या वेळाचा सदुपयोग होई. वाचनाच्या संवयीचीं व स्वयंशासनाचीं बीजें आपोआप पेरलीं जात.

या चटपेट्यांच्या वाचनसोयीप्रमाणेंच मधल्या सुटींत, शाळा सुटल्यानंतर, रविवारीं व अन्य सुट्यांच्या वारीं, दिवाळी–हिवाळी–उन्हाळी अशा दीर्घमुदतींच्या सुट्यांमध्यें, रोज किमान कांहीं वेळ ग्रंथालय उघडें राहून उपयोगिलें जावें असा नानांनीं परिपाठ पाडला. प्रत्येक यत्तेयोग्य तुकडीगणिक वर्ग ग्रंथालयेंहि होतींच व तीं उपयोगिलीं जात होतीं. इतर शाळांना अचंबा नि हेवा वाटावा

असे ग्रंथालयीन कार्यांचे व सेवेचे नाना उपक्रम नूतन मराठी विद्यालयामध्यें नानांनीं सतत व सलग सुरू केले. तत्कालीन ग्रंथपाल भागवत व साहाय्यक राजाराम यांनींहि ते उपक्रम राबवून सर्वप्रिय करण्यांत उत्तम साथ केली.

१९३६ त नानांनीं शाळेचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. आणि शाळेंत अगदीं नव्यानें किंवा ताज्यातवान्या बदलानें कित्येक उद्योग नि उपक्रम सुरू केले. त्या असंख्यविध उद्योगांत नि उपक्रमांत ग्रंथालयीन सेवेची सोय हा एक होता. हा उपक्रम इतर शाळाचालकांनीं कुतूहलानें, हेव्यानें व क्वचित् किंचित् शंकेनेंच ध्यानांत घेतला. नू. म. वि. च्या बालनगरानें मनःपूर्वक आदरिला. नानांनीं तो शाळेच्या वार्षिक अर्थ संकल्पांत व वेळापत्रकांतहि रुळवून टाकला.

प्राचार्य नारळकर हे उत्तम अध्यापक व वक्ते असल्यानें अनेक शहरीं त्यांना व्याख्यानांसाठीं, शिक्षणपरिषदांसाठीं, संमेलनांसाठीं निमंत्रिलें जाई. त्यानुसार ते जात तेथें तेथें आम्हा विद्यार्थीना अविस्मरणीय असणाऱ्या त्यांच्या त्या विशिष्ट आवाजांत व शैलींत संधि मिळेल ती ती साधून त्यांनीं ग्रंथालय-व्यवस्था व ग्रंथालयोपयोग यांवर विचार करण्याचें आवाहन इतर शाळा-चालकांस केलें.

हें सर्व इतरांप्रमाणेंच मी तीं चारपांच वर्षें ऐकत होतों. आणि त्या नू. म. वि. च्या प्रयोगभूमींत व गुरुवर्य नानांच्या ' हातीं घेतलेलें संकल्प तडीस नेणाऱ्या ' हातांखालीं काम मिळावें असें साहजिकच असंख्यांप्रमाणें इच्छीत होतों. म्हणून १९४१ च्या मेमध्यें मला मद्रासच्या ग्रंथपालनवर्गांत प्रवेश मिळाल्याचें वृत्त त्यांना सांगून त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठीं मी यांच्याकडे गेलों होतों. ती आज आठवण झाली. त्यावेळीं म्हणजे १९४१ मध्यें नू. म. वि. त मी गेल्यावेळीं हातांतलें काम त्यांनीं चटकन पुरें केलें व मला स्वतः ग्रंथालयांत नेऊन तेथले सगळे उपक्रम दाखवले. चालत असतांना त्यांची समज करून दिली. साहाय्यक राजाराम व इतरांची माहिती दिली. ग्रंथालयांत मुद्दाम खरीदलेलीं ग्रंथपालनाचीं पुस्तकें दाखवलीं व नंतर माझ्या पाठीवर आपला तो भरदार, प्रोत्साहक हात ठेवून " मद्रासला जरूर जाऊन या. आपले भागवत जाऊन आले आहेत. यंदाच मनू गर्दे आणि वसंता भागवत तिथें होते. तुमच्याबरोबरच बाळ हिंगवेहि येणार आहे ना ? एका नव्या अभ्यासा-

कडे वळतां आहा तुम्ही मंडळी हें खरोखरीच चांगलं आहे. जाऊन आल्यावर मला भेटाच" असें म्हटलें. आणि त्यानंतर मी यथाकाल मद्रासला जाऊन आलों. मला नू. म. वि. च्या ग्रंथालयाचेंच काम मिळालें. तेथलें काम नानांनीं मुद्दाम एकदां येऊन पाहिलें. ती सर्व आठवण आतां त्यांना पाहून जागी झाली.

शाळेमध्यें ग्रंथालय असतें, असावें हें अलिकडे १९६० नंतरहि दिसणारें जें थोडें तुरळक भरीव आणि बहुतांश पोकळ दृश्य आहे त्याची आदर्श सुरुवात प्रा. नारळकरांनीं पुण्यांत नूतन मराठी प्रशाळेमध्यें १९४० च्या आधींच केली. त्यांनीं केवळ हौस म्हणून ग्रंथादि वाचनीयें जमवलीं नाहींत. शाळेला डौलाची गोष्ट म्हणून खास शिक्षण देऊन ग्रंथपाल तयार करून आणले नाहींत. एकदांच बरीच ग्रंथखरेदी करून कपाटें भरून टाकलीं नि नंतर कांहीं खरेदी केली नाहीं असें केलें नाहीं. ग्रंथादि वाचनीयें सतत उपयोगांत ठेवण्याची सतत खटपट त्यांनीं केली. त्याविषयीं त्यांनीं जातीनें प्रचार केला. ग्रंथपालन वर्गांना, परिषदांना आपल्या येथील ग्रंथालयसेवकांना खर्च देऊन त्यांनीं प्रतिनिधी म्हणून पाठवलें. परिषदांत ग्रंथपालांनीं यथासमय, यथायोग्य भाग घ्यावा असें मार्गदर्शन केलें. त्याकाळीं त्यांनीं प्रचंड गाजावाजांत व अंतर्बाह्य आपुलकीच्या वातावरणांत पार पाडलेल्या संमेलनांमधील पालकदिनांमध्येंहि या कामाची महती सांगितली. स्वतःला जॉन डयूईचे शिष्य मानून एक शिक्षणतज्ञ व मुख्याध्यापक या नात्यांनीं 'ग्रंथालय' या विषयावर योग्य स्थळीं भाषणें केलीं. ग्रंथालयांत संदर्भ साह्याची अचूक व अमाप सोय केली व विश्वविध ज्ञान नि माहिती मुलांसमोर ठेवण्यासाठीं साधे फळे, काचेच्या दारांचे फळे इत्यादि अनेक प्रकारचें लाकडी कायम सामान हवें त्या मोजमापांचें नि गरजेनुरूप नव्यानें करून घेतलें आणि लोकांना त्या सर्वांची माहिती प्रसंग साधून करून दिली. त्या उंच मूर्तीनें, भरदार खांद्यांनीं, भव्य व्यक्तिमत्त्वानें व परमोदार हातांनीं ग्रंथालयाची शक्ति नेमकी हेरून ती सर्वांना उपयोगी व्हावी, माहिती व्हावी, आदर्श म्हणून उचलली जावी या हेतूंनीं नू. म. वि. च्या ग्रंथालयरूपांत खुली केली. त्यांचे नू. म. वि. मधले रेखीव, आखीव शिक्षणप्रयोग पहाण्यासाठीं तमाम हिंदुस्थानांतून अनेक मोठमोठे शिक्षणतज्ञ तेथे येऊन गेले. त्यांच्या अनेकविध नमुनेदार, अनुकरणीय प्रयोगांमध्यें 'शाळेचें

ग्रंथालय ’ हा एक अनुपम प्रयोग होता. अजूनहि तें काम तसेंच चालू आहे व आजहि अनेक मोठे पाहुणे तो पाहून त्यावर चिंतन करीत स्वस्थळीं जातात. भारताचे ग्रंथपालनमहर्षी गुरुवर्य डॉ. रंगनाथन् पद्मश्री यांनींहि तें ग्रंथालय सावकाश व लक्षपूर्वक पाहून त्याची मुक्तकंठानें स्तुति केली.

हें स्फूर्तिदायक चित्र निर्मिणारे आम्हा असंख्य अध्यापकांचे गुरुवर्य नाना यांच्यापुढे गेल्या दीड पावणेदोन तपांमध्यें कांहीं थोडें ग्रंथालयीन कार्य—कांहीं योजनाबद्ध तर कांहीं अवसरलब्ध असें केल्यावर आतां गेलों तेव्हां मनांत ध्येय-पूर्तीचें कांहींसें तरी समाधान घेऊन गेलों. ते शरीरानें ठीक असतांना विमाव्यवसा-यांत मग्न असूनहि आपण स्वतः स्फूर्ति देऊन सुरू केलेल्या उद्योगांविषयीं सतत माहिती घेत असत. आज विकलांग झालेले असतांनाहि त्यांनीं बहुशः स्मृती शाबूत ठेवल्या आहेत व नियतकालिकांशीं परिचय ठेवून आहेत हें दिसून नवल वाटलें. त्यांची मुलाखत घ्यावी म्हणून गेलों; पण त्यांच्या विकलावयवांनीं मुलाखत घेऊन त्रास देऊं नकोस म्हणून मला थांबवलें आणि तें मानून मी घरीं परतलों.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८०९ वि: ...
क्रमांक ११७४ नों. दि. ...

# ३. कोल्हापूर ग्रंथालयपरिषदेचे अध्यक्ष—

## श्री. विठ्ठल दत्तात्रय घाटे

ग्रंथालयपरिषद म्हणजे ग्रंथालयसंबंधितांचें संमेलन. त्यांत पूर्वी ग्रंथालयचालक व स्वतःस ग्रंथालयप्रेमी म्हणवून घेणारे यांचाच भरणा असे. परंतु आतां ग्रंथपाल म्हणजेच ग्रंथालयसेवकहि त्यांत वाढत्या संख्येनें व जास्त जवळिकेनें भाग घेऊं लागले आहेत. ग्रंथपालन हा एक नवा व्यवसाय अलिकडेच सुरू झाला आहे. आम्ही ग्रंथपालमंडळी आपली ग्रंथपालनाची भाषा वापरूं लागलो आहों. सामान्य जनांच्या कानांवर ती भाषा हळूहळू येऊं लागली आहे. ही ग्रंथपालनाची भाषा सामान्य भाषेपेक्षां निराळी आहे. ती नेमके संकेत व सार्थ संक्षेप यांची बनलेली आहे. तिची सामान्य जनांस अधिक माहिती करून देण्याच्या हेतूनें कोल्हापूर परिषदेचे अध्यक्ष मान्यवर विठ्ठलराव घाटे यांची ओळख ती ग्रंथपालनाची भाषाहि थोडी वापरून करून द्यावयाची असें योजलें आहे.

आपण जो व्यवसाय अंगीकारतों त्या व्यवसायाची व त्या विषयाची भाषा व्यवहारांत जरूर वापरून तिची माहिती इतरांस देत जावें असें मान्यवर घाटे यांचेंच सांगणें आहे. ते इतिहासाचे एक अभ्यासक व अध्यापक म्हणून सुप्रसिद्ध होते नि आहेत. ते शाळाधिकारी होते, तेव्हां माफक बोलणारे नि आज्ञापक नजरेनें धाक वाटविणारे होते. ते मला प्रथम दिसले त्या पहिल्याच प्रसंगीं त्यांचा एकूण अंगभूत रुबाब माझ्या ध्यानांत ठसला. मी तेव्हां एक अध्यापक होतो. शाळातपासणीचा दिवस होता. ते शाळेंत शिरले तेव्हां

त्यांच्या समवेत एक मंत्रीहि होते. पण ह्यांचाच वरचष्मा नि खराखुरा डौल उघड दिसत होता. मंत्री दुय्यम दिसले. तें सन १९३८ असावें. यावरून ते अलिकडचे कुणी खरेखुरे मंत्री नव्हते हें लक्षांत येईलच. अलिकडे कुणीहि मंत्री यायचे कीं, ही गर्दी उडते ! याउलट त्यावेळीं हे दोघे दिसल्याबरोबर सगळ्या शाळेभर गुपचूप होऊन गेलें. बऱ्याच मुलांच्या नजरा मिस्किल झाल्या व मी कितपत ल्टपटूं लागतों हें तपासूं लागल्या. प्रत्येक वर्गामध्यें हें घडलें असणार. माझे कोणी सहकारी ल्टपटूं लागले असणारच. पण मला मान्यवर वि. द. घाटे यांचें रसिकत्व नि कविवृत्ति चांगली माहिती होती. ही त्यांची माहिती जगजाहीरच होती. पण मराठीचे किंवा इतिहासाचे अध्यापक वा अभ्यासक नसणारे भीतीमुळें हें विसरत. मला मात्र त्यांचें कवित्व बरेंचसें तोंडपाठ होतें नि त्यामुळें त्यासमयीं त्यांचा कमी धाक वाटला. मी ल्टपटलो नाहीं. निदान माझ्या विद्यार्थ्यांसमोर तसें मीं दाखवलें. त्यांचा एक रसीला सवालजबाब आहे. " आलात ते कशाला ? ।। केलात मूक हल्ला । बळका-विलात किल्ला ।। ही जाळपोळ करुनी । जाता कुठे पळोनी ? ।। ही काय मोगलाई ? ... " वगैरे. रसिक प्रेमिकाला मोहविणारे हे शिरजोरीचे शब्द आपल्या तत्कालीन अशिक्षित स्त्रियांकडून उच्चारले जाणें अगदीं दुर्मिळ होतें. कल्पनासृष्टींतलें हें भावरंजन होतें. इतिहासांत सतत वापरले जाणारे अनेक शब्द एका इतिहासाध्यापकांनीं एकत्र गुंफून मोठें रसपूर्ण काव्य निर्माण केलें. सर्व शब्द कसे टाशीव नि ताशीव आहेत. " इतिहासांतली ती भाषा, काव्याचा रस, प्रेमाचा गुलाबी गंध आणि तत्कालीन प्रेमिकांची ध्येयधुंदी यांचा मनोहर मिलाफ इन्स्पेक्टर व्ही. डी. घाटे एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन) यांच्या ठायीं आहे. तशीच इतरांचे गुणलेश टिपण्याची–मापण्याची वृत्तीहि त्यांच्या ठायीं असणार " अशी सोइस्कर आशा करून मीं माझ्या वर्गांत ते आले असतांना चांगल्या धिटाईनें वर्गापुढें पाठ चालवला. माझा संस्कृतांतून संस्कृतांतील ' जाडोपंत–किरकोळराव ' ह्या गोष्टीचा पाठ चालू होता. त्यांचें पाठ–निरीक्षण संपवून ते उठले व जातांजातां " युक्तम् उक्तम् । युक्ता तव तनुः । युक्ता तथा एव एतस्य बालस्य आकृतिः । " असें म्हणत त्यांनीं त्या किरकोळरावाच्या आकृतीकडे आपली मिस्किल नजर टाकली आणि ते वर्गा-बाहेर पडले. वर्गाची व माझी फत्ते झाली होती. माझ्या तनूकडे बोट दाखवून

'युक्ता तव तनुः' आणि त्या किरकोळरावाला उद्देशून 'युक्ता तथा एव एतस्य बालस्य आकृतिः' असें अनुक्रमें म्हणत व एकदां दोन्ही कोपरें बाहेरच्या बाजूला अंगापासून दूर करीत आणि लगेच फक्त एक बोट हवेंत ह्या व त्या बाजूला अनुक्रमें हलवीत बरेच दिवस माझे विद्यार्थी करमणूक करीत. माझी आशा व त्यांच्या गुणज्ञतेविषयींची कल्पना खरी ठरली होती.

कोल्हापूर येथील ग्रंथालयपरिषदेंतील प्रदर्शनाच्या समयीं मीं त्यांची ओळख करून दिली. कवितेसाठीं त्यांनीं जशी त्यांच्या इतिहास या विषयाची भाषा राबवली तशी मीं त्यावेळीं आमचा विषय ग्रंथपालन याची भाषा राबवून त्यांचा परिचय करून दिला. त्यांतला ठळक भाग मुद्दाम देतो. मी म्हणालो, "आमचा विषय ग्रंथपालन म्हणजे २ हा आहे. ग्रंथपालनाच्या कोलन परिभाषेंत २ म्हणजे ग्रंथपालन–ग्रंथालयव्यवस्था. २ **घं** म्हणजे ग्रंथालयप्रदर्शन आम्ही मुद्दाम मांडलं आहे. या २ **घं**चे उद्घाटक म्हणून मान्यवर विठ्ठल दत्तात्रय म्हणजेच दादासाहेब घाटे यांना आपण पाचारलं आहे. २ **नं** म्हणजे ग्रंथालयपरिषद. तिचे अध्यक्ष म्हणून आपण सर्वांनीं एकमतानें त्यांनाच नियुक्त केलेलं आहे. या करवीर नगरामधल्या मंगलधामांत परिषदनिवास आहे. येथें जमलेल्या आम्हा २ **नं**च्या प्रतिनिधींसाठीं ज्या भाज्या गोळा केलेल्या आहेत त्यांचं वर्गीकरण काय असाव ? कोलन पद्धतीनुसारच्या **ठ** वर्गातल्या म्हणजे शेतमळ्यांत पिकणाऱ्या व मंडईत मिळणाऱ्या कांदा–कोबी–गाजरं–दुध्या–मुळा वगैरे कव्यींना नि बव्यींना, आचार्यांना नि भटांना तशाच मलाहि हव्या असणाऱ्या त्या आहेत कीं थोड्या वेळापूर्वीं सजीव असणाऱ्या म्हणजे **णड** या वर्गातल्या त्या आहेत ? पोळीबरोबरच **च** वर्गातला कार्बोहायड्रेट म्हणजे शर्करा हा पदार्थ हवासा वाटेल. पण तो आजच्या बाजारांतल्याप्रमाणें परिषदजेवणघरांत टंचाईचा नसणार ना ?"

ही अशी २ या वर्गाच्या परिभाषेंत म्हणजे ग्रंथालयीन भाषेंत मी ग्रंथपालानं त्यांची ओळख करून दिली. ती त्यांस बरी वाटली असावी. नवीन नि वेगळी तर ती होतीच. त्यांनीं म्हटलेंहि, "बालपणापासून मला छडीची छं छं घं घं भाषा चांगली माहिती झालेली आहे. आज २ या विषयाच्या एका अध्यापकानें त्याच्या निराळ्या संकेतांच्या भाषेंतला **घं** नि **नं** मला ऐकवला आहे. हें **घं नं** ऐकून मला **मं** मं ची आठवण व्हायला लागली आहे. कारण

त्यांनीं ठ, णड असंहि कांहीं ऐकवलं. त्यांना हव्या असलेल्या च ची व्यवस्था आपल्या या २ नं चे व्यवस्थापक नक्की करतील. २ नं च्या प्रतिनिधींनी काळजी करूं नये. आणि आतां हें २ घं सर्वांसमोर मीं खुलं करतों आहे. ते नीट तपासावं, पहावं." त्यांच्या रसिकतेची, स्मरणाची व निरीक्षणशक्तीची सर्वांनाच गंमत वाटली.

या त्यांच्या ओळखीआधीं सर्वांच्या नित्य जीवनांत त्यांची उत्तम ओळख गेली पिढीभर सगळ्या ग्रंथालयांना, विद्यार्थ्यांना, अध्यापकांना व वाचकमात्राला आहे. शालेयजगतांत, अध्यापनविद्यालयांमध्यें जसे ते एक अधिकारी म्हणून झळकले तसे ग्रंथदरबारांत एक मोठे मानकरी म्हणून ते सुविख्यात आहेत. ग्रंथालयांमध्यें आलेलें त्यांचें प्रत्येक पुस्तक नामवंत झालेलें आहे. त्यांनीं लिहिलें आहे तें मोजकें आहे. पण तें अत्यंत नेमकें, नजाकतीचें, डौलदार नि ढंगदार आहे. त्यांचा पहिला म्हातारा अत्रे–घाटे संपादकयुगुलाच्या नवयुग वाचनमालेच्या बालवाचनांत खोकखोक खोकत नि बोलबोल बोलत बालकांच्या व पालकांच्या समोर आला. त्यानंतर आणखीहि 'कांहीं म्हातारे' आले नि त्यांच्या समवेत 'एक म्हातारी' हि आली. कोल्हापूर परिषदेचे स्वागताध्यक्ष होते श्रीमान शि. ह. गद्रे. त्यांनीं परिषदेच्या आमच्या मुक्कामांत गप्पा मारता मारता आम्हांला सांगितलें, "दादासाहेब घाट्यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांतल्या संगमेश्वराच्या द्वारीं क्षणभर बसलेले कांहीं म्हातारे पाहिले नि त्यांस तेथून चक्क पळवून आणलं आहे. मी त्या सर्वांना चांगलं ओळखूं शकतों." शाळा-तपासणी करतांना नजरेंत करडेपणा नि नासिकेंत पुष्पगंधसंचयतत्परता ठेवून त्यांनीं ते म्हातारे ग्रंथालयांमधल्या ग्रंथांमध्यें आणून टाकले. त्यांचें तें काम अजूनहि चाललेलें आहे. मध्यंतरीं त्यांनीं 'पांढऱ्या केसांमधलीं हिरवीं मनें' आपल्यापुढें अल्लाद ठेवलीं. तेव्हां मीं म्हटलें "आमच्या ग्रंथपालनव्यवसायांतहि त्यांना 'पांढरे केस नि हिरवीं मनें'– छे, छे 'हरवलेले केस नि हिरवट किंवा हळवीं झालेलीं मनें' त्यांनीं आमच्या डोक्यांकडे नि डोकावून पाहिलें तर बहुशः दिसतील. त्यांच्या मर्म टिपणाऱ्या दृष्टीला सर्वत्रच सांपडतील." त्यानंतर ते अध्यक्ष या नात्यानें आमच्या ग्रंथालय संघाशीं निकटपणें संबंधित झालेले असतांनाच त्यांनीं एका म्हाताऱ्याचें बाळपणापासूनचें अगदी तारीखतागायतचें शब्दचित्र-नव्हे स्वतःचें आत्मचरित्र लिहून

पुरें करून आपल्या वाचकांना नि ग्रंथालयांना दिलें. हा म्हातारा अगदी निराळा आहे. त्यानें वापरलेले सगळे शब्द अस्मितायुक्त, नि ठसठशीत आहेत. त्याच आत्मीयत्वानें त्यांनीं आमच्या व्यवसायाचें निरीक्षण केलें तर त्यांना आणखी कांहीं म्हाताऱ्यांचा शोध नक्कीच लागेल आणि त्यांच्या त्या निरीक्षणास त्यांनीं शब्दरूप दिलें तर त्यांच्या लेखणीच्या जादूनें हीं चित्रेंहि अमर ठरतील. मी ही आशा करतों आहें. चांगल्याची आशा धरावी, चांगले संकल्प ठेवावे असें म्हणतातच. या विविध शब्दचित्रांप्रमाणेंच ग्रंथालयांत आलेलें त्यांचें प्रत्येक पुस्तक नामवंत झालेलें आहे. 'नाना देशचे नाना लोक' प्रसिद्ध झाल्या दिवसापासून आज पावेतों भूगोलाच्या अध्यापकांना, जिज्ञासू बालवाचकांना, संदर्भ देणाऱ्या ग्रंथपालांना अत्यंत हुकमी रीतीनें उपयुक्त व मनोरंजक ठरलेलें आहे. त्यांच्या 'नाट्यरूप महाराष्ट्र' या अशाच एका विद्यार्थीप्रिय पुस्तकाचा वेगळा निर्देश केला पाहिजे. त्यांनीं हाताळलेला प्रत्येक वाङ्मयप्रकार नुसता सजवलाच नाहीं, तर गाजवलाहि.

आचार्य अत्रे यांच्या समवेत त्यांनीं नवयुगवाचनमालेच्या रूपांत बालांचें एक अप्रतिम काम करून ठेवलें. बाटे–परुळेकर समितीच्या कामानें बिचाऱ्या प्रशालाध्यापकांची स्थिति निश्चितपणें सुधारणेच्या दिशेला त्यांनीं आणली. सरकारचें निवृत्तिवेतन घेणारे असूनहि त्यांनीं विधिसंमत संयुक्त महाराष्ट्रालाच संपूर्ण अनुकूल असे विचार स्वतंत्र मतानें मांडले. ही वर उल्लेखिलेली तीन विषयांची कामगिरी बहुमोल आहे व ती बहुत काळ लोकांच्या ध्यानांत राहील.

श्री. दादासाहेब आतां सत्तरींत आहेत. पण सभा–साहित्यादींत अजूनहि ते उत्साहानें भाग घेतात. डोळ्यांनीं किंचित् कमी न्याहाळतां येत असावें. पण पूर्व परिचितांची कांहीं एखादी खूण त्यांनीं पक्की जपून स्मरणांत ठेवलेली असल्याचा प्रत्यय येतो. डोळ्यांत व बोलण्यांत वडिलधाऱ्या आप्ताची कौतुकाची दाट छटा दिसते. स्मरणाच्या व वृत्तीच्या सदा प्रफुल्लतेमुळें आम्ही कोणी लहानगे कोठेहि आढळलो तरी त्या आधींच्या भेटीची, त्या भेटीनंतरच्या त्यांच्या ध्यानांत आलेल्या आमच्या कांहीं कामगिरीची ते तत्काल उजळणी करतात. डोळ्यांतलें कौतुक नि शब्दाशब्दांतली थट्टा यांची बरसात होते नि लहानांचा हुरूप हमखास वाढतो.

माझे एक मित्र केसरी ग्रंथशालेचे ग्रंथपाल श्री. बर्वे यांनीं आमच्या संघानें बसवलेल्या 'बिचारा ग्रंथपाल' या नाट्कल्यांत हरदासाची भूमिका अगदी मनोवेधक केली होती. ती अर्थातच दादासाहेबांना फार पसंत झाली व त्यांनीं आपल्या नित्याच्या पद्धतीनें 'एकवार आमच्या दिवाणखान्यांतहि हजेरी लागू दे' असें हरदासबुवांना खास निमंत्रण दिलें. नटाचे गुण अंगीं असणाऱ्या बर्व्यांना त्या कल्पनेनें किती आनंद झाला असेल! ३ जुलै १९६१ रोजीं साहित्य परिषदेंत ग्रंथसूचीकार दाते यांचा सत्कार झाला. दादासाहेब तेथे आधींच येऊन बसलेले होते. मी आलेला दिसल्यावर मला पुकारून ते म्हणाले, "अभिनंदन! तुमची नवी कामगिरी मी कालच्याच आलमगिरांत पाहिली." आचार्य अत्रे यांचे वक्तृत्वगुरु डॉ. बॅलार्ड यांच्या 'फूड फॅड्स' या लेखाचें मी 'माझे तंदुरुस्तीचे प्रयोग' या शीर्षकानें रूपांतर केलेलें प्रसिद्ध झालें होतें. तें त्यांनीं ध्यानांत ठेवून मी दिसतांच कौतुक केलें. मी त्यांना माझ्या ग्रंथालयांत एकदां येऊन भेट व व्याख्यान देण्याची विनंती केली. त्यावेळीं ते ग्रंथालयसंघाचे अध्यक्ष होते. त्यावर ते जें बोलले तें त्यांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकणारें आहे. ते म्हणाले, "तुम्ही तुमच्या आजपावेतोंच्या जीवनांत तुमचं ग्रंथालय नि तुमचा ग्रंथपालव्यवसाय यांचं काम घरगुती काम मानलंत. तेंच अखंड करीत आला. पण कोल्हापुरच्या परिषदेनंतर तुम्ही त्याबद्दल कांहींहि बोलत नाहीं माझ्याशीं. असं कां? मग मला तिथें कोल्हापुरांत अध्यक्ष कशाला केलंत? तिथल्या प्रदर्शनाच्या वेळचं तुमचं तें वात्रट भाषण ऐकवण्यापुरतंच? काय तुम्ही संघांत कुणीच नाहीं म्हणता? माझा विश्वास बसेल ह्याच्यावर? तुम्ही दुष्ट आहा. मला काम हवं. पण तुम्ही तें कांहीं सांगतच नाहीं. दुष्ट आहात तसेच खोटेहि आहात. म्हणे संघांत कुणीच नाहीं! मला नका सांगू हें. अहो, मधून येत जा. तुम्ही माझ्याकडे वर्षासहामहिन्यांच्या टप्प्यानें उगवायचेत नि म्हणायचं 'ग्रंथालयांत या, भेट द्या, व्याख्यान द्या.' आम्ही येऊं हो. पण तुमचे ते तीन उंचच उंच मजले चढण्यापूर्वी तुम्ही ओळीनें दोनतीन महिन्यांत दोनतीनदा येऊन आठवण जागी ठेवाल कीं नाहीं? कोणाला अध्यक्ष केलं परिषदेचं किंवा करायचं तर जरा जास्त वेळां गाठीभेटी घडाव्या, तुमच्या अडीअडचणी आम्हाला कळाव्या, त्या अडीअडचणींवरच्या इलाजउपायांविषयीं विचारविनिमय व्हावा. एकदां

अध्यक्ष करायचं नि नंतर कांहींच वास्तपुस्त नाहीं. आहो–नाहीं हें कळूं द्यायचं–घ्यायचं नाहीं. हें नसावं. तुम्हीहि लक्षांत ठेवा नि तुमच्या त्या म्होरक्याला म्हणजे भटांनाहि सांगा. घेऊन या एकदां त्यांना इथें. मात्र याल ते सावकाश कांहीं वेळ बसण्या–बोलण्याइतका ठेवून या. आम्हांला इतिहास-जमा करूं नका. निदान तुमच्या पाठींत दोनदोन धपाटे घालण्याची संधी आम्हाला देत चला "

* * *

## ४. ग्रंथपालनमित्र–

# श्री. पु. पां. म्हणजे बाबूराव गोखले

माझ्या बाळपणीं केसरी हें भारदस्त व डौलदार शैलीचें एकमेव पत्र माझ्या पेणनजीकच्या सावरसई या खेडेगांवांतील घरीं येत असे. माझीं वडील-धारीं माणसें " केसरी, पुणें–मंगळवार तारीख...पासून...यांनीं छापून प्रसिद्ध केलें " अगदीं येथपावेतोंचा संपूर्ण मजकूर कांहीं विशेष कर्तव्य करतां आहों अशा भक्तिभावानें वाचीत असत. तो केसरी मोकळा असेल व तो वाचणाऱ्या माझ्या काकांचा चष्माहि मोकळा दिसेल तर तो लावून मीहि " केसरी, पुणें–मंगळवार " इत्यादि वाचूं लागत असे. त्या बारीकबारीक वाचनाची माझ्या संस्कारग्राही वयांत माझ्यावर आपोआप छाप बसली व मी त्यांत गोडी अनुभवूं लागलों. त्या वाचनांतच कराड, सातारा या भागांतल्या वृत्तांमध्ये एकाच व्यक्तीचें व त्या व्यक्तीनें दिलेल्या व्याख्यानांचें आणि सुरू केलेल्या चळवळींचें वृत्त वारंवार नजरेस येई. ती व्यक्ति त्यावेळीं एक अध्यापक होती व वर्गांतल्या अध्यायकांना देशप्रेम, देशोन्नति इत्यादींचे पाठ देत असतांनाच स्वतःच्या संकल्पित समाजसेवेचे पाठहि मोठ्या आस्थेनें, कल्पकतेनें व योजनाबद्धतेनें त्या व्याख्यानांमधूनच घेत होती. त्यांचीं तीं व्याख्यानें प्रथम केसरींत व पुढें साताऱ्याच्या समर्थ, ऐक्य, प्रकाश यांमधून कालक्रमशः प्रकट झालेलीं माझ्या नेहमीं दृष्टीला येत.

यानंतर १९३९ मध्यें मी बी. टी. च्या वर्गांत असतांना वर उल्लेखिलेल्या या अध्यापकाची संपूर्ण व अगदी जवळची माहिती त्यांचे एक निष्ठा-

वंत विद्यार्थी व माझ्यावरोवर बी. टी. ला असलेले, पुढें कराडचे नगराध्यक्ष झालेले श्री. प्र. ल. म्हणजे शंकरराव करंबळेकर यांच्या तोंडून अनेकवार ऐकूं आली. सन १९३० पूर्वी या आदर्श अध्यापकांविषयीं एकमेकांना न देखतां, न भेटतांहि जो आदरभाव माझ्या मनांत निर्माण झालेला होता तो माझे मित्र श्री. शंकरराव यांच्याकडून मिळत गेलेल्या माहितीनें दृढ झाला. यावेळेपर्यंत हे अध्यापक म्हणजेच श्री. बाबूरावजी गोखले हे शिक्षकांचेहि शिक्षक होण्याच्या वयाला नि अधिकाराला येऊन पोचले होते. आणि त्यामुळें त्यांचें नांव सर्वत्र पत्रांमधून भरपूर प्रमाणांत पहावयास मिळूं लागलें होतें. त्यांची माझी प्रत्यक्ष भेट १९५० च्या सुमारास झाली. पण त्यांस मी अगदी विद्यार्थीदशेपासून म्हणजे अर्थात् माझ्या विद्यार्थीदशेपासून ओळखत होतो. आमच्या प्रत्यक्ष भेटीपावेतों ते मला ओळखत नसावे. कारण मी एक चिमुकला माणूस. ना कोणत्या सुविख्यात झालेल्या कॉलेजाच्या किंवा विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या गादीवरचा किंवा आधीं रूढ झालेल्या लठ्ठ पगाराचा ग्रंथपाल. पण १९५० मध्यें त्यांच्या संबंधींचा हा वृत्तपत्री परिचय ध्यानांत घट्ट धरलेला मी त्यांस भेटलों आणि त्यावेळीं त्यांनीं मला जें एकवार जाणलें तें दृढपणें व त्यांचा एक निकटवर्ती आप्त मानून. तेव्हांपासून आम्ही जणूं एकाच गांवचे, एकाच घरांतले, जिवाभावाचे होऊन गेलों आहोंत. एवढा जिव्हाळा त्यांनी मला व माझ्या ग्रंथपालनव्यवसायाला सतत दिला आहे. आमचें गांव एकच आहे—ध्येयवादित्वाच्या दृष्टीनें. घर-गृहस्थितीहि एकच आहे—ध्येयासक्तीमुळें आमच्याशीं असणाऱ्या द्रव्याच्या दृष्टीनें. या दृष्टीनें माझें व त्यांचें म्हणजे समाजसेवक, समाजभूषण बाबूरावजी गोखले आणि मी ग्रंथपालनसेवक ग्रंथपाल यांचें सूत जळलें आहे.

सन १९५० मधल्या त्या प्रथम भेटीनंतर आमच्या स्नेहभावनेच्या अनेक बैठकी आजपावेतों झाल्या आहेत. ऊन असो, पाऊस असो, थंडी असो, घाई असो, गर्दी असो, पाय दुखत असोत वा माझ्या ग्रंथालयाचा तिमजली चढ असो. ते माझें कुशल जाणण्याची मेहेरनजर न चुकता करीत आले आहेत. पण आमच्या ओळखीच्या प्रारंभकाळांतल्या एका बैठकीची आठवण मी कधींहि विसरणार नाहीं. कारण माझ्या चालू जीवनांतील एका प्रतिकूल अवस्थेचा पालट त्या भेटीनंतर जल्दीनें घडला. माझ्या या ग्रंथालयाच्या

आरंभाचें एक सबंध तप येथें असणाऱ्या ग्रंथपालाला सर्वस्वी प्रतिकूल काल-खंडाचें होतें. ग्रंथालयाचीं पहिलीं दोन वर्षे पूर्ण होण्याआधींच दोन ग्रंथपाल दूर होऊन मी तिसरा ग्रंथपालनामधारी झालों होतों. सन्माननीय अधिकाऱ्यांचें सूक्तासक्त एकतंत्रत्व व ग्रंथालयांतील सेवकांमधला ज्येष्ठ मी यांच्यामधील तूं-मी कलह सनातनत्व पावला होता. श्री. बाबूरावांशीं माझा चांगला विश्वास जमलेला. आणि ते व आपल्या राज्याचे आज कैलासवासी असलेले तत्कालीन दोन शिक्षणमंत्री हे एकाच राजकीय कुटुंबांतले निकटचे आप्त होते. म्हणून मी त्यांची मुद्दाम भेट घेतली होती. ती हिवाळी रात्र होती. थंडी मी म्हणत होती. ऐन झोपेच्या प्रहरीं सुमारें चार तासभर माझ्या रूपांत पुढे बसलेल्या एका पदवीधर पददलित ग्रंथपालाचें दर्दभरी गाऱ्हाणें ते एकतान व सावधान चित्तानें ऐकत होते. अधिकारपदाधिष्ठितांमधील एकतंत्र मीकडून कर्मभूमिनिष्ठ सेवकांशीं जें सूक्तासूक्त युद्ध खेळलें जात होतें त्याची तें दर्दभरी निवेदन ही अथपासून इतिपर्यंतची एक रम्य कथा होती. युद्धें संपल्यानंतरच त्यासंबंधीच्या कथा रम्य वाटतात. प्रत्यक्ष त्या काळांत त्या कथा रम्य नसतात तर जीवघेण्या घटना असतात. अनेक स्थळींचे अधिकारपदाधिष्ठित सन्माननीय असणारे सेवक आणि शिक्षित वेतनी उदरंभरी सेवक यांच्यांतील संबंधांची ती एक वानगी होती. लक्ष लावून ती कहाणी ऐकणाऱ्या त्यांना पाहात असतांना मला त्यांच्यांतील ग्रंथपालनमित्र स्पष्ट ओळखू आला. त्या वेळेपासून ग्रंथपालनव्यवसायाला हातीं असेल तें तें साह्य ते देत आले आहेत.

त्या ग्रंथपालाविषयीं व ग्रंथालयाविषयीं त्यांना जो कणव आला तो कांहीं कोणत्याहि राजकीय दृष्टीच्या मतलबामुळें किंवा एकतर्फी तात्कालिक भावनोर्मीमुळेंहि नव्हे. त्यांचे व ग्रंथालयांचे स्नेहबंध फार जुने व मुरलेले होते. ग्रंथालयांकडे त्यांना वळवणारे कोण असा प्रश्न त्यांस एकदा केला असतां साताऱ्याचे न्यू इंग्लिश स्कूल प्रमुख कै. सीतारामपंत देवधर यांचें व त्याहि आधींचा इतिहास कांहीं क्षणांतच आठवून कराडच्या सार्वजनिक वाचनालयाचे सन १९१५ च्या सुमाराचे ग्रंथपाल मांग मास्तर यांचें हीं नांवें त्यांनीं पटकन उच्चारलीं. आज सरकारी योजनेंत सामील झालेलें कराडचें सार्वजनिक वाचनालय सन १९१५ च्या सुमारास विशेषतः विद्यार्थी-वाचकांशीं अतिप्रेमानें वागणाऱ्या मांग मास्तर या ग्रंथपालांकरवीं चालविलें जात होतें. त्या काळाचा

विचार करता मांग मास्तर हे उत्कृष्ट ग्रंथपाल व मुरब्बी संदर्भपाल होते; असें बाबूरावजी सांगतात. उत्सुक वाचकांना तत्कालीन श्रेष्ठ लेखक हरिभाऊ आपटे वगैरेंच्या वाङ्मयाकडे मुद्दाम माहिती देऊन ते वळवीत. जिज्ञासू विद्यार्थ्यांना ग्रंथालयांत घेऊन येत. श्री. सीतारामपंत देवधर हे खास वाचनीय सामग्री आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी खरीदून त्यांनीं काय काय वाचावें हें मुद्दाम सांगत व नंतर त्यांच्यापैकीं कोणीं कोणीं काय काय वाचलें हेंहि विचारीत. या दोन वडीलधाऱ्या ग्रंथालयमित्रांमुळेंच बाबूरावांना वाचनाभ्यासाची गोडी लागली व ग्रंथालयांबाबत अतिशय आपुलकी वाटूं लागली. पुण्यांत ते फर्ग्युसन कॉलेजांत विद्यार्थी असतांना त्यांनीं श्री. हरिभाऊ देशपांडे व त्यांचें श्री गणेश मोफत वाचनालय यांना बहुत प्रकारचें साह्य सहकार्य दिलें. विद्यार्जन पूर्ण झालें तो महात्मा गांधीजींच्या ‘ असहकार व स्वदेशी ’ मोहिमेच्या अव्वल अमदानीचा काळ होता. ध्येयवादानें भारलेले असे ते आपल्या कराड गांवीं परतले. कराडमध्यें डॉक्टर वाचासुदर व वकील फणसळकर ह्यांच्यासह त्यांनीं श्रीकृष्ण वाचनालय चालवलें. त्याचप्रमाणें श्री. बदामी याच्या मनोरंजक वाचनालयांत अनेक परीची विविधता, नावीन्य व आकर्षण आणण्यांत साह्य केलें.

ज्या ग्रंथालयांत मांग मास्तर या तत्कालीन आदर्श ग्रंथपालाच्या स्मृती कायम नोंदल्या गेल्या आहेत त्या कराड नगरपालिकेच्या व्यवस्थेंतील राज्य-सरकारच्या ग्रंथालययोजनेचें घटक असलेल्या त्या सार्वजनिक ग्रंथालयांत नगर-पालिकेंतील इतर समशिक्षणगुणांच्या सेवकांना जी वेतनश्रेणी आहे ती ग्रंथपाललाहि लागू करण्यांत आलेली आहे. याप्रमाणेंच सेवानिवृत्तीच्या काळांतहि निवृत्त ग्रंथपालाला त्याच्या परीनें मानानें व स्वास्थ्यानें जगतां यावें यासाठींच्या सोयीसवलतीहि लागू आहेत. ‘ निवृत्तीपूर्वी ग्रंथालयाच्या विचारामुळें मरण्याचा विचार आला नाहीं. निवृत्तीमागोमाग ती चूक दुरुस्त करावी ’ अशा निर्धाराकडे ग्रंथालयसेवकांनीं मुळींच न वळतां स्वास्थ्यानें व शक्य त्या प्रसन्न मनानें आपलें शेष जीवन उपभोगावें हा आदर्श बहुशः सरकारी योजने-मधल्या असंख्य ग्रंथालयांपैकीं याच ग्रंथालयांत असावा. याच्या अनुकरणानें किंवा याच्याप्रमाणेंच अशा अन्य ग्रंथालयांमध्येंहि ही कार्यवाही असेल तर प्रत्येक योजनाघटक ग्रंथालयाच्या सेवकांना हर्ष होईल. कराडचा हा आदर्श

तेथले दोन नगराध्यक्ष डॉ. कुळकर्णी व श्री. शंकरराव करंबेळकर यांनीं निर्मिलेला आहे. ग्रंथालयांच्या सर्वत्रच्या कारभाराच्या दृष्टीनें ही उपेक्षितां-बावतची न्यायापेक्षित कामगिरी प्रत्यक्षांत येण्यामागें या दोन नगराध्यक्षांनीं श्री. बाबूरावजींशीं केलेली सल्लामसलतच आहे.

संधी मिळाली तेथे त्यांनीं ग्रंथालयें, ग्रंथपाल व ग्रंथपालन या तिन्हींबाबत जशी मोठ्या मनाची उदार कृति केली तसाच समय मिळाला तेथे व तेव्हां त्यांनीं ग्रंथालयसंबंधितांपुढें व संबंधितांसाठींच प्रचारहि केला. महाराष्ट्रभर—जुन्या मुंबई राज्यांतील मराठी जिल्ह्यांमध्यें तशींच नव्यानें महाराष्ट्रांत आलेल्या मराठवाडा-विदर्भामध्यें—अनेक व्याख्यानें दिलीं. गेल्या तप-सव्वातपांत ठिक-ठिकाणच्या वृत्तपत्रांमध्यें वा मासिकांमध्येंहि लेखांच्या शीर्षकाखालीं ‘ पु. पां. गोखले, कराड ’ हें नांव अनेकदां दिसलें आहे. त्या लेखांत त्यांनीं मांडलेल्या विचारांना संपादकमहाशयांनींहि अनेकदां विशेषानें उचलून धरलें आहे. एवढेंच नव्हे तर त्यांच्या सूचनांचा प्रत्यक्ष मान्यवर शिक्षणमंत्र्यांनींहि आस्थेनें परामर्श घेतला आहे.

त्यांच्या सूचनांचा परामर्श सरकारनें घेतला हें नमूद करतांना आणखी एक ठळक उदाहरण म्हणून एक हकिगत सांगतों. आम्ही अनेक ग्रंथपाल व आमचे ग्रंथालयाधिकारी यांना गेल्या सुमारें वीस वर्षांमध्यें आलेल्या अनुभवानें व या विषयाच्या वाचनामुळें ग्रंथपालनाचें जें कांहीं शास्त्र आहे तें चांगलें माहिती झालें आहे असें वाटतें. वाटतें म्हणतों याकरतां कीं जें आम्हा मंडळींचें मत ग्राह्य ठरलें—धरलें पाहिजे तें अनेक स्थळींचीं चालक-मंडळी अद्यापीहि ध्यानांतच काय, ऐकूनहि घेत नाहींत व स्वमतानें कारभार चालवूं पाहातात. ग्रंथालयांत शेकडों वाचक ये-जा करीत असतात. पुस्तकादि वाचनीयें संपूर्ण बंदिस्त राहूं शकत नाहींत. इमारतीचा बंदोबस्त नसतोच. सेवकांच्या नजरेचा बंदोबस्त असावा इतके सेवकहि नसतात. कोणा अज्ञानी वा नाठाळ वाचकांच्या हातचलाखीनें केव्हां कोणतीं वाचनीयें अदृश्य झालीं तर ती एक संभवनीय व क्षम्य घटना म्हणून विलायतेंत धरली गेली आहे. आपण आधुनिक ग्रंथपालन विलायतेंतून घेत असल्यामुळें त्यांचे असे आडाखे आपण ग्राह्य ठरवले पाहिजेत. पण आपल्या येथे असे अनुभव व त्या संबंधींचे अपरिवर्तनीय निर्णय ध्यानांत घेण्यास आपल्या

चालकांना वर्षानुवर्षें पुरत नाहींत. ह्याविषयीं सांगूं शकणाऱ्या ग्रंथपालांच्या वा ग्रंथालयाधिकाऱ्यांच्या सांगण्याकडे लक्षच दिलें जात नाहीं. म्हणून अनेक स्थळीं ग्रंथपालांकडून जामीन रक्कम मागण्याचा बूट निघतो. गहाळ होणाऱ्या वाचनीयांची भरपाई करणें ग्रंथपालाला भाग पाडण्यांत येतें. मौज ही कीं यांपैकी अनेक स्थळीं कोण्यातरी चालकांना मुक्तप्रवेश म्हणजे ओपन ॲक्सेस हा शब्द व त्या संबंधींची पोपटपंची माहिती झालेली असते व तीमुळे ग्रंथपालाच्या म्हणण्याउलट ग्रंथालयाचीं कपाटें मुक्त प्रवेश ठेवलीं जातात. आणि या परिस्थितींत आपल्या येथल्या ग्रंथालयांमधून वाचनीयें अटळपणें गहाळ होतात. नि मग बिचाऱ्या ग्रंथपालावर तो बोजा लादण्यांत येतो. अशी एक गोष्ट एका सरकारी विद्यालयाच्या ग्रंथालयाची आम्हा सर्व ग्रंथपालांना तोंडपाठ झाली आहे. तेथल्या ग्रंथपालांस त्यांच्या अधिकाऱ्यांनीं याबाबतींत अडचणींत टाकलें. बाबूरावांना तें साद्यंत ऐकविलें. आमच्या ग्रंथालयाधिकाऱ्यांचें मत घेऊन श्री. बाबूरावजींनीं नामदार शिक्षणमंत्र्यांपर्यंत जाऊन त्यांच्या समंजसतेला आवाहिलें. तत्कालीन नामदार शिक्षणमंत्र्यांनीं सर्व सारासार विचार करून त्या बिचाऱ्या ग्रंथपालाची त्या असमंजसतेंतून उद्भवलेल्या अडचणींमधून सुटका केली. ते ग्रंथपाल व आम्ही त्यांचे सहव्यवसायी नामदार मंत्र्यांप्रमाणेंच श्री. बाबूरावजींनाहि दुवा देतो आहो. हें उदाहरण अनेक स्थळीं उपयुक्त होणारें आहे आणि तें ग्रंथपालनमित्र बाबूरावांच्या साह्यशीलतेमुळेंच प्रस्थापित झालेलें आहे. अन्य सुस्थित संस्थांच्या संचालनाचे अनेक आडाखे ग्रंथालयें व ग्रंथपाल यांना सरास लागू करणें चूक हें श्री. बाबूरावांनीं दाखवलें. असल्या असमंजस सक्तीमुळे ग्रंथालयांकडे व या नव्या ग्रंथपालनव्यवसायाकडे वळावयास हवीं आहेत तीं खरीं बुद्धिमान, कामसू, तरुण माणसें अजूनहि दहावीस वर्षें दूर रहातील. म्हणजेच आणखी एक अशी पिढीच या कामांत उत्सुक उरणार नाहीं, हिरमोडून जाईल. समाजांतील असंख्यविध कामांसाठी अनेक कार्योत्सुक तरुण मंडळी पुढें येऊं पाहातात. त्यांच्यामधील कार्योत्सुकता, योजकता, कुशलता, कर्तृत्व ध्यानांत घेऊन व बाळगून त्यांचा त्या त्या कामांत समय साधून उपयोग करून घेण्याचें निःस्वार्थ व निर्लेप कौशल्य श्री. बाबूरावांच्या ठायीं आहे. ते खरेखुरे कार्यकर्ते, अनुभवी वडीलधारे म्हणून असंख्य तरुणांनीं त्यांचें मार्गदर्शन घेतलेलें आहे. पण वासरांत घुसणाऱ्या लंगड्या कपिला

नांवाच्या आणि मतलबी करणीच्या गाईची वासरांचाच वास हुंगाडूं पाहाणारी कपटी वृत्ति त्यांच्या ठायीं नाहीं. आमच्या संघांत ते आले. अजूनहि आमच्यांत आहेत. पण त्यांनीं आम्हां ग्रंथपालांनाच मिळणें योग्य नि इष्ट अशी चहा, मान आणि अल्प स्वल्प धन निर्लेप व निरहंकार मनानें घेऊं दिलें आहे. आपमतलबाचा लेशहि त्यांच्या ठायीं नाहीं. अत्युच्च आणि संपन्न असणाऱ्या, एवढेंच काय सरकारशीं साक्षात् निगडित झालेल्या अनेक ग्रंथालयांमधील सेवकांच्या वेतनश्रेणी, कामाचे तास, सुट्या, निवृत्तिवेतन वगैरेसंबंधींच्या खळखळीच्या पार्श्वभूमीवर कराडच्या सार्वजनिक वाचनालयांतील सोयी-सवलतींची करविलेली कार्यवाही व नामदार शिक्षणमंत्र्यांकडून एका ग्रंथपालावर लादलेली कपात माफ करविण्याची कारवाई याबाबत ते केवळ कर्तव्य केलें एवढेंच म्हणून स्वस्थ होतात. त्याविषयीं आणखी कांहींहि उच्चार त्यांच्या तोंडून निघालेला नाहीं.

अशा कामगिऱ्यांमधून बारीक बारीक लाभ उठवण्याच्या युगांत ते 'पद्मपत्रम् इव अंभसि' असे निरंतर राहिलेले आहेत. कराडच्या वाचनालयांत नवरात्रांमध्ये सरस्वती व्याख्यानमाला गुंफली जाते. तीकरतां कायमनिधीचा स्वतःच्या पुंजीनें त्यांनीं आरंभ करून दिलेला आहे. निर्लेप देशभक्ताच्या अल्प असणाऱ्या प्रामाणिक मिळकतींतून अशा रीतीनें आरंभून त्यांनीं अनेक गोष्टी स्थिर केल्या आहेत. "समाजानें किंवा तुम्ही मंडळींनीं हें आणून द्यावें, तें आणून द्यावें, हें करावें किंवा तें करावें मग ( उरेल तें ) आम्ही कांहीं करून दाखवण्याची उमेद बाळगतो." अशी उपदेशबाजी करीत किंवा अष्टपत्री विनंती पत्रकेंच काढीत स्वस्थ न बसता किंवा "संस्था अजून लहान आहे, स्वार्थत्यागाची जरूर आहे, कंबर कसून-घरसंसार विसरून काम केलें पाहिजे. असें असूनहि वेतनभत्ते अधिक कसले मागता ?" असें गुरकावणाऱ्या, स्वतःच्या कचेरींत याच गोष्टीसाठीं आदळआपट वा लांगूलचालन करीत असणाऱ्या, अन्यत्र वेतनी सेवक म्हणून राबणाऱ्या, पण ग्रंथालयामध्ये निवडून येऊन सन्माननीय सेवक म्हणून मिरवणाऱ्या, ग्रंथालयाबाबत स्वतः-व्यतिरिक्त समाजाला वा वेतनी सेवकांनाच द्रव्यनिधीविषयीं जबाबदार मानणाऱ्या अनेकस्थ मंडळींउलट ग्रंथपालनमित्र बाबूरावजींची रीत आहे. त्यांचें ध्येयच

मुळीं ' नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः । " हें आहे. उच्च हेतु विफल झाला तरी किंवा त्यासंबंधींची कृती तोटकी पडली तरी दूषणास्पद नाहीं. पण मूळ हेतूच जर लहान असेल तर तें सर्वच दोषार्ह होय. ग्रंथालय-हितैषी व ग्रंथालयप्रेमी सन्माननीय सेवकांनीं बाबूरावांच्या ठायींची ही कृतियुक्त कर्तव्यबुद्धि सदैव व अवश्य ध्यानांत घेण्यासारखी व आचरण्यासारखी आहे.

एक अधिकारी वाङ्मयसेवक, इतिहासाभ्यासक, समाजनेता या त्यांच्या सुविख्यात नात्यांप्रमाणेंच ते एक ग्रंथपालनमित्र म्हणून त्यांस पाटण, विटें, सांगली, सातारा, अकोला, मुंबई, पुणें येथील ग्रंथालयांनीं आपल्या समारंभांचे पाहुणे म्हणून पाचारलें होतें. रोहें येथें कुलाबा जिल्हा ग्रंथालय परिषदेचे व जळगांवच्या महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची योजना झाली होती. आपल्या अध्यक्षीयांमध्ये त्यांनीं ' ग्रंथालय कायदा झालाच पाहिजे ' असा उद्घोष केला होता.

वर आपल्या एका मान्यवर शिक्षणमंत्र्यांनीं बाबूरावजींच्या सांगण्याप्रमाणें काम केलें तें उल्लेखिलें आहे. त्यावेळचेच मुख्यमंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाणहि श्री. बाबूरावांना असेच बहुमानानें वागवतात. एकदा नामदार शिक्षणमंत्र्यांकडे तत्कालीन ग्रंथालयसंघकार्याध्यक्ष प्राचार्य दोंदे यांच्या नेतृत्वाखालीं ग्रंथालय संघाची कांहीं मंडळी गेलीं होतीं. त्यांचेमध्ये अर्थातच बाबूरावांचा समावेश होताच. प्रथम ते सर्वजण तळमजल्यावर लिफ्टजवळ होते. बाबूरावांची ती पहिल्वानाप्रमाणें छाती पुढे काढून व पाय रोवून चालण्याची रीत आणि कांहींशी गावठी ढब बघून तेथले रक्षक कुतूहलानें त्यांच्यावर नजर ठेवून होते. प्राचार्य दोंदे हे मुंबईकर, मुंबईचे एक महापौर. ते थोड्या वेळानें आले. ते बाबूरावांशीं बोलूं लागले. त्यामुळे त्या रक्षकांच्या नजरा थोड्याशाच पण निवळल्या असाव्या. तरीपण त्या खिळलेल्या होत्याच. कांहीं वेळांत मुख्यमंत्री नामदार यशवंतरावजी तेथे उपस्थित झाले. बाबूराव दिसताक्षणीं यशवंतरावजी पुढे झाले, त्यांनीं बाबूरावांना उचित असा नमस्कार केला आणि त्यांस आपल्या हातीं आदरानें धरून स्वतःबरोबर वर नेलें. नामदार यशवंतराव व नामदार बाळासाहेब देसाई हे दोघेहि श्री. बाबूराव-जींना अतिशय मानतात. ग्रंथालयें, ग्रंथपालमंडळी व ग्रंथालयसंघ यांना

बाबूरावजी आणि हे दोन मान्यवर मंत्री यांच्या मैत्रीचा सर्व लाभ होवो व त्या मैत्रींतून ग्रंथपालनव्यवसायाला अत्यावश्यक व अत्युपकारक असा ग्रंथालय-कायदा अगदी लौकर घडो !

★ ★ ★

अनुक्रमांक ३८८७८ वि: ...
... २१५४ ... नों दि: ...

# ५. ग्रंथपालनाचे पहिले पाईक—

## श्री. र. श. पारखी

एका भव्य संकल्पाच्या संस्थेच्या प्रारंभकाळांतल्या छोट्याशा टुमदार इमारतीच्या प्रवेशद्वारापासच्या चार पायऱ्या एका सायंकाळीं मी चढूं लागलों. प्रवेशद्वाराच्या पलीकडेच डाव्या हातास वावभर अंतरावर मला प्रथम एक टेबल दिसलें. त्यावर उभेसे दोन नाल आणि त्या नालांमागें लागून वहाणा एवढेंच तिसऱ्या पायरीवरून दिसलें. प्रवेशद्वारीं पाऊल टाकल्याबरोबर टेबलामागे खुर्चीवर मिटलेल्या डोळ्यांनीं नि पुढें कललेल्या डोक्यानें वाचकांची प्रतीक्षा करणारे तेथले सेवक एकदम डोळ्यांत भरले. तें टेबल, ते सेवक, बाजूचीं दोनतीन कपाटें मिळून संस्थेचें तें ग्रंथालय होतें. जुन्या काळचा हा एक नमुना माझ्या मनांत आविस्मरणीयपणें शिरून बसला आहे.

याउलट एका खरोखरीच्या भव्य संस्थेच्या प्रत्यक्षांतील ग्रंथालयाच्या टोलेजंग इमारतीच्या चारच पायऱ्या एका दुपारीं मी चढतां आहे तोंच समोर दूर असणाऱ्या टेबलावरून माझ्याकडे पाहून स्मित करीत देह, डोळे नि भान जागें ठेवून माझें स्वागत करणारे त्या संस्थेचे ग्रंथालयसेवक मला आढळले. हे दुसरे ग्रंथालयसेवक म्हणजेच पुण्याच्या सुप्रसिद्ध फर्ग्युसन कॉलेजचे पहिले ग्रंथपाल श्री. रघुनाथ शतानंद पारखी होत.

ग्रंथालयाच्या संदर्भात पारखी हें नांव आलें कीं दोघा पारखींची याद येते. एक म्हणजे आतां सत्तरी ओलांडलेले ते दुर्मिळ ग्रंथांचे रत्नपारखी पारखीशास्त्री आणि दुसरे म्हणजे महाराष्ट्रांत ज्यांनीं ग्रंथपालनाचें नांव प्रथम

माहिती करून दिलें ते साठी उलटलेले ग्रंथपाल पारखी.

मुंबईत १९४२ च्या एप्रिलांत ५ वी भारतीय ग्रंथालय परिषद भरली. त्याच सुमारापासून मुंबईत व ठाण्यांत 'मराठी ग्रंथालय परिषदा' भरूं लागल्या. १९४४ मध्ये आम्हा ग्रंथपालांचे गुरु रावसाहेब रंगनाथन् यांचें आमच्या पुणें ग्रंथालय संघाद्वारें पुण्यांत व्याख्यानसत्र झालें. तेव्हांपासून ग्रंथपालनाबद्दल अखंडपणें व जोरजोरानें गेलीं २१-२२ वर्षेंभर लोकांच्या कानांवर लहानमोटें ग्रंथालयीन वृत्त पडत आलें आहे. तत्कालीन मुंबईराज्यांत ग्रंथालययोजना आली. ती आतां स्थिर झाली आहे. एवढेंच नाहीं तर नव्या संयुक्त महाराष्ट्रभर विस्तारते आहे. सरकारनें ग्रंथालयखातें सुरू केलें आहे. पुण्यामुंबईतल्याच नाहीं तर आतां अनेक स्थळीं उभ्या झालेल्या महाविद्यालयांच्या इतिहासांत अलिकडेच प्रथमच 'ग्रंथालय' हा संस्थेचा एक विभाग व 'ग्रंथपाल' या सेवकाची स्वतंत्र नेमणूक गृहीत धरली गेली आहे. वेतनश्रेणीहि ठरली आहे. क्रमानें ही ठरवाठरवी सगळ्याच प्रकारांच्या ग्रंथालयांमधील सेवकांविषयीं होणारसें दिसतें आहे. या साठीच्या सर्व सावकाश पण हमखास परिणामकारक हालचालींमाणें पुण्यांत प्रथमतः पुणें ग्रंथालयसंघ, मुंबईत मराठी ग्रंथालयसंघ व त्या द्वारें भरलेल्या मुंबई व उपनगर परिषदा, खानदेश-कुलाबा जिल्ह्यांचे ग्रंथालयसंघ, नागपूरचा विदर्भ ग्रंथालयसंघ, औरंगाबादचा मराठवाडा ग्रंथालयसंघ आणि आतां तमाम मराठी प्रदेशांत ठाम उभा झालेला महाराष्ट्र ग्रंथालय संघ, त्यांच्या परिषदा व त्यांची आस्तेकदम होत आलेली चळवळ आणि १९४७ पासून आतां अठरा वर्षांवर चालू असलेला व परीक्षार्थींचा पाठिंबा नि कालक्रमांत सरकारची मान्यता संपादन केलेला संघाचा ग्रंथपालनवर्ग आणि त्याचे मुंबई, नागपूर, औरंगाबादचे त्रिवर्गबंधु, त्याचप्रमाणें ग्रंथपालनाचे वृत्त देणारें 'सहकार हें संघाचें मासिक आणि ठिकठिकाणच्या पत्रांनीं प्रसिद्धिलेले आम्हा अनेकांचे ग्रंथपालनविषयक असंख्य लेख हें सर्व निश्चयानें आहे. या सर्व प्रकारच्या ग्रंथपालनोन्नतीच्या आमच्या पिढीनें अखंड चालविलेल्या प्रयत्नामागें श्री. पारखी यांचें याविषयाचें मूळारंभकार्य बीजरूपानें दिसून येतें. मीं वर गणती केली आहे तें कार्य १९४० च्या सुमारानतरच्या २२-२४ वर्षांमधलें. पण त्याहि आधींपासून १९२२ मध्यें फर्ग्युसन कॉलेजांत ग्रंथालयाची सेवा पत्करल्यानंतरच्या १८-२० वर्षांच्या काळांत श्री.

पारखींनीं एकनिष्ठेनें ग्रंथपालनव्यवसायाविषयीं जेथें जेथें शक्य होईल तेथें तेथें, जेव्हां जेव्हां इष्ट दिसेल तेव्हां, ऐकून घेतील त्यांच्याशीं वार्तालाप केले. त्यांमधूनच त्यांचा 'ग्रंथालयशास्त्राचा ओनामा' प्रकाशाच्या पाटीवर आला. तें सन १९३३ मध्यें, ज्यावेळीं 'ग्रंथालय' आणि 'ग्रंथपाल' म्हणजेच केवळ पारखीच होते नि आठवणींत, वोटावर व यादींत पारखीचेंच एकमेव नांव होतें तेव्हां.

'ग्रंथपाल' हा शब्द ग्रंथपालनाच्या परिभाषा-टांकसाळींतलें १९४० नंतरचें नाणें आहे. ग्रंथालय व ग्रंथपाल या दोहोंचा जुना अर्थ व संकेतहि आजच्यापेक्षां फारच फरकाचा होता. प्रा. चिं. वि. जोशी यांच्या 'नव्या ग्रंथपाला'नें (चिं. वि. जोशीकृत 'नवें भारूड', आवृत्ति १, पानें १४३ ते १५२) खरें ग्रंथालय व नवा ग्रंथपाल आणि जुनें ग्रंथालय नि जुनाट ग्रंथपाल चिरस्मरणीय रीतीनें दाखवून दिला. आज तें जुनें चित्र पुसट होत चाललें आहे. तो जुनाट ग्रंथपाल पडद्याआड गेला आहे. नवीन ग्रंथालयें तुरळक उभीं झालीं आहेत. त्यांआधीच 'नवा ग्रंथपाल' निर्माण झाला आहे. आज 'शालेय ग्रंथालय' म्हटल्यावर पुण्यांतलें नूतन मराठी विद्यालयाचें आणि 'महाविद्यालयीन ग्रंथालय' म्हटल्यावर सर्व प्रथम म्हणून पुण्याचेंच फर्ग्युसन महाविद्यालयाचें ग्रंथालय असंख्यांना आठवतें. महाविद्यालयीन परीक्षांच्या मांडवांतून गेलेल्या सुशिक्षितांच्या मनःपटलांवरच नव्हे तर चित्र-पटांमध्येहि हें फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचें चित्र कायम ठसलें आहे. आचार्य अत्रे यांची 'मोरूची मावशी' त्या ग्रंथालयांत बसत होती असें त्यांनीं दाखविलें आहे. इतकें त्याचें आकर्षण निर्माण झालेलें आहे. हा त्या ग्रंथालयाचा महिमा जो प्रस्थापित झाला त्यामागे त्या संस्थेच्या दूरदर्शी अधिकाऱ्यांप्रमाणेंच श्री. पारखींचाहि भाग आहेच. कारण ती नवी इमारत होण्याआधीपासूनच श्री. पारखी तेथले ग्रंथपाल होते.

ग्रंथपाल पारखी ही शब्दांची जोडगोळी एकत्र आली कीं मला नेहमींच अशाच आणखी कांहीं जोडगोळ्यांची आठवण होते. टंकयंत्र म्हणजेच रेमिंग्टन. रँग्लर म्हणजेच आप्पासाहेब परांजपे. तर्कशास्त्र नि तत्त्वज्ञान यांचे कुशल प्राध्यापक तसेंच तरुणप्रिय कादंबऱ्यांचे कुशल लेखक म्हणजेच आप्पासाहेब फडके. हिंदुपदपातशाही म्हणजेच तात्याराव सावरकर. रत्नागिरी म्हणजेच

हापूस आंबा. तसेंच ग्रंथालय म्हणजे पारखी. इतकें अनन्य साहचर्य आणि समीकरण ग्रंथालय नि पारखी या दोन शब्दांचें आहे. हें साहचर्य नि समीकरण एखाद दुसऱ्या दिवसाच्या बैठकीचें नाहीं. काल ग्रंथालयांत आले नि लगेच्च आज ग्रंथपाल झालेसें दाखवीत आहेत असें चुना फासून तें पक्क झालेलें नाहीं. प्रत्येक वाचकाभ्यागताला अंतरामधील गुप्तसुप्त व्यग्रता व व्यथा विसरून हास्यमुखानें आवाहणारे पारखी यांनीं एका सामान्य लेखल्या गेलेल्या ग्रंथालयकारकुनाचें ग्रंथपाल नामक ग्रंथालयाधिकाऱ्यांत वाहत्या कालांतरामध्ये रूपांतर करून टाकलें आहे. दृष्टिकोनांतील ह्या बदलाचा निर्विवाद ओनामा पारखींनीं घालून दिला. व्यवसायाला त्यांचें हें अतिशय मोलाचें देणें आहे. आपल्या एकाहून एक कर्तृत्ववान, गुणज्ञ, मर्मज्ञ अधिकाऱ्यांची सहानुभूति व साह्य ग्रंथालयाकडे खेचून आणण्याच्या त्यांच्या कामगिरीचा इतिहास आतां मोठा मनोरंजक वाटतो.

ग्रंथालय हा शब्द जुन्या अर्थानें रूढ होता. ग्रंथपाल हा शब्द जिभेवर आलेला नव्हता. तसा माणूसच्च कोठेंहि नव्हता वा त्याच्याकरता तशी गादी म्हणजे जागाच्च कोठेंहि नव्हती. तशी गादी निर्माण करावी व तीवर ग्रंथपाल या किताबतीनें आपल्या कोणाला तख्तनशीन करावें असें कोणाहि अधिकाऱ्यांच्या ध्यानामनांतच्च नव्हतें. अशा काळीं पारखी ग्रंथालयांत शिरले. १९२२ च्या त्या जुन्या काळांतली ही गोष्ट. ग्रंथालयांत शिरले म्हणजे एका जुन्या खोलींत सामावलेल्या ग्रंथालयांत शिरले. आजच्या भव्य, सुप्रशस्त, सुप्रकाशित जेरबाई ग्रंथालयांत नव्हे. या ग्रंथालयाचे वेळोवेळचे अधिकारी व उपाधिकारी यांच्या अनेक परीच्या सूचना, केव्हां ग्रंथपालनाला गैरसोईच्या असल्या तरीहि, त्यांनीं मोठ्या काळजीनें कार्यवाहींत उतरवल्या आणि त्यायोगें त्या सर्वांस संतुष्ट राखलें. त्यामुळेंच ते इतका तीस वर्षांचा दीर्घकाल तेथें बसूं शकले. तत्कालीन ग्रंथालयीन कल्पनांतून नवीन कांहींतरी परिचित नि प्रचलित होण्यास त्यांची तेथली जुळाऊमिळाऊ वागणूकच्च कारण झाली. हें त्यांचें काम तीस वर्षांमधलें. अखंडपणें तीस वर्षें या कामांत त्यांना पाहणाऱ्या असंख्यांनीं बसविलेलें हें समीकरण आहे.

तीस वर्षें ! नवीन ग्रंथालयसेवकांना हा काळ केवढा लांब नि कमर अन् उमर मोडणारा आहे हें मुळींच्च जाणता येत नाहीं. आज तो इतिहास मनो-

रंजक वाटतो. कारण आतां आरंभकाळांतील एकूण अडथळे-अडचणी न उरल्यानुळेंच त्यांतील रंग आपण पाहूं शकतो. ते रंगराग आतां कांहीं त्या तीव्रतेनें अनुभवावे लागत नाहींत. परमपूज्य शिवाजीमहाराजांना स्वराज्य-संपादनार्थ केवढें अखंड नि प्रचंड मूळारंभकार्य करावें लागलें तें जसें अनेकांच्या यथार्थतेनें ध्यानांत येत नाहीं, बहुशः तशीच ग्रंथपालन या विषयाच्या मूळारंभाची नेमकी कल्पना नवीनांना कधींच येत नाहीं.

पारखींच्या मागाहून, जवळपास दोन तपें मागाहून, ग्रंथालयांमध्यें आलेल्या आम्ही गेल्या दीडतपामध्यें संधीमागून संधी मिळवून ग्रंथालयें व ग्रंथपालन हीं दोन विषयनामें नि ग्रंथपाल हें एक नवें व्यवसायनाम रूढ करण्याचा सतत प्रयत्न केला. त्याचा परिणाम निश्चित झालेला आहे. आज ग्रंथालयांत नव्यानें कोणीहि आला तर तो तेथलें काम कांहीं प्रमाणांत तरी बहुशः जाणतो. बारीकसें का होईना, कांहीं एक ठराविक क्रमाचें वेतन त्याला मिळतें. आम्ही सुरू केलेल्या ग्रंथपालनवर्गांत येऊन परीक्षा उत्तीर्ण करतां येते. विद्यार्थिनीहि मोठ्या संख्येनें ही परीक्षा देत आहेत. केवळ दोड महिन्यांत साधणारी ही सोय आहे. वर्गांच्या या सोयीमुळे सरकारच्या शिक्क्याचें नि सरकारी ग्रंथालयाधिकाऱ्यांच्या सहीचें प्रशस्तिपत्र हातांत घेऊन अनेक उमेदवार ग्रंथालयांत येऊं शकतात. कांहीं प्रमाणांत तरी वेतनाची अटकळ ठेवून ही नवी मंडळी येतात. "ग्रंथालयसेवकांचें वेतन नीट ठरवा. त्यांच्या निवृत्तिवेतनाची सोय करा. त्यांस प्रकृतिस्वास्थ्यासाटीं, जीवनोपभोगासाठीं इष्ट तें स्वास्थ्य द्या" असा कंटशोष गेलीं वीस वर्षें आम्ही मंडळी करीत आहों.

पारखींच्या वेळेला हें असलें कांहींहि नव्हतें. ग्रंथालय व ग्रंथपालन म्हणजे काय हें पारखींना स्वतःच परिश्रमानें व पूसतपासानें समजून घ्यावें लागलें. तें समजून घेत असतांनाच ग्रंथालयांत येणाऱ्यांना समजावून द्यावें लागलें. वयाच्या २१ व्या वर्षीं म्हणजे १९२२ त ते फर्ग्युसनच्या ग्रंथालयांत सेवेकरी झाले. प्राचार्य केशवराव कानिटकरांच्या सांगीवरहुकूम लक्षपूर्वक काम करून त्या डोळस अनुभवाच्या जोरावर ग्रंथालय लावलें. १९२२ नंतरच्या आठदहा वर्षांच्या कालावधींत या विषयाची परीक्षा असते हें हुडकून काढलें. नंतर ती परीक्षा देण्याची मोठी खटपट केली. त्यांनीं पहिलें प्रशस्तिपत्र घेतलें तें अमेरिकेंतलें. त्या काळांत आजच्यासारखीं विमानें नव्हतीं. बोटीहि बहुतेक बऱ्याच

हळू चालत. पुण्याकडे आतां बोट माहिती नसणारे बहुधा नसतील. पण मी वर्णन करतों आहें त्या काळांत फक्त हाताचेंच बोट माहिती असेल. अशा त्या १९३० च्या आसपासच्या काळांत टपाल-बोटीनें अमेरिकेस रवाना झालेल्या उत्तरपत्रिकांचा निकाल केव्हांसा येणार याची कांहींहि अटकळ पारखींना करतां येत नव्हती. आजच्या आमच्या वर्गाचे निकाल निदान जुलैंत प्रकट होणार हें सर्व विद्यार्थ्यांना माहिती असतें. पण नेमकी तारीख दिलेली नसते. वर्गाच्या परीक्षा १० जूनच्या सुमारास संपल्यापासूनचे निकाला-पर्यंतचे पांचसहा आठवडे आजच्या परीक्षार्थींना असह्य होतात. पण पारखींना त्या हळू चालणाऱ्या बोटींच्या काळांत पांचसात आठवडेच नाहीं तर नऊवर महिने वाट पाहावी लागली. त्यानंतर एकदाचें तें प्रशस्तिपत्र आलें बापडें. आणि मग कांहींसें भीतभीत, कांहींबहुत संकोचत, पहिल्या अपत्याच्या जन्म-वृत्ताबाबत पंचविशींतल्या पित्याला जें व जसें काहीं त्या काळीं वाटे तें व तसें वाटण्याच्या अवस्थेंत त्यांनीं तें आपल्या वरिष्ठांच्या पुढें केलें. आज ग्रंथा-लयांत येणारा प्रत्येकजण आपलें प्रशस्तिपत्र किंवा मान्यतापत्र जणूं फडफडावीत प्रवेश करतो. आणि पहिल्या वेतनापासून पेन्शनपर्यंतचें सगळेंच्या सगळें लगेच अपेक्षून पाहूं लागतो.

पारखींच्या वेळीं यांतलें काय होतें? कांहींहि नव्हतें. अहो, ग्रंथालय हें स्थळच मुळीं फर्ग्युसन कॉलेज या संस्थेनें त्यांच्यावेळींच नव्यानें निर्माण केलें. आणि तें स्थळ असें होतें कीं ढुंकूनहि त्याच्याकडे कुणी वळूं नये नि पाहूं नये नि पसंत करूं नये. ग्रंथालयाच्या या परिस्थितींत अगदीं आत्तासाच किंचित्सा बदल होत आहेसें वाटतें. पारखींनीं तें स्थळ पसंत केलें नि निष्ठेनें पत्करलें. स्थळ पसंत करण्यावरून नि निष्ठेनें पत्करण्यावरून मला पारखींची सानेगुरुजींशीं तुलना करावीशी वाटते. पारखींनीं तें पत्करून अंगवळणीं पाडलें. एकवार तेथें येणारांनीं पुनःपुन्हा, वारंवार यावें अशी मांडणी प्रथम केली येणाऱ्या सर्वांशीं बोलण्याची एक वेगळी ग्रंथालयीन संदर्भभाषा आपल्या तोंडवळणीं आणली. या कामांत व त्याच्या चिंतनांत सदैव राहिल्यामुळे उद्रेक पावणारी या कामासंबंधींची माहिती लेखांद्वारें सामान्यजनांना ते मराठींतून देऊं लागले. १९३२ च्या उन्हाळ्याच्या सुटीच्या महिनाभरांत मद्रासला जाऊन गुरुवर्य रंगनाथन् यांच्याकडून ग्रंथपालनविद्येचा बीजमंत्र घेऊन ते आले.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना जसें त्यांचें तें ग्रंथालय व आपण स्वतः ग्रंथपाल हें त्यांनीं माहिती करून दिलें, तशीच सर्व सामान्य जनांना केसरी, ज्ञानप्रकाश इत्यादींत लेख लिहून ही माहिती दिली. त्यांतूनच 'ग्रंथालय-शास्त्राचा ओनामा' नामांकित झाला. अंगीकारलेल्या व्यवसायाची शक्य त्या खटपटीच्या वाचनानें नवी माहिती गोळा करण्याचा व गोळा केलेली माहिती त्याच खटपटीनें इतरांपुढें मांडण्याचा त्यांना अविरत नाद लागलेला आहे. मराठी व इंग्रजी असें त्यांचें बरेंच फुटकळ लेखन झालेलें आहे. तसेंच कांहीं ग्रंथहि (१) ग्रंथालयशास्त्राचा ओनामा; १९२३; पृ.२५. (२) डेसिमल ॲंड कोलन क्लासिफिकेशन्स; १९४५; पृ. १५०. (३) रेफरन्स सर्व्हिस इन् लायब्ररीज; १९४५; पृ. १९२. (४) प्रिन्सिपल्स ऑफ लायब्ररी क्लासिफिकेशन, पार्ट वन्; १९५०; पृ, १९०. (५) द्विबिंदुवर्गीकरण पद्धति, भाग १ ला; १९५६; पृ. ४७८. (६) ग्रंथपालनाची तोंड ओळख; १९६३; पृ. १२४. अशी त्यांची लेखनकामाठी झालेली आहे. त्यांच्या या नादांतूनच आमच्या ग्रंथपालन या अज्ञात विषयाला आजचें ज्ञात स्वरूप क्रमशः नि कणशः आलें आहे. केसरींत व ज्ञानप्रकाशांत त्यांचे लेख येऊं लागले त्यावेळीं मी कुमार वयांत होतों. पारखींचें तें अगदीं वेगळ्या, बहुतांशानें अदृष्टपूर्व नि अश्रुतपूर्व अशा विषयाचें लेखन मला कुतूहलानें पहावेंसें वाटे. त्या लेखांमुळेंच वाङ्मय-भांडारांतलें हेंहि एक वेगळें दालन आहे ही मला अनेकांप्रमाणेंच कल्पना आली. आणि मी ग्रंथपालनविद्यार्थी झाल्यादिवसापासून माझ्या परीनें त्या दालनांत फेरफटका करूं लागलों. पारखींनीं तयार केलेल्या रस्त्यावरच आम्ही त्यांच्या मागून येणाऱ्या पदवीधर ग्रंथपालनाभ्यासकांनीं पावलें टाकलीं.

महाराष्ट्रीय ग्रंथपालांपैकीं ग्रंथपालनाचा पद्धतशीर अभ्यास स्वग्रामाबाहेरच्या वर्गांत जाऊन करून येणारे पारखीच पहिले होत. डॉ. पु. म. जोशी, वाकनीस, मुळे, कानिटकर, भागवत ही आमच्यांतली ज्येष्ठ मंडळी पारखींनंतर ग्रंथपाल झालेलीं. मागाहूनचे आम्ही सर्व पदवीधर असूनहि व १९४० नंतरच्या काळांतहि आम्हाला कसला काळाकभिन्न काळोख दिसला नि वाटेंतले कसले कठिण काळे फत्तर फोडावे लागले कीं, ज्यांनीं कचदिलांची उमेद पार मरगळून जावी ! मग १९२० लगोलग येणाऱ्या पारखींना कोणत्या वाटेनें चालावें लागलें असेल याचा विचार आमच्या मनांत कुतूहल नि कौतुक उभें करतों. अर्थात्

प्रा. केशवराव कानिटकर, रँग्लर महाजनी, प्रा. वाडेकर वगैरे अधिकाऱ्यांबाबत व त्यांच्या ' फर्ग्युसन ' बाबत त्यांनीं वेळोवेळीं सांगितलेलें मी जें ऐकलें त्यावरून आमच्याप्रमाणें प्रगतीची वाट तयार करण्याचे कष्ट त्यांना कमी पडले असावेत. नाहींतर बसल्या जागीं टिकाव धरण्यांतच त्यांचें आयुष्य संपलें असतें. त्यांच्या हळव्या स्वभावाला दुखविणारी त्यांची ती अधिकारी मंडळी नव्हती. म्हणूनच ते टिकले व त्यांच्या हातून आमच्या व्यवसायाच्या लेखनाचा ओनामा लिहून होऊन तो आम्हाला गिरविण्यास मिळाला. सर्व सामान्य जनांना ग्रंथपालनाचे मराठींतून लेख देणारे ते अगदीं प्रथमांतले.

त्या लेखनाआधी त्यांना किमान कांहीं अनुभव घ्यावे लागले असणार. किमान कांहीं चिंतन करावें लागलें असणार. किमान कांहीं मनासारखा लेख तयार होईपर्यंत पुनः पुन्हा लिहावें लागलें असणार. हें जें जें लेखन त्यांनीं केलें तें तें नम्रभावानें व अगदीं शिष्यवृत्तीनें. वरिष्ठ असणाऱ्या प्राध्यापकांना दाखवून. त्यांच्या सूचनाप्रमाणें सुधारण्याचें काम वारंवार करावें लागलें असणार. त्यानंतर संपादकमहाशयांना हा नवा विषय पटवून देऊन त्यासाठीं किमान तरी जागा मिळवून द्यावी लागली असणार.

या उलट आज ' मी माझ्या चुटपुरत्या वेळात हें इतकं लिहिलं आहे ' असें म्हणत व ते कागद पुढे धरीत नि पुढेपुढे करीतच नवे लोक ग्रंथालयीन सेवेंत येतात. या सर्व तऱ्हांच्या कामांचें सर्व अनुभव घेऊन मागाहून येणाऱ्यांची पारखींनीं तयारी केली. हे सर्व अनेक दिवस, अनेक महिने, अनेक वर्षे प्रसंग शोधून व व्यासंग अखंड ठेवून त्यांनीं केलें. तेव्हांच गुरुवर्य डॉ. रंगनाथन् पद्मश्री यांनीं ' माझा पहिला मराठी शिष्य ' अशी पारखींना किताबत दिली. ग्रंथालयाविषयींच्या व गुरुजींच्या अनन्य भक्तीमुळेच महाराष्ट्राचें नांव भारताच्या ग्रंथालयजगतांत माहिती झालें. तसेंच उंचहि झालें आहे. आमच्या व्यवसायाच्या दृष्टीनें हें अनन्यसाधारण काम करणारे पारखी हे ग्रंथपालनाचे पहिले पाईक होत.

या लेखाच्या आरंभीं सांगितलेली श्री. पारखींची मला असलेली पहिली आठवण केवळ अविस्मरणीय आहे. ग्रंथालयीन स्वागत म्हटलें कीं तें दृश्य माझ्या मनश्चक्षूंसमोर उभें ठाकतें. उत्तररामचरित्रांतील " घोडा घोडा म्हणून म्हणतात तो प्राणी " त्याच्या विविध शबल वैशिष्ट्यांमुळे तो दिसल्या क्षणा-

पासून जसा त्या कुमाराच्या ध्यानांत ठसला तसाच ग्रंथपाल हा व्यावसायिक पारखींना पाहिल्यापासून त्यांच्यांतील ग्रंथपालत्वामुळें माझ्या ध्यानांत ठसला आहे. आणि आरंभीं दर्शविलेल्या दुसऱ्या चित्राच्या पार्श्वभूमीवर तर अगदी चिरस्मरणीयतेनें. ग्रंथपालनाच्या इतिहासाचा आरंभ करून देणाऱ्या या पहिल्या पाइकाला माझे प्रणाम !

* * *

# ६. एक भला ग्रंथपाल--

## श्री. शं. ना. बर्वे

" आलोच हं. जरा थांबायला वेळ आहे ना?"

कितीहि गहन गरजू अभ्यासक, चिकट संदर्भशिकारी येवो त्या प्रत्येकाला वरीलसारखे कांहीं स्मितयुक्त मृदु शब्द केसरी ग्रंथशाळेचे सौजन्यशील ग्रंथपाल बर्वे यांच्या तोंडून ऐकावयास मिळतील आणि त्या शब्दांमागील सात्त्विकतेमुळें नंतर थांबावें लागलें तरी त्याविषयीं तसें कांहीं वाटणार नाहीं. अर्थात् तसें जास्त वेळ कोणालाहि थांबावें लागत नाहीं कारण तें ग्रंथालय स्वतंत्र आहे. संपादक मंडळींसाठींच तें मुळांत व मुख्यतः सुरू झालें. माझ्या ग्रंथालयासारखें तें उच्च ध्येय-घोषांत ' मुक्तद्वार ' म्हणून आपल्या आजच्या लोकशाही जमान्यांत सर्वजनांच्या सेवेसाठीं रुजू झालेलें नाहीं. किंवा महाविद्यालयांच्या ग्रंथालयांकडे ' संभाविती ' ( म्हणजे फॅशन ) च्याच कल्पना बहुंशानें धारण करणारे तेथले विद्यार्थी, तशा रीतीच्या वाचन-व्यवहारासाठीं वळतात-रेंगाळतात, तसलेंहि हें केसरीचें ग्रंथालय नाहीं. यामुळें तेथें मोजकेच नि खरे उच्चाभ्यासकच तसेच कसलीहि तक्रार वा हक्क दाखविण्याची मोकळीक नसणारेच सर्व येतात. तेव्हां वाचकांची संख्या अगदीं परिमित असल्यानें आणि ग्रंथादि वाचनीयांचीहि अनावर विविधता नसल्यानें, संपादक मंडळीं-साठींच्या संदर्भशोधांत श्री. बर्वे गुंतलेले नसले म्हणजे, वाचकांना त्यांचीं वाचनीयें देण्यासाठीं, तसा जास्त वेळ केव्हांच लागत नाहीं. पण जर केव्हां तसें होणें अपरिहार्य दिसेल तर श्री. बर्वे यांच्या नित्य स्वभावाविर्भावामुळें

कोणीहि रुष्ट होत नाहीं.

केसरी अलिकडेच दैनिक झाला आहे. पण पूर्वीहि त्याचें संपादकमंडळ मोठेंच होतें. आतां तर आणखीच मोठें झालेलें आहे. त्यांच्यापैकीं कोणीहि त्यांच्याकडे येतात. मान्यवर तात्यासाहेब केळकर वा करंदीकर हे दोन तात्या त्या आवारांत वावरत होते तेव्हां त्यांच्या स्मरणनोंदींप्रमाणें अनेक संदर्भांची जंत्री श्री. बर्वे यांना करावी लागे. हे दोघेहि ग्रंथालयांत येऊन श्री. बर्वे यांना जरूर ती कामगिरी सांगत. हा उल्लेख श्री. बर्वे मुद्दाम करतात. ग्रंथपालाला ऊठ सूट हरकामासाठीं हाका मारून पायपिटी करावयास लावणारे अधिकारी कोठें आढळले तर श्री. बर्वे आवर्जून सांगतात, "आमच्या इथें हें नाहीं. मी ग्रंथपाल असलो तरीहि मला तशी तकलीफ जुन्या मंडळींनींहि दिली नाहीं व आजचे जयंतराव आणि इतर एकूण त्यांच्या भोंवतीचीं नवीं मंडळीहि देत नाहींत. सर्वजण ग्रंथालयांत येऊन काय हवें तें मागण्याचें, घेण्याचेंहि सौजन्य दाखवितात." ग्रंथशाळेचा व ग्रंथपालाचाहि मान हीं सर्व मंडळी राखत आलीं. तेथले पहिले क्यूरेटर आणि 'सह्याद्रि मासिक' व 'केळकर मंडळ यांचे संपादक-सूत्रधार श्री. बापूराव काळे यांच्या सूचनांच्या व मार्गदर्शनाच्या सपाट्यानुसार कोणत्या ना कोणत्या हालचाली व धावपळ श्री. बर्वे यांना पळापळाला करावी लागे. आमचा ग्रंथालयसंघ, ग्रंथपालन वर्ग, वसंतव्याख्यानमाला, प्रशालेय व महाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा इत्यादि ज्या ज्या चळवळींना व कार्यांना केसरीसंस्थेनें आणि ग्रंथालयानें आसरा दिला त्यांच्या अगणित कामांनिमित्त गेल्या ३०-३२ वर्षांच्या कालक्रमांत श्री. बर्वे यांना इकडून तिकडे फेऱ्या, जिन्याची चढउतर, पूर्वीचे दोघे तात्यासाहेब व आजचे जयंतराव यांच्या करवीं त्या त्या चळवळीच्या कार्यकर्त्यांचीं कामें समजावून जुळवून देण्या-घेण्यासाठीच्या भेटी व बैठकी अनेकशः कराव्या लागल्या व सततच कराव्या लागतात. केसरीसंस्थेच्या स्वतःच्या व आश्रयानें असलेल्या अनेकविध उद्योगांमध्यें त्यांच्या पायपिटीचें व खटपटीचें अमोल सहकार्य असतें. यांतच ग्रंथालयांत अभ्यासक म्हणून येणाऱ्यांना हवें तें देऊन, केव्हां कांहीं मुदतीचें आश्वासन देऊन, केव्हां अवश्य तर माझ्यासारख्या बाहेरच्या कोणा ग्रंथपालबंधूचा हवाला देऊन कोणालाहि न दुखवतां-रुसवतां मार्गस्थ करणें हें कौशल्याचें काम आहे आणि या प्रकारच्या कामांत ते चांगलेच तरबेज झाले

आहेत. ग्रंथपालनाच्या अभ्यासांत वाकबगार होऊन येणाऱ्यांनासुद्धा जें नीट साधत नाहीं तें त्यांना उत्तमरीतीनें अवगत आहे. त्यांचा हा स्वभावोपजत गोडवा मी व अनेकांनीं गेल्या सर्व काळांत अनुभवला. पूर्वीं तो अनन्य रीतीनें तेथे वसे. आज श्री. बर्वे क्यूरेटर झाल्यापासून तो अन्योन्यस्पर्शी झालेला स्पष्ट दिसतो. लीनता व मृदु हास्य यांखेरीज अन्य कांहींहि त्यांच्या तोंडावर व वागण्यांत आढळायचें नाहीं. दुसऱ्याला लागणारा शब्द तोंडीं यायचा नाहीं. लागणारे शब्द ज्या तोंडून येतील त्या तोंडाला लागायचें नाहीं. ही त्यांची 'बरवी' रीत आहे. ह्या बरव्या रीतीचे त्यांचे लीन, मृदु व स्नेहाळ शब्द माझ्या व अनेकांच्या चांगले तोंडपाठ आहेत.

१९३० च्या सुमारास त्यांचे वडील अकल्पितपणें निवर्तल्यानें चांगल्यापैकीं अभ्यास असणाऱ्या व पुढे अधिक श्रेयानें महाविद्यालयीन अभ्यास पुरा करण्याची मनीषा बाळगणाऱ्या या विद्यार्थ्याला अभ्यास सोडून देणें भाग झालें. चांगल्या परिस्थितींत असलेल्या कुटुंबाचा सर्वांत वडील पुरुषघटक या नात्यानें अल्पवयांत कुटुंबभार डोक्यावर घेऊन नोकरी पत्करण्याचा व्यवहार त्यांस साधावा लागला. १९४० नंतरच्या युद्धकाळांत मी ग्रंथपालनाचा अभ्यास डोक्यावर कर्जाचा बोजा करून पुरा करून आलो आणि ग्रंथपालाच्या गादीच्या वासावर फिरूं लागलो. अल्प असला तरी नित्य खात्रीचा पगार देणाऱ्या व त्याच्या भरीला शिकवण्यांची साथ देऊं शकणाऱ्या मुख्याध्यापकीय वा अध्यापकीय नोकरीला काडीभरहि महत्वाची न म्हणतां 'आतां नको' म्हटलें अध्यापनाची पदवी मोडींत टाकून देऊन मोकळा झालों. त्या १९४० पावेतोच्या स्त्रियांचें उच्च शिक्षण सवंग नसणाऱ्या काळांतल्या उच्च शिक्षण घेऊनहि नोकरी न करण्यांत ऐट मिरवणाऱ्या शिक्षित पत्नीप्रमाणें माझी उच्चाभ्यासाची ग्रंथपालनगादी युद्धकालीन अन्य आमिषांमध्यें गुरफटल्यामुळें मला जवळ येऊं देईना. असा कोंडींत पडलों. १९४२ नंतरची महागाई खाऊं पहात होती. जवळचें शिक्षण धाक देत होतें. घरांतलीं तीन वडील व दोन ल्हानगीं मिळून पांच तोंडांच्या दर्शनानें नि जाणिवेनें पांचावर धारण बसत होती. अध्यापनाची बी. टी. व ग्रंथपालनाची डिप्. लिब्. या पदव्यांसाठींच्या बोजानें बेजार झालों होतों. अशा कमनशिबानें आलेल्या युद्धकालीन आपत्तींतच श्री. बर्वे यांची माझी ओळख झाली व ती युद्धकालीन जीवनसंग्रामांतील

महागाई आणि अंगीकारलेल्या सेवास्थानींच्या जीवनांतील जीवघेणी धणाघाई यांमुळें वाढली व टिकली. आमचें समानशील नसेल. ते जुळतें मिळतें घेत वागणारे तर मी नित्य नव्या चढाईलढाईचे पवित्रे घ्यावे लागलेला पण आम्ही समानव्यसन मात्र निश्चित आहों. अर्थात् व्यसन म्हणजे चहा, चिरूट, चकाट्या यांत मग्न होण्याचें नव्हे. तर सेवास्थानांतील अधिकार–अहं–मदाच्या मनःसंशयकल्लोळांचें. तसल्या समानव्यसनांमुळे आमचें सख्य जुळलें व तें आजपावेतों अभंग आहे.

हें अभंगत्व त्यांच्या गोड्या स्वभावाचाच परिपाक आहे. कारण त्यांच्या या स्वभावाची बैठकच सौजन्यपूर्ण आहे. त्यामुळेंच त्यांना मान्यवर तात्यासाहेब केळकरांचा प्रथमतःच भक्कम आश्रय व नंतर निर्लेप उत्तेजन सतत मिळत गेलें. १ ऑगस्ट १९३२ या दिवशीं केसरी मराठा ग्रंथशाळा सुरू झाली आणि त्यांच्या प्रकृति-प्रवृत्तीनुसार त्यांना हमखास प्रगतीचें क्षेत्र सापडलें त्यांचा मूळचा पिंड साहित्यिकाचा आहे. शाळेंत ते शाळेच्या नियतकालिकाचे विद्यार्थीनियुक्त संपादक होते. तेथपासूनच लेखनाचा जोमदार अंकुर त्यांच्या ठायीं होता. केसरी ग्रंथालयांत या अंकुराला पुष्टिकारक खाद्य सदैव मिळत गेलें. केसरींत अभिप्रायार्थ येणारीं बहुतेक पुस्तकें अगदीं शेलक्या साहित्यगुणांचीं असतात. अभ्यासाची दृष्टि ठेवणाऱ्याला त्यावरून मराठी वाङ्मयाच्या वाढविस्ताराची भङ्गशानें अद्ययावत् माहिती मिळते. बर्वे यांच्या साहित्यिक प्रकृतीला हें खाद्य बरेंच मानवलेलें आहे. ते कविता नेहमींच लिहीत आले. त्यांच्या कवितेची रचना कविवर्य गिरीशांच्या पठडींतली सोप्या, नेटक्या व ठाकठीक बांधणीची असते. ‘ स्वातंत्र्यवीर ’ हें मान्यवर तात्याराव सावरकरांचें काव्यमय चरित्र काव्यबद्ध करून त्यांनीं १९४८ त प्रसिद्ध केलें. इतर स्फुट कविताहि बरीच आहे. नाटकांचे मुखवटेहि त्यांनीं आपल्या लेखकाला चढविण्याचा प्रयत्न केला आहे. ‘ अढळपद ’ हें ध्रुवचरित्रावरील त्यांचें नाटुकलें शालेय रंगभूमीवर आलेलें आहे. तसेंच ग्रंथालयीन जीवनांतील अनुभव गंमतीनें एकत्र गोवणारें ‘ शारदामंदिर ’ हें नाटुकलें १९४९ सालीं पहिल्या महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेंत पुणें ग्रंथालय संघ व त्याचा ग्रंथपालनवर्ग यांमधील कार्यकर्त्यांनीं अभिनीत केलें. तें १९५० सालीं मुंबई येथील परिषदेंत पुस्तकरूपांत प्रसिद्ध झालें. त्याचे अलिबाग, पाली–सुधागड येथें प्रयोगहि

झाले. ग्रंथपाल या नात्याची कांहीं पद्धतशीर, अनुकरणीय कामगिरी नाटक या मासिकांत सूचीच्या रूपांत क्रमशः प्रसिद्धी पावत होती.तशीच संघाचें कालिक ' सहकारमध्येहि ते प्रतिमास नवप्रकाशित लेखांची यादी देत आले. संगीतचूडामणि पंडित विनायकराव पटवर्धन यांचें त्यांनीं एक लहानसें चरित्र लिहून बुवांच्या षष्टयब्दिपूर्तिसमारंभांत प्रसिद्ध केलें आहे. त्यांच्यांत अभिनयाचेंहि उत्तम अंग आहे. नागपूर, पुणें, औरंगाबाद येथील परिषद कार्यक्रमांत ' बिचारा ग्रंथपाल ' ऊर्फ ' ग्रंथपालावरील खटला ' हें एक नाटुकलें सादर झालें. त्यांत त्यांनीं हरिदासाची केलेली भूमिका अनेकांना आवडली. मान्यवर विठ्ठलराव घाटे यांनीं त्यांची पाट थोपटली. त्यांचे वाङ्मयाभिनयाचे गुण जाणणारे श्री. गोपीनाथनाना तळवलकर व व्यंकटराव माडगूळकर यांच्या निमंत्रणानें व प्रोत्साहनानें त्यांचीं भाषणें आकाशवाणीवरून ऐकवलीं गेलीं आहेत. त्याचप्रमाणें ' जत्रा ' हें बालनाट्य व ' राणीचा बाग ' ही संगीतिका ध्वनिक्षेपित झाली आहे. सह्याद्रि मासिकांत दर सहा महिन्यांनीं जी उपयुक्त सूची येत असे ती करणारांपैकीं ते एक होते. केसरीचीहि प्रारंभापासूनची तशी सूची तयार व्हावी अशी त्यांची इच्छा व कल्पना आहे. त्याप्रमाणें त्यांनीं कांहीं नमुन्याचें काम व पुढील कामाची तयारी संपादक जयंतराव यांच्या प्रोत्साहनानें केली आहे.

१९५७ पावेतों ते त्यांच्या ग्रंथालयाचे ' असिस्टंट क्यूरेटर ' संबोधले जात. पण आम्ही इतर त्यांस आमच्यांतलेच एक ' ग्रंथपाल ' मानीत आलो. १ ऑगस्ट १९५७ ला त्यांच्या ग्रंथालयाचीं २५ वर्षे पूर्ण झालीं व त्यांची ' क्यूरेटर ' पदावर बढती केली गेली. पण आमचे ते ग्रंथपाल ' होते तसेच आहेत. त्यांनीं आपली ती वाचकाभ्यागतांना सन्मुख असणारी जागा कायम राखली आहे. आधीच्या क्यूरेटरांची जागा वगैरे त्यांनीं अदबीनें अस्पृष्ट ठेवलें आहे. १९५९ पासून १९६२ पावेतों त्यांनीं वसंत व्याख्यान मालेच्या महासत्राची एक कार्यवाह या नात्यानें नेहमींच्या मेहनतीनें धुरा वाहिली. त्यांच्या किंवा कोणाच्याहि जीवनांत ही एक बहुमोल संधी होय. आमच्या ग्रंथालयसंघांत ते प्रारंभापासून घनिष्ट संबंधानें समाविष्ट आहेत. १९४७ सालीं आम्ही आमचा वर्ग सुरू केला. संघाच्या–वर्गाच्या कोणत्याहि कामांत मनःपूर्वक भाग घेणाऱ्या बर्व्यांनीं आमच्या वर्गाच्या प्रयत्नांस संपूर्ण उत्तेजन

देण्यासाठीं स्वतःचें नांव विद्यार्थी म्हणून नोंदवलें होतें. आणि पुढे १९५१ ते १९५५ पावेतो ते त्याच वर्गाला सरकारनें मान्यता दिल्यावर व्यवस्थापक झाले. संघाचे एक कार्यवाह म्हणून चार पांच वर्षे, उपाध्यक्ष म्हणून गेलीं कांहीं वर्षे, कार्यकारिणीचे एक सदस्य म्हणून कांहीं वर्षे, सारांश संघामध्ये पडेल तें काम, अधिकाराचें वा बिनअधिकाराचें, असेल तें निष्ठेनें पत्करून वावरत आहेत. खालापूर येथे झालेल्या कुलाबा जिल्हा ग्रंथालय परिषदेचें अध्यक्षपद त्यांना मिळालें होतें. संघाचें कालिक 'सहकार याचे ते आज संपादक आहेत. संघाचे कार्यवाह असतांना त्यांनीं शाळांच्या ग्रंथालयांविषयीं एक विचार-विनिमयसत्र आयोजून पार पाडलें. त्यांत मान्यवर विद्याखातेंअधिकारी, आमचे ग्रंथालयाधिकारी, नामदार बाळासाहेब देसाई अशांची उपस्थिति व भागहि होता. सरकारकडे त्यावेळीं एक शिष्टमंडळ गेलें होतें. त्यांतले ते एक होते. असें त्यांच्या एकनिष्ठतेचें पारितोषकहि त्यांस मिळत आलें आहे.

ग्रंथालय संघविषयक कामाची आमची अखंड हालचाल व यातायात गेल्या सुमारें वीस वर्षांमधली. त्यांतील त्यांच्या कामगिरीचें वर वर्णन केलें. त्यांच्या ग्रंथालयांत त्यांचीं आतां बत्तीस वर्षे होतील. या दीर्घ काळांत त्यांना असंख्य प्रकारचे अनुभव मिळाले. अगणित तऱ्हांचीं माणसें पहाता आलीं. अशा भरगच्च निरीक्षणानुभवांनीं तुडुंब भरलेल्या ग्रंथालयजीवनांतील कित्येक गंमती मी त्यांस वारंवार विचारल्या. पण दरवेळीं ते मला फारसें कांहीं हातीं लागूं देत नाहींत असा अनुभव आला. 'तसं फार कांहीं नाहीं' हें त्यांचें या विषयींचें पालुपद मी ऐकत आलों. तरीहि कामाच्या रगाड्याच्या आणि सेवेंतील जिगझिगीच्या चाळणींतून त्यांच्या स्मरणांत विशेष कोणत्या मानवी नमुन्यांची व अनुभूत समयांची नोंद झालेली असावी त्याचा अंदाज मी काढलाच. त्यांचें काय वर्णन करावें ? तीसवर वर्षांमध्ये मीच त्यांच्याविषयीं अधिक माहिती मजपाशीं गोळा केल्याचें मी त्यांस दाखवूं शकलो. शेकडो आक्रमी, विक्रमी, पराक्रमी, संयमी, नियमित, अनियमित, प्रदर्शनी, होतकरू अभ्यासक त्यांच्या सेवेचा, व्यवस्थेचा, ग्रंथालयाच्या सूचीचा, साहित्याचा, माहितीचा, तत्परतेचा फायदा लुटून गेलेले दिसले. भट आले, जोशी आले. पंडित, पुराणिक, शास्त्री, हरदास हजेरी लावून गेले. दाते, चिकटे, कुबेर, सावकार उभे राहिले. टेंगडी, टेकाडे,

डोंगरे, पर्वते, शिखरे शालीन शब्दांत बोलले. परोपकारी, जगताप, काळे, गोरे, मोरे यांचे रंग दिसले. घाटे, माटे, काणे, डोळे, गंधे, टिळक, गंभीर, विनोद, हर्षे, उदास, सहस्त्रबुद्धे, बुद्धिसागर येऊन संतोषले. राजे, राजवाडे, पंत, प्रधान, सरदार, मिरासदारांनीं पायधूळ झाडली. स्वामी, किंकर, बुवा, गोसावी, धोतरे, लंगोटे, देव, पुजारी, किन्नरे, गंधर्वांच्या बैठकी झाल्या. सोनार, शिंपी, कुळकर्णी, पाटील, देशपांडे, पोतनीस, वाकनीस, देसाई, देशमुख, पोतदार, मुजुमदार स्वस्थ चित्तानें रमून गेले. पै, ढवू, अणे किती मोजावे ? वा. ल., पु. ल., वा. पु., गो. पु., कट्टी, बनहट्टी, कितीक राव, कितीक साहेब, नाबर, बाबर, एक कीं दोन ? अनेकजण संदर्भ घेऊन गेले. किती नांवें ! किती व्यक्ती ! किती प्रकृती ! अशा सर्वांना संदर्भ शोधून देण्यानें बर्व्यांच्या मनाच्या खजिन्यांत अमोज ज्ञानभांडाराची सतत साठवण झालेली आहे. ' देउनि किंवा भोगुनि उणें न होता सदैव वाढतसे ' हें जाणणाऱ्या त्यांनीं त्याचा यथामति, यथा अवसर उपभोगहि घेतला आहे. संदर्भ शोधतांना किंवा देतांना काळवेळाचा त्यांना ताळमेळच रहात नाहीं. त्यापायीं त्यांच्या प्रकृतीवरहि परिणाम होतो. पण कामांत असणाऱ्या त्यांना तो कमी वेळा दिसतो. " आजारी झाले तरी संस्थामाउली पाठीशीं आहे. मला वाऱ्यावर टाकून ती मोकळी होणारी नाहीं. म्हणून मीं सदैव निश्चिंत आहे. " असें ते नेहमीं म्हणत असतात. या निश्चिंततेमुळेच त्यांची कार्यप्रवृत्ति व उत्साह अप्रतिहत आहेत. संस्था मातबर मनांच्या मजबूत माणसांची असली तर दुष्ट काळाचे निष्ठुर प्रहार निष्ठावान सेवक असे सहज सहन करीत हुरूपानें रहातात. परंतु या उलट परिस्थिति जेथे जेथे असेल तेथे येथे बिचारे सेवक जर मरगळले तर त्यांना बोल लावणें मानुष नाहीं. आणि ही अमानुष अवस्था सर्वत्र सार्वभौमत्व गाजविते आहे. अगदी सरकारी योजनेमध्ये वाटचाल करीत असलेल्या मुक्तद्वार ग्रंथालयांमध्येहि अनेकेश: अनिश्चितताच मूर्तिमंत वास करते आहे. तशा ग्रंथालयांची दीड तपाची उमर आतां झाली आहे आणि तरीहि युगमानानुसारच्या सेवकांनुकूल वाऱ्यांची धाव, बारीकशी झुळूकसुद्धा या मुक्तद्वारांचे आंत पोंचलेली नाहीं ! आणखी केवढी मुदत या मुक्तद्वारांचीं द्वारें सेवकांनुकूल गोष्टींना बंद रहाणार आहेत नकळे !

पण श्री. बर्वे मात्र निश्चिंतमुळे अहर्निश समाधान उपभोगून जीवनक्रमणा

करीत आहेत. ते आत्मसंतोषानें वर्तू शकत आहेत. असंतुष्टतेचा स्पर्शहि त्यांना बाधूं शकलेला नाहीं. त्यामुळे त्यांच्या वृत्तींत हक्क मिळविणें, संरक्षिणें व बजाविणें यासाठी अनिवार्य अशी आक्रमकता नाहीं. या आक्रमकतेची आवश्यकताच त्यांच्या संस्थेनें ठेवलेली नाहीं. त्यामुळे त्यांनीं अधिकारातिक्रम होऊं नये म्हणून स्पष्ट लक्ष्मणरेषा घालून घेऊन तिच्या परिघांत ते सदैव रहातात. त्यांची संस्था त्यांना सर्वार्थांनीं व सर्व बाजूंनीं संभाळते आणि संस्थेचीं निश्चित धोरणें, संकेत व कामें ते निश्चिततेमुळे एकनिष्ठेनें संभाळून आपलें काम करीत आहेत. त्यांचें सौजन्य, कर्तृत्व, क्षमता सतत वाढत रहावी अशीच घडामोड नि हालचाल त्यांच्या संस्थेच्या कामांमधून त्यांच्या समोर व सभोंवतीं घडलेली त्यांना पहाता आली आहे. लोकमान्यांच्या तेजस्वी कार्यानें पुनीत झालेलें-भारलेलें वातावरण, महाराष्ट्राचे दोन थोर तात्या, महाराष्ट्राच्या 'केसरी-मराठा' या महान् संस्थेला मानवंदना द्यावयास येणारे अन्य प्रांतीय वा अन्यदेशीय थोर लोक, केसरी संस्थेच्या आसऱ्यानें चालणाऱ्या देशविषयक महान् चळवळी, या मोठ्या गोष्टींप्रमाणेंच संस्थेच्या आवारांत होणारे उत्सव-समारंभ, वावरणारीं संघ-मंडळें व त्यांची त्यांची कार्यकर्ती मंडळी, व्याख्यानें, संभाषणें, प्रदर्शनें, हजारों अभ्यासकांशीं झालेलें-चाललेलें संपर्क-संघटन, एक ना दोन, कितीतरी महत्त्वाच्या विशाल बैठकीच्या गोष्टी जवळून पहाण्याचें-त्यांमध्ये प्रत्यक्ष भाग घेण्याचें भाग्य बर्व्यांना लाभलें आहे. त्यामुळेंच त्यांच्या मनाची बैठक अंतर्बाह्य मोकळी व पाण्यासारखी विनरंगी बनलेली आहे. 'जिस्में मिलावे वैसा' रंग दाखविणाऱ्या त्यांची कोणालाहि आठवण येवो तो हटकून उच्चारतो, "बर्वे म्हणजे एक भला माणूस."

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १३८१०

# ७. महाराष्ट्र राज्याचे दप्तरदार—

## डॉ. पु. म. जोशी

लोणावळ्याच्या हवेचा भर उन्हाळ्यांतला माणूसमात्राला ताजें तवानें करणारा अनुभव तसा फार थोड्यांना घेतां आला असेल. रेशमी स्पर्शाचें सुख देणाऱ्या हवेप्रमाणेंच लोणावळ्यांत सुधारकी नागर संस्कृतीचा डौल आणि ग्रामीण सरललेचा रांगडेपणा यांचा मनोहर मिलाफ झालेला आहे. त्या लोणावळ्यांत डॉ. पुरुषोत्तम महादेव जोशी हे ता. २६ जून १९०४ रोजीं जन्मले आणि त्यांनीं लोणावळ्याचे सर्वजनांना आकृष्ट करणारे सगळे गुण तेवढे अचूक उचलले. त्यांनीं आजवर केलेला सर्वत्रचा संचार व आचार या गुणांचा नितांत ठसा दाखवतो.

१९४७ पर्यंतच्या एक तपभराच्या काळांतील मुंबईतील बहुतेक सर्व विद्यापीठपदवीधरांना चांगले माहीत असलेले मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. जोशी हे आमच्या ग्रंथपालांच्या जगांत अद्वितीय अधिकारी व संघटक म्हणून सुप्रसिद्ध आहेत. याला कारण केवळ त्यांची उच्च प्रतिष्ठेच्या व्यक्तींशीं सुपरिचय ठेवण्याची हातोटी हें नाहीं; तर स्वतःची तपश्चर्या प्रामुख्यानें आहे. विद्यापीठाचा ग्रंथपाल ही दुर्मिळ बहुमानाची तशीच परमोच्च पात्रतेची जागा आहे. त्या जागीं येणाराला ती आपाततः मोठेपण देते. परंतु डॉ. जोशी यांचे बाबतींतली ही घटना खरोखरीच सार्थ आहे. विद्यापीठाच्या ग्रंथपालाची ती गादी डॉ. जोशी यांनीं अक्षरशः आणखीच उंच केली. आज ते त्याहूनही आणखी उंच स्थानावर गेलेले आहेत. तरी त्यांच्या त्या मूळ जागीं अजूनही

त्यांचेसंबंधीं आदरानें उच्चारल्या जाणाऱ्या, दाखविण्यांत येणाऱ्या व टिकविलेल्या, त्यांच्या कारकीर्दींत सुरू झालेल्या अनेक अनुकरणीय प्रथांचे द्वारें त्यांनीं त्या स्थानाचा महिमा परोपरीनें वाढवून ठेवलेला आहे. त्यामुळें त्यांचें नांव त्या स्थानावर जणूं ठळठळीतपणें कोरल्यासारखेंच झालें आहे.

माणसाच्या गुणांतूनच त्याचें मोठेंपण प्रकट होत असतें. कोणाला परिस्थिति मोठें करते. कोणावर मोठेंपण येऊन बसतें. पण कांहीं लोक मुळांतच मोठे असतात. डॉ. जोशी हे स्वभावतःच मोठे आहेत, हें खरें असलें तरी ते केवळ एका रात्रींत तसे मोठे झाले नाहींत. त्यामागें त्यांची तपश्चर्या आहे व तीमधूनच त्यांना पुरस्कर्ता हात लाभलेला आहे. त्यांना जो मोठेपणा लाभला तो त्यांनीं आपल्या अनेकविध गुणांनीं मिळवला. त्यांच्या बाळपणापासूनच त्यांच्या गुणांचा वेगळेपणा दिसून आला आहे.

जोशी घराणें मूळचें तळेगांवचें. तेथून जवळच नोकरीनिमित्तानें डॉ. जोशी यांचे वडील लोणावळ्यास गेले. अल्पकाळांतच डॉक्टरांच्या मातुःश्री ते लहान असतांनाच निवर्तल्या. मातुःश्रींचे मागें चारांच्या कुटुंबांतील फक्त इनमिनतीन माणसें उरलीं. वडील, हे स्वतः व भाऊ. या परिस्थितीमुळें ते वाङ्मयविश्वाकडे अगदीं बालपणींच ओढले गेले. आपलें आप्तविश्व त्यांना पुस्तकांमध्यें सापडलें. हा नाद सतत वाढतच गेला. वाङ्मयांत दिसलेल्या प्रभावी व्यक्तींचे गुणही त्यांनीं नकळत आत्मसात् केले. भरपूर वाचनाच्या आवडीमुळें त्यांनीं पुस्तकांना आपल्याभोंवतीं जमा केलें. कदाचित् या संवयीमुळेंच पुढें त्यांनीं पुस्तकांच्या व्यवसायांतच कायम काम पत्करलें आहे. वडील आगगाडींत नोकरीला होते. त्यांच्या इच्छेनुसार यांनीं बी. सी. ( म्हणजे बुकिंग क्लार्क ), टी. सी., ए. एस्. एम्. ( म्हणजे ॲसिस्टंट स्टेशन मास्तर ), फारतर एस्. एम्. इत्यादि होण्याची व चढण्याची माफक महत्त्वाकांक्षा ठेवावयास हवी होती. पण त्यांना बुकिंगपेक्षां खरीं बुकेंच अधिक आकर्षक वाटलीं. आगगाडीच्या तिकिटांपेक्षां ( वाचकांचीं तिकिटें म्हणजे ) रीडर्स टिकेट्स् देण्याकरतांच त्यांनीं वेगळा मार्ग पत्करला. प्रवासमार्गावरील अभ्यागतांपेक्षां ज्ञानमार्गावरील अभ्यागतांची सोयच त्यांचे हातून व्हायची होती. म्हणून तीर्थरूपांच्या इच्छेनेंच चालण्याचें आज्ञाधारकत्व त्यांनीं पत्करलें नाहीं. स्वतःच्या हिंमतीवर उच्च शिक्षणाचा निर्धार त्यांनीं केला व तो सर्व

बाजूनीं भरघोस यशानें पुरा केला.

मॅट्रिक आधींपासूनच त्यांना जय स्वावलंबनाची कास धरावी लागली. घरची सुस्थितीच काय, कसलीही मदत नव्हती. अभ्यासूपणा व योजक बुद्धिमत्ता यांचाच त्यांना संपूर्ण व खंबीर आधार होता. १९२२ मध्यें ते मॅट्रिक झाले. पैशांबाबत निराधार अवस्थेमुळें त्यांना कॉलेजच्या दुसऱ्या वर्षांतच ऐन मध्यावर शिक्षणाला रामराम ठोकावा लागला. आणि पैशांच्या तजविजीकरतांच त्या काळीं उच्च अभ्यासाची सोय नसलेल्या अंमळनेर या आडगांवीं नोकरी धरावी लागली. तेथले एक सहृदय गुरुजी कै. ज. गो. गोखले यांच्या चिरस्मरणीय मदतीमुळेंच त्यावेळचे निर्धन विद्यार्थी जोशी हे मुंबईकडे वळूं शकले. १९२५ मध्यें इंटर झाल्यानंतर मात्र मुंबईतच त्यांची नोकरीची व शिक्षणाचीही सोय ते जमवूं शकले. कॉलेजांत नांव घालूनही वर्गात हजर असणें त्यांना जुळवणें शक्य नव्हतें. कॉलेजांत वर्ग चालू असतांनाच ते आपल्या नोकरीच्या कचेरीमधील कामांत गर्क असत. या प्रकारें वर्गांचे दिवस पुरे करून परीक्षेमध्यें त्यांनीं जी चमक दाखवली, तीमुळें आपल्या गुरुजनांचें लक्ष त्यांनीं ओढून घेतलें. ते मुंबईच्या विल्सन कॉलेजचे विद्यार्थी. तेथले सर्वगामी बुद्धिमत्तेचे विद्वन्मान्य प्राध्यापक पेस्तनजी वाडिया यांचे तर डॉक्टर जोशी पट्टशिष्य झाले. विद्यापीठाच्या दोन्ही पदवी परीक्षांमध्यें त्यांस परमोच्च यश लाभलें. १९२७ मध्यें त्यांनीं बी. ए. ची पदवी सुवर्णपदकासहित हस्तगत केली व दक्षिणामानाचे ते उपप्राध्यापक झाले. बी. ए. च्या पराक्रमाचीच एम्. ए. मध्येंहि त्यांनीं आणखीच सुधारलेली आवृत्ती काढली. एम्. ए. ची पदवी व रु. सहाशेंचें रोख बक्षीसहि त्यांनीं पटकावलें. या विक्रमामागें त्यांची तपश्चर्याहि तशीच होती. संपूर्ण दोनहि वर्षे एकतानतेनें अभ्यास करून एम्. ए. च्या मांडवांत मिरवीत जाणें त्यांना शक्यच नव्हतें. नोकरीशिवाय त्यांचें चालणारच नव्हतें. बी. ए. च्या परीक्षेनंतर जरी त्यांना दक्षिणा शिष्यवृत्ति मिळाली होती, तरी तेवढ्या पैशांनी त्यांचें समाधान होणार नव्हतेंच. लहानपणापासूनच सुस्थिति नव्हती तरी व पुढें स्वावलंबनानें द्रव्यार्जनहि विद्यार्थी दशेंतच करावें लागलें. तरीहि त्यांना येरागबाळाच्या कपड्यांत आणि राहणीनें राहाणें जमत नव्हतें. त्यांनीं आपल्या जीविताचा नकाशा जणूं बाळपणींच हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांतील धीरोदत्त नायकांप्रमाणें आपण वर्तावें या इराद्यानें आखून

टाकलेला आहे. याकामीं त्यांची तीव्र बुद्धि व शिकंदर नशीब या दोघांनींहि त्यांना भरपूर हात दिलेला आहे. फिकीर हा शब्द त्यांनीं बाळपणींच आपल्या कोशांतून खरडून टाकलेला आहे. या वृत्तीमुळें ते स्वभावानें अत्यंत मनमोकळे वागतात. तरीपण ते मनमिळाऊहि आहेत. लहानपणापासूनच त्यांचेभोंवती अनेक मित्र गोळा झाले. हा इतमाम संभाळण्याकामीं त्यांना केवळ दक्षिणा-शिष्यवृत्ती पुरणारी नव्हती. या कारणानेंच परीक्षेआधींचेच केवळ सहा महिने नोकरींतून तात्पुरतें निवृत्त होऊन रोज किमान चौदापंधरा तासांप्रमाणें एकध्येयानें अभ्यास करून त्यांनीं एम्. ए. च्या परीक्षेची तयारी केली व तेवढ्या तयारीनेंच तीमध्यें उच्च मान मिळवला. मूळ प्रवृत्ति भोंवतीं माणसें गोळा करण्याची आणि एम्. ए. च्या यशामुळें मोठा मान मिळविलेला. यामुळें त्यांचा अंगभूत डौल आणि इतमाम वाढलाच. स्वावलंबनानें उच्च विद्या उच्च श्रेणींत पुरी केल्यामुळें त्यांच्या स्वभावांत स्वतंत्र व निर्भिड बाणाहि आला. उगाच कोणाची ऐट खपवून घेऊं नये असें त्यांचें एक धोरण ठरून गेलेलें आहे. एम्. ए. झाले तेव्हा ते मुंबईस सचिवाल्यांत नोकरीला होते. तेथें लागण्यापूर्वी जेव्हां त्यांची तोंडी चांचणी झाली तेव्हां त्यांस तेथल्या गोऱ्या वरिष्ठानें जात विचारली. त्यावर हे ताडकन् म्हणाले, " मला अस्पृश्य म्हणा, त्यामुळें कामांत कांहींच फरक पडणार नाहीं "

बी. ए. व एम्. ए. मधील त्यांचें प्रावीण्य व धडाडी पाहून त्यांच्या गुरुजनांनीं त्यांना विलायतेंत-जाण्यासाठीं प्रवृत्त केलें. त्यांच्या स्वावलंबनाची व बुद्धिमत्तेची चहा असणारे कै. तात्यासाहेब केळकर यांच्या शिफारशीमुळें कै. बाबासाहेब इचलकरंजीकर यांचेकडून त्यांस पैशांची सर्व तऱ्हेची मदत मिळाली. याकामीं डॉक्टरसाहेबांचे मित्र, त्यावेळीं केसरी संस्थेंत असलेले आजचे आमदार आ. रा. भट यांचें सर्व प्रकारचें प्रोत्साहन त्यांस मिळालें.

ते विलायतेंत असतांना मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल सेवानिवृत्त होण्याचा समय आला आणि त्या जागेकरतां डॉक्टर जोशी यांची चौफेर बुद्धिमत्ता, विद्यालयीन पदव्या, माणसावर छाप ठेवण्याची हातोटी हे त्यांचे ठायीं असणारे आणि विद्यापीठ ग्रंथपालाच्या गादीकरतां लागणारे त्यांचे अनेक गुण जाणणाऱ्या विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनीं ते विलायतेंत असतांनाच त्यांना ग्रंथपाल म्हणून नियुक्त केलें. विलायतेंत त्यांनीं प्रसिद्ध ग्रंथपालनतज्ञ बर्विक सेयर्स यांचेजवळून

व क्रॉयडॉन, बर्मिंगहॅम, ग्लासो येथील ग्रंथालयांतून ग्रंथालयांच्या कामाची चांगली माहिती घेतली आणि ते मुंबई विद्यापीठाचे उच्च पदवीविभूषित ग्रंथपाल म्हणून परत आले. सन १९३५ ते १९४७ त्यांनीं तें पद भूषविलें. त्या काळांत त्या ग्रंथालयांत जाऊन आलेल्या बहुतेक वाचकांना तेथें अधिराज्य गाजविणारे ग्रंथपाल डॉ. जोशी चांगले माहिती झाले आहेत.

अनेक ग्रंथालयांतून, त्या त्या ठिकाणाच्या मानानेंच अर्थात्, सुशिक्षित ग्रंथपाल असतातच असें नाहीं. जरी कोठें शिक्षित ग्रंथपाल असले तरी ते वजनदार नी प्रभावी शासक असतातच असेंहि नाहीं. किंबहुना नसतातच. पण डॉ. जोशी यांनीं ती परंपरा पार पालटून टाकली आहे. ते स्वतः कॉलेजांत प्राध्यापक मंडळींपैकीं एक होते. यामुळें विद्यापीठाचे नियंत्रक असणारे जे प्राध्यापक असतात त्यांचे बरोबरीनें डॉ. जोशी आरंभापासूनच राहूं व वा लागले. ही प्रतिष्ठा व स्वतंत्रवृत्ति त्यांच्या ठायीं मूळचीच असल्यानें त्यांनीं आपल्या ग्रंथालयांत विद्यार्थ्यांनाच नव्हे तर प्राध्यापकांनाही उत्तम प्रकारच ग्रंथालयीन शिस्त लावली. ही शिस्त पटवून देण्यांतही त्यांचें वैशिष्ट्य आढळून येई. या कामीं त्यांची समयसूचकता आणि मार्मिक नि विनोदी शब्दयोजना हीं ध्यानांत घेण्याजोगीं असत.

त्यांनीं मुंबई विद्यापीठाचा ग्रंथपालनवर्ग सुरू केल्यानंतरची गोष्ट आहे. वर्गाकरतां खुद्द ग्रंथालयाच्या जागेंत हॉल नव्हता. म्हणून पलीकडच्याच विद्यापीठीय अर्थशास्त्रविभागांत वर्गाकरतां जागा नेमून घेण्यांत आली होती. एक दिवस वर्गाच्या ठराविक वेळीं विद्यार्थी तेथें जमले. पण त्याचवेळीं विद्यापीठांतल्या कांहीं अधिकाऱ्यांचीही तेथेंच बैठक घेण्याची लहर लागली. त्या अधिकाऱ्यांत विद्यापीठ-ग्रंथालय समितीचेहि कांहीं सदस्य होते. त्या मंडळींनीं विद्यार्थ्यांना चलेजाव केलें. ही गोष्ट विद्यार्थ्यांनीं डा. जोशांकडे नेतांच ते झटपट वर्गाच्या जागीं आले आणि " ऑल मेंबर्स ऑफ द लाय-ब्ररी कमिटी ॲंड आदर्स ऑल्सो प्लीज क्विट धिस् हॉल. नो फॉरीनर्स एनी मोअर. बॅक टु युवर होमलॅंड. " अशी त्या १९४२-'४३ च्या काळांतील ' चलेजाव ' चळवळींतील रूढ भाषा प्रासंगिक विनोदाकरतां मोठ्या मार्मिकतेनें वापरून विद्यार्थ्यांना वर्गाची जागा मोकळी करून दिली.

विद्यापीठाचा तो वर्ग त्यांनीं सुरू केला त्याची सुरुवातही अशाच एका

नाल्यांतून झाली. १९४० पासूनच वर्ग सुरू करावासें त्यांना वाटूं लागलें होतें. १९४२ मध्यें मुंबई विद्यापीठाद्वारें त्यांनीं ५ वी अखिल भारतीय ग्रंथालय परिषद् भरविली. त्या प्रसंगानें ग्रंथालयविषयक विचारांना कांहींशी अधिक चालना मिळाली. पण विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना कांहीं तशी आवश्यकता पटत नव्हती. म्हणून वर्ग लगेच उघडणें जमलें नाहीं. पण एक दिवस विद्यापीठाच्या प्रवेशद्वारांत विद्यापीठकचेरीचे प्रमुख म्हणजे रजिस्ट्रार डोंगरकेरी यांचे समवेत डॉ. जोशी बोलत उभे होते. तेवढ्यांतच (आज दिल्लींत भारत सरकारच्या शिक्षण खात्याचे ग्रंथपाल असलेले) केतकर व आणखी एकदोन जण तेथें येऊन त्यांनीं त्यांचेशीं वर्गाबद्दल चौकशी केली. "हें काय डॉक्टरसाहेब, गेलं वर्ष गेलंच. यंदाही तुम्ही कांहीं मनावर घेत नाहीं ? मद्रासचा रावसाहेब रंगनाथन् यांचा वर्ग जोरांत चालला आहे नि आपल्या इकडचे विद्यार्थी नाइलाजानें एवढ्या दूर जाताहेत..." क्षणांत डॉ. जोशी यांनीं रजिस्ट्रारसाहेबांकडे बोट केलें नी म्हटलें, "हें पाहा केतकर तुमची वर्गांत येण्याची इच्छा मला माहीत आहे. वर्ग सुरू करावा असं मला वाटत आहे. पण हे साहेब या माझ्या विचाराप्रमाणें करण्याला अवधि आहे असं अजूनही म्हणत आहेत. तुम्ही विद्यार्थी प्रत्यक्ष समोर आल्यावर आतां ते मला खात्रीनें संमति देतील." आणि विद्यार्थ्यांकडून आलेली रास्त मागणी कोणते गुरुजन मानीत नाहींत ? त्याच वर्षी वर्ग सुरू झाला.

पूर्वी मुंबई विद्यापीठ ग्रंथालयांतील ग्रंथ मुंबईबाहेर तुरळकच जात असत. पण डॉ. जोशी या नव्या ग्रंथपालांनीं ही परिस्थिति बदलून पुणें, कोल्हापूर, सांगली, नासिक अशा इतर मोठ्या आणि आडवाटेच्या शहरांतूनहि सत्पात्र अभ्यासकांना आवश्यक ग्रंथ देण्याची प्रथा पाडली. कोठंहि पहा. ग्रंथपाल आळशी नसले तरीहि ग्रंथालयाबाहेर पुस्तकें देण्याचा कंटाळा करीत असतील तर ते एकाच कारणानें. घेतलेलीं पुस्तकें आठवण ठेवून वेळेवर घरून आणून परत करणारे वाचक दुर्मिळच. याप्रमाणेंच तशा विसराळू किंवा चालढकलखोर वाचकांकडून त्यांना दिलेलीं पुस्तकें आठवण ठेवून वारंवार परत आणविण्याची जबाबदारी कोणता ग्रंथपाल पत्करतो ? पण डॉ. जोशी यांनीं या बाबतींत अभ्यासकांची संपूर्ण सोय पाहिली. या बाबतच्या नियमांचें जंजाळ त्यांनीं बरें-चसें छाटछुटहि केलें. ग्रंथांच्या कपाटांतल्या कपाटांत राहून असलेल्या सुरक्षित-

तेपेक्षां त्यांचा सुप्रसार व उपयोग त्यांनीं अधिक पसंत केला. या बाबतींत सोय करण्याप्रमाणेंच मुदतींत पुस्तकें परत करण्याच्या बाबतींतही ग्रंथालयाच्या नियमांचा कडकपणा त्यांनीं अभ्यासकांच्या प्रत्ययास आणून दिला. खुद्द विद्यापीठाच्या अधिकारी–प्राध्यापकांनाहि त्यांनीं योग्य वळण लावलें.

ग्रंथालयाचा अधिकांत अधिक विद्यार्थ्यांशीं व प्राध्यापकांशीं संबंध आणणें व टिकवणें ही गोष्ट त्यांनीं परम महत्त्वाची मानली. याकरतां त्यांनीं आपल्या ग्रंथालयांत अनेक गोष्टी नव्यानें केल्या. सगळीकडेच ग्रंथालयांना जागा अपुरी असते. निदान कांहीं कालावधींत असेल ती अपुरी ठरते. सेवक अपुरे ठरतात. सात आंत्रोळ्यांच्या लोककथेंतील मुलांप्रमाणें एक एका वाचकाकरवीं ग्रंथालयांतील वाचनाच्या सोयींची माहिती वाचनेच्छूंना मिळत जाऊन सतत क्रमानें वाढत राहाते. त्यांचेकरतां ग्रंथसंख्या पुनः पुन्हा समप्रमाण राखावी लागते, वाढवावी लागते. तास वाढवावे लागतात. त्याकरतां वेळापत्रक आखावें लागतें. बैठकीं-करतां असलेल्या खुर्च्यांमध्यें भर टाकावी लागते. परंतु विद्यापीठाचें काय, सरकारी योजनेंतलें प्रादेशिक काय किंवा इतर कोठलेंहि ग्रंथालय काय या वाढीकडे डोळेझाकच करण्याच्या प्रवृत्तींत असतें. आणि या प्रवृत्तीमुळेंच जाग्यावर काम करणाऱ्या व वाचकासमूहाला तोंड देणाऱ्या सेवकांची पराकाष्ठेची कुचंबणा सुरू होते. वाचकांना अधिक सोयी उपलब्ध होत नाहींत म्हणून वाचक नाखूष आणि या सोयींकरतां ग्रंथपाल सारख्या मागण्या करीत जातो म्हणून चालक नाखूष. या पेंच प्रसंगांत बिचारे ग्रंथपाल पडतात. पण डॉ. जोशी यांनीं बाळपणापासून अंगीकारलेलें एक सूत्रच या कामींहि कायम धरून ठेवलें. " योग्य गोष्ट सुरू करावी. भविष्यकाळाकडे पाहात थांबूं नये. थांबला तो संपला. ग्रंथालयांत कांहींहि थांबवतां येणार नाहीं. म्हणून रेटून रास्त रीतीनें योजलेलें काम पुढें ढकलीत चालावें." या धोरणानें मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचा कारभार चालवीत असतां त्यांना चतुरस्र कल्पकताहि वापरावी लागली. हाताखालच्या सगळ्या सेवकांना त्यांनीं विश्वासांत घेतलें. त्यांना निर्भेळ माणुसकीचे शब्दच त्यांनीं सतत ऐकवले. वेळोवेळीं त्यांच्या लहान मोठ्या कामगिरीबद्दल कौतुक केलें. त्यांचेकरतां वेळापत्रक आखलें व कामाचें वाटप केलें. कोणाचाही इतरांच्या पायीं गोंधळ नसावा अशी घडी बसवली. वेतन वगैरे कामीं जातीनें लक्ष पुरवून शक्य तें तें केलें. ग्रंथालयाला

आणखी जागा हवी होती. पण ती मिळत नव्हती. जागेच्या अभावामुळें ग्रंथसंग्रहांत कांहीं कपात करतां येत नव्हती. तो तर सारखाच वाढत होता. त्यांतलाच कांहीं भाग त्यांनीं रचून ढीग घालून ठेवला. तो ढीग पाहाणाऱ्या वरिष्ठांना जागेची सोय लावल्यावांचून उपाय उरला नाहीं. इतरत्रचा संग्रह वाढला तर त्याची स्थानव्यवस्था करण्याकरतां केव्हां त्यांतला बहुमोल भागहि रद्दी म्हणून काढण्यांत येतो. तर केव्हां सेवकांनाच स्थानच्युत करण्यांत येतें. पण डॉ. जोशी यांनीं हें सर्व निषिद्ध मानलें. उलट अंदाजपत्रकांतील जमाबाजू सेवकांच्या सालोसाल वाढत जाणाऱ्या सेवाकालानुरूप सारखी वाढवून घेतली. याप्रमाणेंच ग्रंथालयाची उपयुक्तता पटवून देण्याच्या कामींहि त्यांनीं हर प्रयत्न केले. अनेक प्राध्यापकांना, सरकारी अधिकाऱ्यांना, खुद्द गव्हर्नरां-सारख्या राज्यकर्त्यांनाहि अडलेली माहिती वारंवार पुरविली. आणि या कामानें व क्रमानें ग्रंथालयाकरतां अधिक जागा, अधिक संग्रह, अधिक वेळ, अधिक सेवक, अधिक खर्च या सर्वांची संपूर्ण आवश्यकता सर्व वरिष्ठांस पटविली आणि पुरी करून घेतली. या प्रकारच्या अमूल्य प्रसंगोचित सेवेमुळें सगळे वरिष्ठ त्यांचेबाबत नेहमीं निर्धास्त असत. ग्रंथालयाकरतां ते जें जें करतील तें तें ग्रंथालयाच्या उत्कर्षाकरतां असणारच असा वरिष्ठांनीं विश्वास बाळगला. या विश्वासाच्या बळावरच त्यांनीं कित्येक भारी किंमतीचे अतिदुर्मिळ ग्रंथ भारी किंमतीनें व मोठ्या प्रयत्नानें परदेशांतूनहि मिळवून आणले व त्यायोगें ग्रंथालय समृद्ध केलें.

विद्यापीठ ग्रंथाल्यांतील या बहुविध कामगिरीमुळेंच डॉ. जोशी यांना ग्रंथालयाबाहेरही ग्रंथालयीन कामांतून भाग घ्यावा लागला. १९४२ मध्यें त्यांनीं भारतीय ग्रंथालय परिषद् मुंबई विद्यापीठाच्या पुरस्कारानें भरविली. भारतीय ग्रंथालय संघांत ते अनेक वर्षें उपाध्यक्ष होते. त्या संघांत स्वतःच्या एकांतिक मतांचा आग्रह कधींच न ठेवणारे एक सदस्य या नात्यानें त्यांनीं फार लोकप्रियता मिळविली व अनेक वेळच्या शब्दद्वंद्वांचे प्रसंगांत मध्यस्थाची कुशलता दाखविली. कलकत्त्याच्या इंपीरियल लायब्ररीच्या म्हणजे आजच्या नॅशनल लायब्ररीच्या मार्गदर्शक मंडळांतही त्यांची नियुक्त झालेली आहे. मुंबई राज्याकरतां ग्रंथालययोजना आखण्याकरतां जी समिति नेमलेली होती तिचे ते एक सदस्य होते. नासिक येथील १९५४ च्या ५ व्या महाराष्ट्र ग्रंथालय

परिषदेचे ते अध्यक्ष होते.

या त्यांच्या ग्रंथालयांतील आणि ग्रंथालयाबाहेरील ग्रंथालयीन कामगिरीमुळें मुंबई राज्याचे माजी गुणग्राही मुख्यमंत्री नाम० खेर यांनीं मुंबई सरकारचा दप्तरखाना पुनर्घटित करण्याचें ठरवून डॉ. जोशी यांना राज्य–दप्तरदार म्हणून नियुक्त केलें. १९४७ पासून ते त्या कामांत आहेत. या कामामुळें त्यांना कोल्हापूर, औंध, पुणें, बडोदें येथल्या दप्तरखान्यांना वारंवार भेट द्यावी लागते. दरवर्षी भारतांतील वेगवेगळ्या प्रांतांच्या दप्तरदारांची परिषद् भरत असते. तीमध्येंहि डॉ. जोशी यांना भाग घ्यावा लागतो. याच निमित्तानें त्यांनीं विलायत व अमेरिकेचीही यात्रा केली आहे. त्यांचे वडील रेल्वेमध्यें असल्यामुळें बाळपणींच डॉ. जोशी यांना देहू, आळंदीप्रमाणेंच पंढरपूर व इतर दूरवरच्या प्रवासाची आणि स्थळनिरीक्षणाची आवड वाटूं लागली. आज त्यांना नियुक्त कामांनिमित्तानें जो प्रवास करावा लागतो त्यांत ते आपली स्थळनिरीक्षणाची व जुन्या वाङ्मयाच्या संशोधनाची आवड भरपूर पुरी करून घेतात. कोल्हापूर, औंध व बडोदें येथील दप्तरखान्यांची व्यवस्थाहि मुंबईच्या राज्य दप्तरदारांच्या अधिकारांत आलेली आहे. त्यांची नीट पाहाणी करून त्यांमध्यें कोणत्या सुधारणा करावयाच्या हें त्यांनीं लगेच आखून टाकलें. सेवकांबाबतचें आपलें विद्यापीठ ग्रंथालयांतलें धोरण या स्थानींही त्यांनीं कायम ठेवलेलें आढळतें. एका दप्तरखान्याबद्दलच्या त्यांच्या सूचनांमध्यें " दि सॅलरी ऑफ दि क्यूरेटर ( हू इज् ए ग्रॅज्युएट ) इज् रिडिक्युलस्ली लो. ही स्टार्टेड् ऑन रुपीज् फिफ्टी फोर्टीन यीअर्स बॅक अँड इज् नाउ डॉइंग ए हॅंडसम् सॅलरी ऑफ् रुपीज् सिक्स्टी ( प्लस डी. ए. ऑफ् रुपीज् फॉर्टिफाइव्ह ). हिज् पे मस्ट बी रेझ्ड टु..." काम सांगण्याबरोबरच योग्य दामाची आठवण ठेवणारे अधिकारी विरळाच

वर म्हटलेंच आहे कीं त्यांच्या संस्कारक्षम वयांत त्यांनीं फार वाचन केलें. त्या वाचनांत हरिभाऊ आपटे यांच्यासारख्या प्रभावी लेखकांच्या धीरोदात्त ध्येयवादी नायकांच्या विचारांची छाप त्यांचेवर फार पडली. तीच वाढत गेली. त्या ध्येयभावनेच्या झपाट्यांत विवाहबंधनांत न गुरफटणें हा भाग होता. "ह्या गुलाम देशांत आणखी गुलामांची भर नको " असें ते म्हणत. त्यांचे भोंवतीं गोळा झालेले भिन्न स्वभावांचे, भिन्न धर्मांचे, भिन्न वयांचे पण अभिन्न

हृदयांचे मित्र हींच त्यांचीं लहानगीं भावंडें आणि वडीलधारे इत्यादि म्हणजेच एकूण कुटुंब कां असूं नये असा त्यांचा सवाल असे. मित्रांच्या मुलांनाच वात्सल्य द्यावें असें त्यांस वाटे. पण याच भावनाभरांत एक वार मित्र परिवारांतील एकीनें त्यांना लग्नबंधनांत अडकविलेंच. सौ. इंदिराबाई जोशी या त्यांना सर्वथा अनुरूप अशा गृहिणी आहेत. त्याहि बी. ए. ( ऑनर्स ), बी. टी. आहेत. तशाच जे. पी. हि आहेत. डॉ. जोशी यांच्या नव ध्येयांनुसार हा मिश्रविवाह त्यांनीं केला. या बाबतींत विचारतां ते म्हणतात, " आमचं वैवाहिक जीवन फारच छान आहे. मिश्रविवाहाची भीति दाखविणाऱ्या त्या काळांत झालेला आमचा विवाह इतर कोणत्याहि विवाहांहून जास्तच सुखकारक ठरला आहे. माझी पत्नी मला पति म्हणून जशी आदरानें व स्नेहलतेनें वागवते तशीच मुलाप्रमाणें माझी आवडनिवड नेहमीं संभाळीत असते. ती म्हणतेच कीं ' तुम्ही माझे पति आहा तसेच मित्र, सासरे व मुलगाहि. ' माझ्या खट्याळपणामुळेंच मला ती सासरा व मुलगा म्हणत असावी . "

पत्नीबद्दल जी कृतज्ञतेची स्नेहभावना व आदर डॉ. जोशी बाळगतात तीच भावना त्यांना साह्य करणाऱ्या सर्वांबद्दल ते बिनचूक ठेवतात. " विद्यापीठ ग्रंथालयांत भोसले, सौदागर, वगैरेंचं मला अमोल साह्य मिळालं. भारतीय ग्रंथालय परिषदेकामीं ग्रंथालयांतील सर्व साहाय्यकांप्रमाणेंच म्यूझियमचे ग्यानी, ह्यूम विद्यालयाचे रामदास, श्रीपादराव टिकेकर, वाकनीस यांनीही फार मदत केली. दिवाणबहादूर जव्हेरींच्या मदतीला तर मापच नाहीं. दप्तरखान्यांत डॉ. दिघे वगैरेंचा फार उपयोग होत असतो..." शिडीवरून चढून गेल्यावर शिडीची आठवण किती जणांना राहाते ?

डॉ. जोशी यांनीं प्राचीन ऐतिहासिक अर्थव्यवहाराबाबत बहुविध लेखन केलेलें आहे व तें सर्व विद्वन्मान्य ठरलें आहे. मुंबई गॅझेटीयरच्या नव्या आवृत्तीच्या कामांतले तेहि एक आहेत. नाम. मुनशींच्या भारतीय विद्याभवनाच्या मालेंतही त्यांचा भाग आहेच. " लायब्ररीज अँड लर्निंग इन् दि एन्शन्ट वर्ल्ड " ह्या एका महत्त्वाच्या ग्रंथालयीन पुस्तकाची साधनसामुग्री एका आराखड्यांत ठेचून भरून ठेवली आहे. स्फुट लेख अनेक प्रसिद्ध झाले आहेतच. त्यांचें लेखन रोचक असतें. तसेंच भाषणहि. बोलण्याच्या ओघांत

ते ठेवून देतात त्या विनोदी महदाख्यायिका श्रोत्याला हसवीत राहातात. याचा प्रत्यय नासिकला झालेल्या ग्रंथालय परिषदेंत चांगला आला. या परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांनीं भूषविलें होतें. डॉ. जोशांचें पुढीलप्रमाणें सारांशानें चपखल वर्णन देऊन हा परिचय पुरा करतों. एक दिवस मी त्यांच्या सन्निध होतों. ते फोनवर बोलूं लागले. बहुधा दुसऱ्या बाजूनें त्यांचें गुणवर्णन सुरू केलेलें असावें. म्हणून तेच म्हणाले, " थांबा. थांबा. तुम्हाला म्हणायचं आहे तें मीच म्हणून दाखवतों. येस् डॉ. जोशी स्पीकिंग. दॅट डॉ. जोशी ऑफ ऑल शेप्स् अँड शेडस्, क्वालिटीज अँड इंटिग्रिटीज, मॅग्निटयूडस् अँड् अल्टिटयूडस् ... "

* * *

ठा... 
अनुक्रमांक ३९८७९ दि: ...
क्रमांक ११७४ ...

## ८. मराठीचे एक दिगंतनामसेवक—

## ग्रंथसूचीकर्ते शं. ग. दाते

अडीच वर्षें झालीं. जुलै १९६१ च्या आरंभीं सर्वजनांचा 'मूड' तपासून वर्तणारे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेनें 'मराठी ग्रंथसूची १९५० अखेर' चे कर्ते श्री. शंकर गणेश दाते यांचा पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेंत भव्य सत्कार झाला. त्या सत्काराआधीं एक आठवडा दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेनें महाराष्ट्र ग्रंथालय संघानेंहि त्यांचा असाच सत्कार केला होता. त्यावेळीं महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांचें यथोचित भाषण झालें होतें.

सूची करण्याचें काम ग्रंथालयें व ग्रंथपाल यांचें आणि वाङ्मयेतिहासासाठीं एकूण मुद्रित वाङ्मयाचा तपशील गोळा करण्याचें काम साहित्यपरिषदेसारख्या संस्थांचें व साक्षेपी संशोधकांचें. ग्रंथालयसंघ व साहित्यपरिषद यांनीं दाते यांचा तीं कामें केल्यामुळें असा सन्मान सत्कार-समारंभ केला. नामदार यशवंतराव चव्हाण, न्यायमूर्ति गजेंद्रगडकर, पुणें विद्यापीठाचे कुलगुरु म. म. दत्तोपंत पोतदार, साहित्यपरिषद, ग्रंथालयसंघ अशा महत्त्वाच्या संस्था व संस्थानिर्माते यांच्याकडून दात्यांना बहुमानानें कामाची पावती मिळाली. राज्य सरकारचें अनुदानहि मिळालें. ते दाते आणि त्यांचें कार्य यांचें हें एक मूल्यमापन आहे.

श्री. दाते यांचा माझा अन्य कोणत्याहि ग्रंथपालपेक्षां अधिक निकटचा

संबंध आलेला व जुळलेला आहे. त्यामुळें मी त्यांना बहुश अगदीं जवळून ओळखतों. असें वाटतें. असें वाटतें म्हणतों याचें कारण पुढें ओघांत सांगतों. सन १९४८ मध्यें त्यांनीं 'मराठी ग्रंथसूची' या त्यांच्या अक्षय ग्रंथाचा पहिला भाग सन १८०० ते १९३७ अखेर तपशिलाचा पुरा करून प्रसिद्ध केला. त्या भागाचा प्रकाशनसमारंभ आणि १९६१ मध्यें प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या भागाचा प्रकाशनसमारंभ यांमध्यें फार मोठा फरक दिसला. म्हणू या. नामदार चव्हाण यांचा त्यांच्या बालपणीं कऱ्हाडांत झालेला पांचव्या वाढदिवसाचा समारंभ आणि आतां मुंबईत वा दिल्लींत होईल तो एकसष्टाव्या वाढदिवसाचा समारंभ यांमधील फरकासारखाच. पहिल्या भागाच्या प्रकाशन-समारंभप्रसंगीं केवळ चारदोन जुने जाणते लोकच दाते यांनीं स्वतःच चहा-साठीं म्हणून स्वतःच्या बिऱ्हाडांतील पुस्तकांनीं भरून गेलेल्या आपल्या खोलींत निमंत्रिले होते. याउलट गेल्या वर्षीं दुसऱ्या भागाच्या समारंभप्रसंगीं चारदोन कोटी लोकांच्या नेत्यांनींच प्रशस्त सभागृहांमध्यें चारदोनशें जाण-कारांच्या उपस्थितींत त्यांची चहा करण्यासाठीं त्यांनाच निमंत्रिलें होतें. हा फरक प्रचंड आहे. त्यांच्या कामाची बरीच ओळख झाल्यामुळें लोकांकडून उत्स्फूर्तपणें हा फरक दिसण्याजोगें तें सत्कार्य घडलें.

सन १९४४ मध्यें तो मामुली समारंभ ज्या चारदोनांच्या उपस्थितीनें उरकला त्यांच्यापैकींच एकानें 'तुमची एका विलक्षण कर्तृत्वाच्या माणसाची ओळख करून देतों' असें म्हणत मला त्यांच्यापुढें नेलें होतें. ती आठवण मला १७ वर्षांनीं त्यांनीं आपल्या सूचीचा दुसरा भाग पुरा केल्यावेळीं झाली. प्रथम गेलों त्यावेळीं ते पुस्तकांच्या प्रचंड थप्प्या मागें, पुढें, बाजूला, फळ्यांवर, कोनाड्यांमध्यें, जेथें जेथें जागा होती तेथें तेथें जुळवून नीट रचल्या होत्या त्या खोलींत बसलेले होते. खोलीच्या मध्यावर बसण्याइतकी मोकळी जागा मुद्दाम राखलेली होती. पुस्तकांवर धुरळ्याचीं तशीं पुटेंहि जास्त दिसत नव्हतीं. म्हणजे त्या सर्व थप्प्या मधूनमधून झटकल्या, उचलल्या जात होत्या त्या केवळ नव्यानें प्रकाशित झालेल्या व भावी काळांत क्रमशः खपावयाची होती त्या त्यांच्या ग्रंथसूचीच्या नव्हत्या. जुनीं दुर्मिळ, दुष्प्राप्य, पुनरलभ्य म्हणतां येतील अशीं पुस्तकें मी विचकत बिचकत थोडथोडीं हाताळू, तपासूं लागलों होतों. त्या मला प्रचंड संख्येतलीं तीं आद्यमुद्रितें पाहून तीं जमा

करणाऱ्या माणसापुढें काय नि कसें बोलावें हा विचार पडला. ' ग्रंथसूची ' मला १९४४ च्या जूनमध्यें प्रथम दिसली. त्या क्षणीं दात्यांच्या अंगींच्या प्रचंड कार्यशक्तीची पहिली ओळख झाली होती. असंख्य आद्य-मुद्रितांच्या त्या थप्प्या सभोंवतीं पाहून त्यांच्या चिवट शोधक वृत्तीची चुणूक त्या पहिल्या भेटींत मला दिसली. नंतर त्यांच्याशीं झालेल्या थोड्याशा संभाषणावरून माझी खात्री झाली कीं आम्हा ग्रंथपाल म्हणविणारांपैकीं मीच त्यांच्यासमोर पहिल्यानें गेलों होतों.

मी आपण होऊन त्यांस भेटलों या गोष्टीचें त्यांस बरेंच बरें वाटलें असावें. मला स्वतःला तर वाटलेंच. त्यांना बरें वाटलें याचें कारण हें असलें पाहिजे. ग्रंथसूचीनिर्मितीच्या प्रचंड लोकोत्तर कार्याच्या दृष्टीनें त्या कामाला व खुद्द दात्यांना अनेकपट प्रसिद्धी मिळणें अवश्य होतें. अन्य अनेक कामांचें आपणास असेंच दिसतें. उदाहरण म्हणून अभूतपूर्व अशा मातीच्या धरणांची गोष्ट घेऊं. स्थानिक, वैयक्तिक, आर्थिक, राजकीय इत्यादि हेतूंनीं असल्या अनेक योजना वऱ्याचदां होत असतात. आणि योजनेच्या सविस्तर मांडणींत पहार–टिकावाच्या पहिल्या घावापासून तों मुळांत पाणी सोडणें नि नंतर सर्वत्रचे बागमळे फुलाफळांनीं लहडणें व त्यांतलें पहिलें फूल वा पहिलें फळ कोणाच्या हातांत अमक्यानें देणें येथपावेतोंहि सबंध योजना ऊर्फ प्रकल्प आखून–रेखून–लिखून तयार झाल्याचें दिसतें. ' मराठी ग्रंथसूची सन १८०० ते १९३७ ' हा ग्रंथराज गोवें ते ग्वालेर दरम्यानच्या शेकड्यावारी ग्रंथालयांमध्यें पायपिटी करून, सहस्रावारी ग्रंथ वा ग्रंथुकलीं जातीनें हातीं घेऊन, ग्रंथनाम–उपनाम, मालानाम–पुष्पक्रमांक, निनांव–टोपणनांव, एक वा अनेक लेखक, मुद्रणवर्ष–मुद्रणालय, प्रकाशक–प्रकाशन स्थळ–प्रकाशनवर्ष, आवृत्ति, प्रस्तावना, अनु-क्रमणिका, लेखकाचे चार वा चारशें विचार, पृष्ठसंख्या, उल्लेखसूची, अभ्यास-सूची इत्यादि किरकोळ नि यांत्रिक वाटणारे पण अतिकिच्चकट असणारे एकूण तपशील स्वतः पाहून ' नादृष्टं लिख्यते किंचित् ' या प्रतिज्ञेनें दाते यानीं तयार केला. तें एक अतुलनीय अमोल कार्य झालें. तरीहि आरंभा-आधीं, कार्यवाही चालली असतांना व तडीला गेल्यावरहि तशी कांहींच प्रसिद्धी या कार्याला वा त्याच्या त्या कर्त्याला नि कृतीलासुद्धां प्रथम खंडाच्या समयीं म्हणजे १९४४ मध्यें मिळूं शकली नाहीं.

तशी प्रसिद्धि मिळाली नाहीं त्याला एक कारणहि आहे. पुष्कळदां एका गोष्टीवर दुसरी गोष्ट अवलंबून असते. एका धंद्यानंतरच दुसरा धंदा निघू शकतो. उदाहरणार्थ भांडण्याचा धंदा असणारे भांडखोर भाऊबंद प्रथम हवेत. नंतर भांडणें लढवणारे, खेळवणारे वकील हवेत. मग त्या वकील लोकांच्या शब्दकसरतींतून सत्य शोधणारे न्यायाधीश हवेत. भांडखोरांमुळें वकिलांना व भांडणकज्जांच्या निकालांमुळें जज्जांना प्रसिद्धि मिळते. याप्रमाणेंच ग्रंथ निर्माण करणाऱ्या लहानथोर लेखकांना प्रकाशक-विक्रेते-देवघेव करणारीं ग्रंथपालमंडळीं–विक्रयालयें-ग्रंथालयें यांचें साह्य अवश्य आहे. सन १९४४ पावेतों सर्व-सामान्य माणसापर्यंत पोंचलेलीं ग्रंथालयें असलींच तर फारच तुरळक असतील. निदान त्यांचा बोलबाला नव्हता. सरकारच्या १९४७ पासून सुरू झालेल्या मुक्तद्वारांच्या योजनेमुळें तसा बोलबाला त्यानंतर होऊं लागला. माझ्यासारखे अनेक ग्रंथालयसेवक ग्रंथालयें, ग्रंथपालन, ग्रंथसूची यांविषयीं बोलूं लागले. दात्यांसारख्या प्रचंड शक्तिमंताच्या दीर्घदृष्टीला याचा लाभ दिसला. मी वेगळेंच, विरुद्ध बोललों–लिहिलें तरी त्याचेंहि ते स्वागत करीत आले. म्हणत आले, "तुम्ही बोलायला लागा."

मी प्रथम जो त्यांच्यापुढें गेलों, बसलों, बोललों तो शंभर टक्के विद्यार्थी-वृत्तीनें. तेव्हांपासून दीड तप संपलें आहे. दीड तपांत आमचा खूप संबंध आला आहे. कधीं त्यांना हवीं तीं संदर्भवाचनीयें क्षणांत मिळून ते खूष झाले आहेत तर कधीं तीं देण्यासाठीं मी असमर्थ झाल्यानें त्यांच्या सहन-शक्तीचा अंत होऊन त्यांनीं वाक्ताडनहि केलें आहे व मी तें सहन करीत आलो आहे–केव्हां अडचणींची त्यांची आठवण जागी करून, केव्हां कांहींच न बोलतां. पण या रीतीनें आम्ही खूप जवळ आलों आहों. कदाचित् अन्य कोणाहि ग्रंथपालाहून वा सामान्य माणसाहूनहि आम्ही जवळ आलों आहों. पण असें असूनहि आणि इतक्या काळांत मी त्यांना चांगला ओळखत असूनहि अनेकदा वाटूं लागतें कीं मी त्यांना अजून तरी खरोखरी ओळखतों आहे कीं नाहीं? इतके ते गहन आहेत, अजस्र आहेत, प्रचंड आहेत. हीं तीनहि विशेषणें स्पष्ट करतों. गहन म्हणतों यासाठीं कीं असंख्य वेळा अनेक विषयां-संबंधी माहिती देऊन बैठकींत ते रंग भरतात. तर कित्येकदा रागानें बेरंग करतात. कारणें तपासूं लागलो कीं एक सुद्धां तसें कांहींहि कारण हातीं येत नाहीं.

म्हणून त्यांना मी गहन म्हणतो. या गहनतेमुळेंच कित्येक वेळा ते मोठे अजब वाटतात. ज्याचें आज तोंड भरून ते कौतुक करतील त्याचेंच उद्या " फिरून तोंड पाहाणार नाहींत " अशी प्रतिज्ञा करून टाकतील. पण अर्थात् ही प्रतिज्ञा कांहीं क्षणांपुरतीच असते. ही प्रतिज्ञा करतांनाच्या आवेशामुळें नि मग ती उगाळीत न बसतां सोडून देण्याच्या अति मोकळ्या आवेगामुळें ते अजब वाटतात. " शैत्यं हि यत् सा प्रकृतिर्जलस्य " या वचनाची मला हटकून आठवण होते. त्यांच्या घरांतील बैठकीसभोंवार असंख्य आद्यमुद्रितांचा जो अजबखाना आहे तोहि त्यांच्या अजबपणाची साक्ष देत असतोच. त्यांच्या उद्योगामुळें त्यांना प्रचंड शक्तीचे, उद्योगाचे नि चिकाटीचे पुरुष मी म्हणतों. क्वचितच सामान्य दृष्टीला दिसणारीं रद्दीमधलीं आद्यमुद्रित रत्नें शोधून काढणें, जमवणें आणि त्यांची नि एकूण मुद्रित ग्रंथांची सूची करणें हा केवढा अकटो-विकटो उद्योग व खटाटोप आहे याची कल्पना ग्रंथपालांना चांगली आहे आणि ग्रंथपालांहूनहि जास्तच विद्वान् संशोधकांनाहि ती आहेच. आणि म्हणून अशीं सर्वत्रचीं मंडळी त्यांना प्रचंड मतांनीं प्रचंड पुरुष म्हणतील. पैसा, मानपान, प्रसिद्धी हे ऐहिक हेतू न धरतां केवळ ज्ञान मिळविण्याच्या नि देण्याच्या ब्रह्मानंदांत निमग्न होऊन काम करणाऱ्या प्रचंड महाराष्ट्रीयांपैकी ते एक आहेत.

ग्रंथनिर्मिति इतक्या झपाट्यानें नि अलोट प्रमाणांत वाढते आहे कीं दर दहा बारा वर्षांमध्यें निघणाऱ्या नव्या नव्या पुस्तकांमुळे त्या आधींचीं चांगलीं चांगलीं अनेक पुस्तकें मागें सरून दुर्मिळ होत जातात. माझ्या लहानपणीं मीं वाचलेलीं नि पाहिलेलीं अगणित पुस्तकें आज दुर्मिळ आहेत. पण दात्यांच्या शोधक दृष्टीला कांहींहि दुर्मिळ नाहीं. मानार आखाताच्या तळाशीं बुडी मारून मोत्यें काढून आणणाऱ्या पाणबुड्याप्रमाणें किंवा जुन्या ऐतिहासिक वाड्या-मधल्या अतिखोल विहिरींमधून बुडालेलीं भांडीं वर काढणाऱ्या बाक्या पोह-णाऱ्यांप्रमाणें ते जुन्या बाजारांतून किंवा जुनाट घराण्यांमधून कितीतरी दुर्मिळ, पुनरलभ्य आद्यमुद्रितें वारंवार शोधून वेचून घेऊन येत असतात. मला दुसरी एक अशीच वेगळी आठवण होते. जुनाट बखळींमध्यें किंवा खेड्यांमध्यें अने-कदा अस्सल नाग फणा काढून समोर खडे होत असतात. त्यांस आपला धक्का लागला अशी भीतीची भावना अनेकांस होते. मग नाग पकडणाऱ्या मांत्रि-काला ती आपत्ति दूर करण्यास ते सांगतात आणि ते मांत्रिक सर्वांसमोर

बिळांतून वा सांदींतून नागाला ओढून आणून संग्रंधितांना आश्चर्यात नि आनंदांत टाकतात. तीच आश्चर्य नि आनंद देणारी कृति दात्यांच्या हातून घडते. ग्रंथपालांना अमूक एक पुस्तक आपल्या ग्रंथालयांत नाहीं अशी रुखरुख वाटत असते. कोणत्या क्षणीं कोणी वाचक मागणी करीत खडा होईल याचा नेम नसतो. मग दात्यांना ती रुखरुख दूर करण्याकरतां आवाहिलें कीं प्रत्येक वेळीं ते आम्हा ग्रंथपालांना आश्चर्यात नि आनंदांत टाकतात. माझ्या ( मोरेश्वर पुरुषोत्तम या ) पणजोबांचें सन १८४० च्या सुमारास शिळा छापखान्यांत छापलेलें ‘ अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरींतील कठिण शब्दांचा अर्थ ’ हें छोटें पुस्तुकलें त्यांनीं एके दिवशीं अक्षरशः चिमटींत धरून माझ्यापुढे आणलें ही मला कायम आठवण राहिली आहे. दोनच वर्षांपूर्वी दुर्मिळ ग्रंथांचे पुण्यांतलेच एक रत्नपारखी पारखीशास्त्री यांचा पंचाहत्तरवर्षपूर्तीचा सत्कारसमारंभ पुण्यांत झाला. त्या पारखीशास्त्रींसारखेच दाते हेहि दुर्मिळ वाङ्मयाचे म्हणजे आद्य-मुद्रितांचे एक रत्नपारखी आहेत.

हे पारखी शास्त्री किंवा दाते नसते तर ? अनेक महत्त्वाच्या ग्रंथालयांना अनेक महत्त्वाच्या आद्यमुद्रितांवाचून उणें राहावें लागलें असतें. असंख्य दुर्मिळ ग्रंथांचीं पानें किराणेवाले, भेळवाले यांच्याच हातीं जाऊन पुड्या वा नळकांड्या करण्यानें नष्ट झालीं असतीं. बडोद्याचें काचेची प्रकाशपरावर्तक भुई असणारें मध्यवर्ती ग्रंथालय, कलकत्त्याचें राष्ट्रीय ग्रंथालय, मुंबई-पुण्या-सारखीं विद्यापीठ ग्रंथालयें, लोणावळ्याचें कैवल्यधाम योगविद्याग्रंथालय, म. म. दत्तोपंत पोतदारांचा प्रचंड संग्रह, पुण्याचें फर्ग्युसन कॉलेजचें ग्रंथालय किंवा महाराष्ट्र ग्रंथालय येथले संग्रह पुष्कळच उणे, अपूर्ण राहिले असते. आणि अशा महत्त्वाच्या ग्रंथालयांची ती स्थिति खरोखरी केविलवाणी राहिली असती. असंख्य पानें या ग्रंथभांडारांमध्यें न येतां वाऱ्यावर उडून नि रद्दीमध्यें पडून मातीमोल झालीं असतीं. भुग्यांचा ढीग होऊन गेलीं असतीं. किंवा उंदीर, कसर, बारुडें, वाळकें व वाळवी यांच्या तोंडीं गेलीं असतीं. दात्यांनीं व त्यांच्यासारख्यांनीं या दुरवस्थेंतून सहस्रशः ग्रंथसंपत्ति अक्षरशः वाचवली आहे यांत संशय नाहीं. वर उल्लेखिल्यांसारख्या विविध ग्रंथालयांना जरी त्यांनीं हें सर्व विकत दिलें असलें तरीहि त्या सर्वांनीं व तेथल्या ग्रंथपालांनीं व संशोधकांनीं या रत्नपारख्यांविषयीं सदैव कृतज्ञतेचीच भावना ठेवली

पाहिजे. ते दुर्मिळ ग्रंथ शोधून काढण्याच्या कामांत दाते सदोदित रंगलेले आहेत. त्या कामाचे ते एक अतिशय बाकबगार जादूगार आहेत. या कामांत होणारा आनंद 'माय् हार्ट लीप्स अप् व्हेन आय् बिहोल्ड ए रेन्बो इन् दि स्काय्' ह्या मनोहर काव्यपंक्तींनीं त्यांनीं कित्येकदां माझ्यासमोर आद्यमुद्रितें दाखवीत व्यक्त केलेला आहे. हा उद्योग त्यांच्या स्वतःसाठीं नसतो. म्हणून ग्रंथालयांनीं निरंतर कृतज्ञता दाखविली पाहिजे.

दाते यांचा दुर्मिळ, दुष्प्राप्य वाङ्मय शोधण्याचा छंद फार जुना आहे. त्यांतूनच त्यांचीं प्रारंभींचीं दोन पुस्तकें लोककथा भाग १ व २ हीं त्या अपूर्व विषयावरचीं सन १९२९–३० मध्यें निर्माण झालीं. त्यानंतरचें त्याहूनहि महत्त्वाचें प्रचंड काम म्हणजे ग्रंथसूचीचा १९४४ मध्यें पुरा केलेला १ ला भाग व १९६१ मध्यें संपवलेला २ रा भाग. आतां तूर्त तरी ते ग्रंथसूचीकडे वळणार नाहींत. ही त्यांच्या अविरत उद्योगाची कथा अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टींसारखी आहे. त्या कथासागरांत कथेंतून कथा निघते. त्याप्रमाणेंच दात्यांच्या एका उद्योगांतून दुसरा, एकानंतर दुसरा उद्योग लगेच तयार असतो. कामांच्या पलटणी हात जोडून त्यांना 'प्रेझेंट आर्म्स' करीत खड्या आहेत. प्रा. आप्पासाहेब फडके जसे जबरे कादंबरी लेखक, म. म. द. वा. पोतदार जसे खंबीर सभाभूषक, आचार्य अत्रे जसे हजार व्याप चालक तसेच हे दाते न दमणारे साहित्य संशोधक. आज ते सुमारें १८४० ते १९५० दरम्यानच्या मासिकांमधील लेखांच्या सूचींत गर्क आहेत! या कामामधील प्रयासांची नि अशक्यप्रायतेची किती जणांना नेमकी कल्पना करतां येईल? एकदोन अभिनव प्रकारच्या शब्दकोशांच्या कल्पना त्यांनीं जरा बाजूस सारून ठेवल्या आहेत. कारण त्या कल्पना इतरांनीं हाताळल्या आहेत व त्यांच्याहि कामांची बूज व्हावी ही दात्यांची दृष्टि आहे. तें काम नीट पुरें नच झालें तर दाते त्या कल्पना पुन्हा फैलावर घेणार आहेत. दा म्हणजे देणें. दाते हे मराठीच्या अभ्यासकांना कांहीं ना कांहीं चिरकालिक असें देण्याच्या अहर्निश व्यवधानांत आहेत. त्यांना विश्रांति ठाऊक नाहीं, कांहीं मौजहि ते करूंच शकत नाहींत. कारण दाते हेच दाते ह्या एक खांबी संस्थेचे योजक, मालक, चालक, सेवक आहेत. एकटे एक. सर्व संकल्पित कामें सुयंत्र चालायचीं तर यांपैकी एकालाहि विश्रांति घेतां येत नाहीं.

मुंबईतील पहिल्या दर्जाचें विल्सन हायस्कूल येथील प्रशालेय जीवनांत दाते हे एक तल्लख बुद्धीचे विद्यार्थी होते. संस्कृत, गणित, मराठींत त्यांची बुद्धि तरलतेनें फिरे. मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहाल्याचे ते एक गाढे वाचक होते. त्या वाचनामुळेंच मराठी ग्रंथांच्या नेमक्या पद्धतशीर सूचीची गरज त्यांच्या मनांत उभी झाली व तेथपासूनच सुमारें वीस वर्षांनीं म्हणजे १९४४ त ती नांवारूपास आली. बुद्धीचा तल्लखपणा एल्फिन्स्टन महाविद्यालयांतहि प्रगट झाला. तेथें इंटरमध्यें त्यांना संस्कृतची शिष्यवृत्ति मिळत होती. पण कांहीं मनस्तापामुळें त्यांनीं मुंबईच सोडली. तेव्हां तें कॉलेजहि संपलें. पण त्यांची अभ्यासवृत्ति संपली नाहीं. त्यांच्या बुद्धीनें त्यांना सोडलें नाहीं. त्यांचें बौद्धिक काम अविरत चाललें आहे. मराठी ग्रंथसूची सन १८०० ते १९५० हा भारतीय वाङ्मयाच्या व संशोधनाच्या जगांतला एक महान् अप्रतिम विक्रम आहे. त्याचें गुणवर्णन कितीहि जणांनीं, कितीदांहि व कितीहि केलें तरी तें प्रत्येक वेळीं थोडेंच ठरेल. त्या ग्रंथांत सन १८०० ते १९५० च्या दरम्यान मराठीमध्ये निर्माण झालेल्यांपैकीं २६,००० वर ग्रंथांची ग्रंथकार, ग्रंथनाम, माला, पृष्ठें, प्रकाशक, मुद्रणालय, अंतर्गत ग्रंथांश इत्यादि बहुपरीची अभ्यासोपयोगी माहिती पद्धतशीर दिली आहे. सर्व माहिती विषयवार आहे. ग्रंथाचे शेवटीं ही सर्व माहिती तत्काल सापडावी अशा अक्षरवार रचनेचा संदर्भकोश जोडून एकंदर माहिती सर्व-बोधक करून दिली आहे. कै. न्यायमूर्ति म. गो. रानडे यांनीं केलेल्या अनेक चिरस्मरणीय कामांमध्ये अशीच त्या काळापावेतोंच्या मराठी पुस्तकांची यादी व तीसंबंधींची टिप्पणी हें एक काम आहे. सर्व सामान्य जनांना यावरून ग्रंथसूचीचें महत्त्व स्पष्ट होईल. ही माहिती गोळा करतांना दात्यांना गोवें ते ग्वालेर आणि बीड ते बडोदें अखंड पायपिटी करावी लागली. चार-दोन लाख चिठ्यांवर नोंदी कराव्या लागल्या. ह्या सर्व चिठ्या पद्धतशीर अक्षरानुक्रमानें व विषयानुक्रमानें जुळवाव्या लागल्या. हें नोंदी करण्याचें व चिठ्या जुळण्याचें वरवर यांत्रिक वाटणारें पण प्रत्यक्षांत अतिशय किचकट असणारें काम वर्षानुवर्ष चाललें होतें. अन्य कोणाचीहि मदत त्यांनीं घेतली नाहीं. शारीरिकहि नाहीं व आर्थिकहि नाहीं. त्यांच्या एकूण कामाच्या व श्रमांच्या शतांश प्रमाणांतहि त्यांना सरकारी मदत त्यावेळीं मिळाली नाहीं. जवळचे व दूरचे आप्त त्यांच्या ह्या कामाच्या व्यापाकडे उपद्व्याप म्हणून

पहात होते. पण कुत्सेच्या ह्या हालहलाला ते मुळींच भ्यायले नाहींत. हातीं घेतलें तें काम पूर्ण करीपर्यंत ते थांबले नाहींत. निश्चितार्थापासून सत्त्वधीर ढळत नाहींत हें वचन त्यांनीं सार्थ केलें. असा त्यांच्या ग्रंथसूचीमागें प्रचंड बौद्धिक व शारीरिक तपश्चर्येचा विक्रम आहे. असाच आणखीहि एक प्रज्ञोन्मेष १९४६ मध्यें प्रकट झाला. पद्मश्री डॉ. रंगनाथन् यांची कोलन वर्गीकरण पद्धती इंग्रजी ए ते झेड् या मोठ्या व लहान अक्षरांचा उपयोग करून बसविलेली आहे. त्यांपैकीं लहान अक्षरें मराठींत म्हणजे नागरींत कशी दाखवावीं हा पद्धती-कर्ते डॉ. रंगनाथन् यांच्यापुढे कोलनच्या संपूर्ण स्वदेशीकरणाबाबतचा उकलत नस-णारा कूटप्रश्न होता. १९४४ नंतर ग्रंथसूचीच्या व्यापांतून मोकळे झाल्यावर थोडा काळ विचार करून तो कूटप्रश्न दात्यांनीं सोडवला. मोठ्या अक्षरांच्या जागीं जशीं क, ख, ग इत्यादि अक्षरें वापरावयाचीं तशींच लहान ए ते झेड् या अक्षरांच्या जागीं सानुस्वार म्हणजे कं, खं, गं वापरण्याची चपखल युक्ती दाते यांनीं कर्त्यांपुढे ठेवली आणि तो कूटप्रश्न संपला. अत्यानंदभरांत गुरुवर्य रंगनाथन् उद्गारले, “ युरेका ! युरेका ! ऑल दि ऑनर टु दाते ! ( सापडली ! युक्ती सापडली ! दात्यांना शतधा धन्यवाद ! ) ” आणि यानंतर राज्य-सरकारनें स्थापन केलेल्या मराठीच्या संग्रहालयांत म्हणजे महाराष्ट्र ग्रंथालयांत व उन्हाळ्यांत चालणाऱ्या ग्रंथालयसंघाच्या ग्रंथपालनवर्गांत मराठी वर्णांची कोलन पद्धती लहान ग्रंथालयांमधल्या लहान ग्रंथपालांनाहि शिकवतांना उपयोगिली जाऊं लागली. मराठी अक्षरांमुळे ती शिकवतांना किंचितहि अडचण उरली नाहीं.

दाते मुंबई सोडून पुण्यांत आल्यावर त्यांना धीर दिला, नेमकी दिशा दाखवली तशाच एका प्रचंड बुद्धिमंतानें. त्या काळांत मधून मधून डोळे दिपविणारी चमक दाखवूं लागलेल्या आचार्य अत्र्यांशेजारींच दाते रहात होते. दात्यांमधली बुद्धि नि धडपड त्या गुणज्ञ माणसानें हुडकली व त्यांनीं दात्यां-मध्ये आत्मविश्वास ओतला. त्या काळांतच लोककथांची जुळवाजुळव नि प्रकाशन झालें आणि ‘ टिटवीनें समुद्र आटवण्याची हालचाल ’च अशी ग्रंथसूचींच्या टिपणांची सुरुवात झाली. पुढे कालक्रमांत स्वदेशी मंत्रीमंडळ आलें. नामदार खेरांनीं दात्यांचा तो लोकविलक्षण उपक्रम पाहून त्यांच्यासाठी मुंबईतील सरकारी दप्तरखान्याचीं बंद दारें उघडून दिलीं. तेव्हां दप्तरखान्याचा

संपूर्ण अंतर्भाग त्यांना सुपरिचित झाला आणि त्यामुळें त्यांच्या मनांत एक कल्पना चमकली. दप्तरखान्यांत जें साहित्य नुसतें पडलेलें होतें त्याचा उपयोग करून मराठीचें सरकारी संग्रहालय स्थापण्याची ती कल्पना त्यांनीं नामदार खेरांपुढे ठेवली. त्यावर विचार होण्यासाठी १९३९–४० मध्ये ग्रंथालयसमिति नेमली गेली आणि पुढे त्या समितीच्या शिफारशींवर आधारून १ मार्च १९४७ पासून पुण्यांत महाराष्ट्र ग्रंथालय हें सरकारी संग्रहालय व प्रादेशिक मुक्तद्वार ग्रंथालय म्हणून उघडण्यांत आलें.

ग्रंथसूचीच्या १ ल्या भागाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं लिहिलें आहे, " मराठी भाषेंत गेल्या दीडशें वर्षांत जे ग्रंथ छापले गेले त्या एकंदर ग्रंथांचा संग्रह असलेलें एकहि ग्रंथालय महाराष्ट्रांत नाहीं. वरील ध्येय नजरेपुढे ठेवून ठाणें, पुणें, मुंबई व बडोदें येथें संग्रह जमविण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु या सर्व ग्रंथालयांच्या संग्रहशाखेंत मराठींतील निम्मे अधिकच ग्रंथ दिसतात. अशा स्थितींत स्वयंपूर्ण मराठी ग्रंथालयाचे अभावीं अभ्यासकांचे किती हाल होत असतील ह्याची कल्पना करावी. अभ्यासकाला कोण यातायात करावी लागते ! त्याला आपला बहुमोल वेळ ग्रंथ व साधनशोधनांतच दवडावा लागतो. जो वेळ समीक्षण व विचिकित्सा यांवर खर्ची पडावयाचा तो अशा प्रकारें वाया जात असलेला पाहून हळहळ वाटते. ग्रंथसूचीचें काम चालू असतां आम्हाला हा प्रश्न विशेष तीव्रतेनें जाणवला. प्रत्येक ग्रंथ प्रत्यक्ष पाहून मगच नोंद करावयाची असें कठोर व्रतच आम्ही स्वीकारल्यामुळे ग्रंथांची आम्हाला वारंवार गरज पडे. ग्रंथशोधनासाठी हजारो मैल प्रवास करावा लागला. शेंकडो रुपये खर्च झाले. पांच वर्षें खर्ची पडली. तरी समग्र मराठी ग्रंथांचा शोध लागला असें आमच्यानें अद्यापि म्हणवत नाहीं. हें काम खरें म्हणजे सरकारचें. सरकारला द्रव्य व साधनें यांची वाण नाहीं. मात्र आंतरिक तळमळ हवी. या कामीं कांहीं हालचाल व्हावी म्हणून आम्ही मुंबई प्रांताचे तत्कालीन प्रधानमंत्री श्री. खेर यांस भेटून सर्व परिस्थिति निवेदन केली व लेखी कैफियतहि सादर केली. तिचा आशय असा—छापखाने आणि ग्रंथनोंद कायद्यान्वयें सरकारकडे जाणाऱ्या प्रतींपैकी एक प्रत मुंबईच्या दप्तरखान्यांत धूळ खात पडते. अशा हजारों ग्रंथांची कांहींहि व्यवस्था सरकारनें केलेली नाहीं. ते ग्रंथ सुव्यवस्थित लावून, त्यांचें वर्गीकरण करून,

नसलेले ग्रंथ खरेदी करून एक ' मराठी संदर्भ ग्रंथालय ' सरकारनें स्थापावें. त्यांत हस्तलिखितांचा, मासिकांचा व वृत्तपत्रांचाहि संग्रह करावा. " श्री. खेर यांना ही योजना पटली. त्यांनीं ग्रंथालयविकास योजना आन्खून घेतली. पण युद्धजन्य परिस्थिति आली आणि १९४७ पावेतां ग्रंथालय स्थापना लांबली. श्री. खेर यांनीं या प्रश्नास त्यावेळीं पुन्हा चालना दिली. आणि सन १९४० च्या आर्थिक परिस्थितीनुसारच्या तंतोतंत शिफारशीं-बरहुकूमच १९४७ मध्ये मराठीचें सरकारी संग्रहालय पुण्यांत सुरू झालें. त्याच्या कपाळीं आर्थिकच नव्हे तर सर्वच प्रकारची अस्थिरता नि दैन्य आलें. मिळणाऱ्या केवळ अनुदान रकमेंत फक्त संग्रहाल्याचीच व्यवस्था ठेवायची जबाबदारी नव्हती. मुक्तद्वार वाचनालय, बालविभाग, भाड्यानें घ्यावी लागलेली तुटपुंजी जागा, अनुदानांतले ७५ टक्के ग्रंथ खरेदी या जबाबदाऱ्याहि गळ्यांत आल्या. त्यामुळे जागेंत वाढ होऊं शकली नाहीं. इन मीन तीन सेवकांच्या चिमण्या ताफ्यांत भर पडली नाहीं. वृत्तपत्रांच्या फायली विकून टाकल्या गेल्या. व्यवस्था पालटल्या. पण ग्रंथालयाची व्यवस्था दीर्घ मुदतीपर्यंत बऱ्याकडे पालटली नाहीं. आणि दात्यांना सूचीच्या दुसऱ्या भागाच्या संपादनाच्या वेळींहि या संग्रहालयाचा व्हावा तसा उपयोग मिळणें कठिणच झालें. मिळण्याजोगें असेल तें तें ते मागून घेत. अपेक्षेपेक्षा अति कमी मिळे. त्याचा त्यांना ताप होई. अर्थात् अशा अपुऱ्या साह्यापायीं होणारा ताप ते अंगावर आल्याप्रमाणें आरडाओरडीनेंहि प्रकट करीत.

दाते म्हणजे अगदी साधे गृहस्थ. साधेपणा व नेटकेपणा यांचा संयोग. पोषाख अगदी साधा पण आधुनिक. वय ५८ झालें तरीहि केस बहुंश काळे नि विपुल. अक्षर म्हणजे मोतीच. कांहींहि काम ते करोत. तें आखीव, रेखीव, योजून, मोजून नि मापून भविष्यांत संपूर्ण नीलचित्र पाहूनच जणूं त्यांच्या कार्याचा आरंभ होतो. त्यांचं ध्येयवाक्यच ' दीर्घं पश्यत मा ऱ्हस्वम् ' हें आहे.

अनेक दाते प्रसिद्ध आहेत. सर्व परिचित नटवर्य केशवराव. पुण्याचे मुद्रण-पटु मामाराव. पुण्याच्या कलागृहाचे तीर्थयात्रेकरी शंकरराव. पुण्याचेच दिवंगत श्रीधर विठ्ठल. मुंबईचे असें आठवतें ते कुत्र्यांना कसरत शिकवणारे एक, तसेंच अंधशाळेचे व्यवस्थापक असणारे दुसरे व तिसरे रोगोपचार पटु डॉ. लक्ष्मणराव. शब्दकोशाचे यशवंतराव. आणि माझ्या कुलाबा जिल्ह्यापुरते प्रसिद्ध असणारे

कॉंग्रेस पाईक आण्णाराव. या सर्व दात्यांमध्ये रत्नागिरी जिल्ह्यांतल्या आडिवऱ्याचे नटवर्य केशवराव व ग्रंथसूचीकार शंकर गणेश हे दोन गांवकरी दाते असंख्यांच्या अनेकानेक वर्षें, अनेक पिढ्या ध्यानांत रहाणार आहेत. केशवराव नाट्याभिनयामुळे व शंकर गणेश ग्रंथसूचीमुळे. ग्रंथसूचीकारांना उद्देशून म्हणावेंसें वाटतें—'लोकीं पावसि तूंच सूचिकृतिनें धन्यत्व या जन्मुनी। साहित्याभ्यसनांत तूंच पहिला, दात्यांमधे अग्रणी ॥'

★ ★ ★

# ९. आपले पहिले राष्ट्रीय ग्रंथपाल–

## पद्मश्री श्री. केशवन्

“ आतां पुन्हा भेट पुढच्या परिषदेंत. ती पुढची परिषद मी गोबीच्या वाळवंटांतच घेण्याचा विचार केला आहे. ” सन १९५३ च्या हैदराबाद परिषदेनंतर आम्ही एकमेकांचा निरोप घेतला तेव्हां संघाचे अध्यक्ष झालेले श्री. केशवन् उद्गारले. त्या अचूक उद्गारांची माझी आठवण अविस्मरणीय आहे. मोसमी वाऱ्यांलगतच्या ऐन जून महिन्यांतल्या अत्युच्च उष्णतामानांत हैदराबादी हवेंत १० वी भारतीय ग्रंथालय परिषद झाली. ऐन वैशाखी तापानें सर्वच प्रतिनिधी हैराण झाले होते. त्यांमधलेच एक श्री. केशवन्. वरील उद्गारांत परिषदस्थळ व काळ यांविषयीं स्पष्टपणें त्यांनीं आपली बिनचूक प्रतिक्रिया व्यक्त केली होती. सफाईदार इंग्रजींत आपले विचार सुस्पष्टपणें मांडण्याच्या त्यांच्या मोकळ्या वृत्तीमुळे तेव्हापासून ते माझ्या चांगले स्मरणांत राहिले आहेत.

पद्मश्री डॉ. शि. रा. रंगनाथन् यांचें नांव ग्रंथपालन क्षेत्रामध्ये भारतांत तसेंच परदेशांत सर्वोच्च बहुमानाचें व अक्षय आदराचें झालेलें आहे. त्यांच्याप्रमाणेंच दुसरेंहि एक भारतीय नांव शिक्षित ग्रंथपाल मोठ्या स्नेहमयतेनें उच्चारतात. कलकत्त्यामधील भारताच्या सर्वोच्च राष्ट्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. बी. एस्. केशवन् बी. ए. ( ऑनर्स–म्हैसूर ), एम्. ए. (ऑक्झन), डिप्. लिब्. ( लंडन ) हे १९५३ पासून भारतीय ग्रंथालय संघाचे सूत्रधार झालेले आहेत. १९६१ मध्ये तत्कालीन राष्ट्रपति नामदार डॉ. राजेंद्रप्रसाद

यांनीं ' पद्मश्री ' पदवीचा त्यांस प्रसाद दिला. पुणें, मुंबई, नागपूर येथे येऊन अनेकदा जाहीर व्याख्यानें दिल्यामुळे डॉ. रंगनाथन् याची अद्वितीय थोर ग्रंथपाल अशी महाराष्ट्रास माहिती झालेली आहे. येथें श्री. केशवन् यांची माहिती भारतांतले द्वितीय थोर ग्रंथपाल म्हणून देण्याचें योजलें आहे.

" ग्रंथालय म्हणजे मासिकें व वृत्तपत्रें ठेवण्याची आणि पुस्तकांची देव-घेव करण्याची जागा व ग्रंथपाल हा पुस्तकें देणारा–घेणारा कारकून " या पलीकडे " लायब्रेरियन उर्फ ग्रंथपाल म्हणजे कांहीं विशिष्ट शिक्षणाचा, जबाब-दारीचा, महत्त्वाच्या कामाचा, उत्तम शासकीय गुणमानाचा अधिकारी आणि ग्रंथालय म्हणजे शांतपणें अवश्य तें वाचन करण्यासाठी योग्य वातावरण, योग्य वाचनीयें आणि सोईचीं नि सुरक्षित आसनें असणारी जागा " ही कल्पना सर्वत्रच्या सार्वजनिक म्हणजेच वर्गणी ग्रंथालयांमध्येच काय, शाळा–कॉलेजांसारख्या शिक्षणसंस्थांतूनहीं अजून संपूर्णपणें शिरलेली नाहीं. ग्रंथालयें नि ग्रंथपाल यांच्याकडे पहाण्याची सुशिक्षितांचीहि दृष्टी अजून अरुंद क्षितिजां-चीच आहे. मग सर्व सामान्यांचें काय विचारावें? मराठी जगतांत डॉ. रंग-नाथन् त्यांच्या शिष्यपरिवाराच्या संबंधामुळे बऱ्याच वेळा येऊन, राहून, हिंडून, बोलून गेले असल्यानें त्यांच्या नांवाला चांगली ख्याति प्राप्त झालेली आहे. परंतु भारताचे पहिले राष्ट्रीय ग्रंथपाल केशवन् यांना त्या रीतीनें अद्यापि इकडे कोणीहि आणलेले व हिंडवलेले नसल्यानें त्यांच्या नांवाला अजून तशी प्रसिद्धी मिळालेली नाहीं. पण महाविद्यालयें व विद्यापीठें यांच्या ग्रंथालयांशीं श्री. केशवन् यांचा भारतीय ग्रंथालय संघ व भारतीय ग्रंथालय परिषदा यांमुळे चांगला परिचय आहे. प्रशालेय व सार्वजनिक ग्रंथालयें व ग्रंथपाल यांना भारताच्या या महान् ग्रंथालयसंघटकाची, राष्ट्रीय ग्रंथालयाच्या पहिल्या ग्रंथपालाची, भारतीय ग्रंथालयसंघाच्या आजच्या अध्यक्षांची, भारतीय ग्रंथपालनक्षेत्रांतील द्वितीय अधिकारी पुरुषाची माहिती मुद्दाम देत आहे.

बी. एस्. केशवन् हें बेल्लारी श्यामण्णा केशवन् या संपूर्ण नांवाचें संक्षिप्त इंग्रजी रूप आहे. दक्षिण भारतांतील पद्धतीप्रमाणें बेल्लारी हें कुलग्रामनाम प्रथम. नंतर श्यामण्णा तें पितृनाम. म्हणजे आपल्याकडील पद्धतीप्रमाणें ते केशव श्यामण्णा बेल्लारीकर होत. त्यांचा जन्म १९०९ सालीं मद्रासमध्यें झाला. बालपणींच ते मातृसुखविन्मुख झाल्यामुळें त्यांच्या आजोबांनीं त्यांचें

लालन, पालन, शिक्षण केलें. आजोबा मुंबईंत एक हुद्देदार नोकर होते. वडील म्हैसूरांत नोकरींत असत. निवृत्तीनंतर आजोबांहि म्हैसूरांतच जाऊन राहिले. जुन्या पटडींत शिकलेल्या, करडे भासणाऱ्या पण प्रेमळ असणाऱ्या आजोबांच्या देखरेखींत श्री. केशवन् यांचें प्राथमिक शिक्षण झालें. याच समयीं शुद्धोच्चारांसह संस्कृताचे पाठ त्यांना मिळाले. संध्यावंदनादि नित्याह्निक त्यांना दोन्ही वेळां बिनचूक करावें लागे. त्याचा त्यांना अतिशय लाभ झाला. " माझ्या विविध भाषांच्या गोडीचें मूळ तें आहे. ते धडे आजोबांकडून मिळाले नसते तर मी फार मोठ्या संस्कृतींच्या ठेव्यांस मुकलो असतो." अशीं आदरार्थक वाक्यें ते नेहमीं उच्चारतात. आजोबांच्या त्या बालबोध वळणाचा नि मार्गदर्शनाचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. कोणता भारतीय विद्यार्थी आज शुद्ध शाकाहारांत पालट करीत नाहीं? आणि विलायतेंत गेल्यावर तर बोलणेंच नको! पण सहासात वर्षे इंग्लंडांत वास्तव्य करून आलेला हा विद्यार्थी—हा ब्राह्मणपुत्र अजूनहि शुद्ध शाकाहारी आहे. आणि त्या बाबतींत त्यांच्यावर निखालस विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं असें त्यांस जाणणारे ठामपणें म्हणतात.

म्हैसुरांत बी. ए. पदवी इंग्रजींत उत्तम नैपुण्यानें म्हणजे ऑनर्सनें मिळविल्यानें त्यांना ऑक्स्फर्डला पाठविण्यांत आलें. तेथें शेक्स्पीअरवर स्वतंत्र प्रबंध लिहून त्यांनीं एम्. ए. ची ऑक्झन या खास वर्णनाची पदवी मिळवली. त्याच वेळीं ते डिप्. लिब्. हि उत्तीर्ण झाले. म्हैसूरच्या महाविद्यालयांत विद्यार्थी असतांना संस्कृत मंडळाचे उत्साही कार्यवाह, वादविवाद मंडळांतले एक खंबीर घटक, नियतकालिकाचे हुन्नरी संपादक ते असत. बहुविध सांस्कृतिक व साहित्यिक चळवळींमध्यें त्यांचा पुढाकार असे. लहान वयापासून घोटून घटवून कमावलेल्या इंग्रजी वक्तृत्वशैलीचा त्यांच्यावर वरदहस्त आहे.

एप्रिल १९५६ मध्यें कलकत्त्यास त्यांच्या राष्ट्रीय ग्रंथालयाच्या व बंगाल ग्रंथालय संघाच्या सहकार्यानें ११ वी अखिल भारतीय ग्रंथालय परिषद झाली. ही परिषद त्यापूर्वी दर दोन वर्षांच्या कालक्रमाच्या संकेतानें होत होती. आधीच्या परिषदेनंतर संघसदस्यांपुढे ठेवण्यासारखें भरपूर काम होत असे. १० वी परिषद हैदराबाद येथें १९५३ मध्यें झाल्यावेळीं बहुसंख्य संघसदस्यांना विस्मयाचा व विपण्णतेचा धक्का देऊन डॉ. रंगनाथन् यांच्याकडून

श्री. केशवन् यांच्याकडे संघाचें अध्यक्षपद देण्यांत आलें होतें. त्यानंतर परिषद नेहमीप्रमाणें दोन वर्षांनीं न भरता तीन वर्षांनीं भरविली होती व त्या तीन वर्षांत कांहींहि काम संघसदस्यांपुढे ठेवण्याजोगें झालेलें नव्हतें. संघाचें नियत-कालिक म्हणजे संघकार्याचा नगारा. तो टिमकीच्या रूपांत आक्रसून गेल्याचें सर्वांस दिसत होतें. आणि अशा कार्यगतीरीतींविषयीं संघाध्यक्ष या नात्यानें केशवन् यांना खुलासा करणें खरोखरी मुष्किलीचें होतें.

परंतु यावेळीं त्यांना त्यांच्या वक्तृत्व विद्येनें अमाप व हुकमी साह्य केलें. त्यांनीं संघाध्यक्ष म्हणून समारोपाचें व आभार प्रदर्शनाचें जें मोकळें, दिल-खुलास भाषण केलें त्यानें सर्व सभागतांना दिपवून टाकलें. त्यांच्या इंग्रजी वक्तृत्वाचा ढंग सर्वांना एकदम पटला. १९४९ ते १९५३ पावेतों डॉ. रंगनाथन् हे संघाचे सर्वाधिकारी म्हणजे अध्यक्ष होते. त्यांच्याकडून अत्यंत उपयुक्त व योजनाबद्ध गतीरीतीनें व अनुपम श्रेयानें संघाचें काम चाललेलें होतें. संघाचा खजिना रिकामा होता. संघाच्या कचेरींतील टंकयंत्र, तिजोरी व तीमधील कागदपत्र असें सर्व स्वातंत्र्यप्राप्तीच्या धामधुमींत पाकिस्तानच्या वाटेनें थेट ओढून नेण्यांत आलें होतें. डॉ. रंगनाथन् यांनीं तें सर्व परत मिळविलें होतें. संघसदस्यांची संख्या भराभर वाढवली होती व ती वेबाक राखली होती. भक्कम सरकारी देणग्याहि मिळवल्या होत्या. नियतकालिकाच्या प्रकाशनांत वक्तशीरपणा आणला होता. त्याचें रूपस्वरूप अंतर्बाह्य पालटून त्याविषयीं नवोदित व्यावसायिकांमध्ये आपुलकी निर्माण केली होती. देशांत व परदेशांत भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष या किताबतीला बहुमान प्राप्त करून देणारा शीघ्र संचार सतत चालू ठेवला होता. आधींच्या ग्रंथलेखनांत मौल्यवान भर टाकली होती. अशा भव्य स्वरूपांत व भरघोस श्रेयांत चाल-लेल्या संघकार्यांत मोठ्या धाडसानें व गाजावाजानें केशवन् १९५३ मध्ये संघाध्यक्ष झाल्या दिवसापासून अत्यंत थंडपणा येऊन बसला. ( आज १९६४ मध्येहि त्यांत धुगधुगी आल्याचेंसुद्धां चिन्ह नाहीं. संघकार्यांतून दूर होऊन डॉ. रंगनाथन् दिल्लींतून बंगलोरला जाऊन बसले आहेत आणि डॉ. रंगनाथन् यांच्या हातांतून दूर होऊन दिल्लींतून बंगालच्या राजधानींत जाऊन भारतीय ग्रंथालय संघ अगदीं स्वस्थ बसला आहे. ) १९५६ च्या परिषदेंत पुनरपि अध्यक्ष होताच या अति थंडपणाची वक्तृत्वपूर्ण, आर्जवपूर्ण भाषेंत

दिलगिरीपूर्वक साफ कबुली केशवन् यांनीं प्रथमारंभींच दिली. नंतर नाट्यपूर्ण स्वरारोहावरोहांत कारणें स्पष्ट केलीं. कारणें वा परिस्थिति कांहींहि लपविलें नाहीं. आणि अशा मंदगति परंतु प्रांजळ माणसाला पुन्हा एकदा अध्यक्ष केल्याबद्दल केवळ्या तरी ऋणभावनेचें प्रकटन केलें. पुनरपीहि कदाचित् कमीच कार्यवेग राहील असेंहि बोलून टाकलें. ज्या हिरिरीनें, जोपानें व जिद्दीनें हैदराबादेंत त्यांनीं अध्यक्षपद घेतलें होतें ती हिरिरी, तो जोप, ती जिद्द साफ उघडी-बाघडी झाली होती. तरीहि तो समारोप नि आभार प्रदर्शन अशा वक्तृत्व-जोपांत नि टसक्यांत प्रकट झालें कीं सर्वच अत्यंत नाट्यमय, भुलविणारें आणि प्रभावीपणें सभा जिंकणारें होतें.

ही नाट्यमयता त्यांचे ठायीं उपजत आहेसें दिसतें. याच नाट्यमयतेनें व प्रभावानें असेल, त्यांच्या एम्. ए. च्या वर्गातल्याच एका स्वकीय बुद्धि-मतीला त्यांचा मोह पडला. त्या सहाध्यायिनीनें त्यांना अकृत्रिम स्नेह दिला आणि त्यांनीं तिचीच सहचरी म्हणून निवड केली. १९३७ ते १९४४ हीं इंग्लंडांतून उच्च विद्याविभूषित होऊन आलेली पतिपत्नी म्हैसुरांत सेंट्रल कॉलेजांत प्राध्यापक म्हणून गाजलीं. ते कसबी शिक्षक आहेत. म्हैसूर कॉलेज-प्रमाणेंच त्यांनीं कलकत्त्याच्या ग्रंथपालन वर्गात अध्यापनाबाबत असामान्य मान्यता मिळविली आहे. शिक्षकाशिक्षकामध्ये फरक असतो. कांहींना फक्त विषय येतो. कांहींना अध्यापनविद्याच अवगत असते. कांहीं फक्त बोलत असतात. या तिहींचा संयोग केशवन् यांच्या ठायीं आहे. विषयज्ञान, अध्यापनपटुत्व, व भाषाप्रभुत्वपूर्ण वक्तृत्व यांयोगें विद्यार्थ्यांना ते हटकून गुंगवून टाकतात.

१९३७ ते १९४४ या काळांत त्यांनीं म्हैसूरांत कमाविलेली कीर्ति दिल्लीपर्यंत पोंचली होती व म्हणून त्यांना 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन मंडळ' ह्या सरकारी संस्थेचे अधिकारी म्हणून नेण्यांत आलें. १९४६ सालीं भारताच्या शिक्षण खात्यानें त्यांना क्यूरेटर म्हणून घेतलें. १९४७ मध्ये कलकत्त्याच्या इंपीरियल लायब्ररीचें राष्ट्रीय ग्रंथालयांत रूपांतर व नामांतर करण्यांत आलें. खंडित भारतांतून तेथले जुने ग्रंथपाल देशांतरीं म्हणजे पाकिस्तानांत गेले. गेल्या महायुद्ध काळांत इंपीरियल लायब्ररीची वाढ व सुरक्षितता यांसाठी दोन तीन ठिकाणीं स्थलांतरें व विभागांतरें झाल्यानें विस्कळितपणा आलेला होता. भारताचे शेवटचे गव्हर्नर जनरल नामदार

राजेगोपालाचार्य यांनीं त्या ग्रंथालयाची जागेची गरज पाहून कलकत्त्याच्या अलिपूर या भागांतील जुना व्हाइसरॉयचा राजवाडा या ग्रंथालयाला दिला. १९४८ सालीं श्री. केशवन् यांची त्या ग्रंथालयाला खरें खुरें राष्ट्रीय ग्रंथालय म्हणून सजविण्यासाठी नेमणूक करण्यांत आली. तेथपासून १९६३ च्या आरंभापावेतों ते तेथें होते. या काळांतला त्या ग्रंथालयाचा इतिहास म्हणजे केशवन् यांच्या एकतान जीवनक्रमाची दैनंदिनीच आहे. सुरुवातीला या ग्रंथालयाचे कार्यविभाग फक्त तीनचार होते. आज सुमारें वीस मोठेमोठे नि बहुशः स्वतंत्र प्रत्येकांतल्या कार्यभारानुसार करण्यांत आले आहेत. मिळालेली राजवाड्याची जागा अपुरी झाल्यानें दीडदोन लाख पुस्तकें सामावणारा जोड लागूनच उभा करण्यांत आला आहे. पूर्वी त्यांत फक्त पाऊणशें सेवक होते. आज चारशें झाले आहेत. त्यांपैकी दीडशेंवर ग्रंथपालनमान्यता-पत्रधारी आहेत. भारताच्या राष्ट्रीय ग्रंथसूचीचें काम तेथेंच चालू आहे. या सूचींतील मराठी विभागाचा अधिकारी म्हणून त्यांनीं माझी निवड १९५५ सालीं केली होती. परंतु त्यावेळीं कमाल मूळ वेतनश्रेणी फक्त ३३० ची असल्यानें मी त्यांचा त्या वेतनश्रेणींतच शक्य त्या वाढींचा देकार स्वीकारला नाहीं. आज त्या कामासाठीं त्यांनीं मुंबईहून मुद्दाम मागणी करून प्रा. प्रियोळकरांचे एक विद्यार्थी त्या जागीं प्रस्थापित केले आहेत. त्यांची कमाल वेतनश्रेणी साडेआठशेची आहे. या माझ्या निवडीच्या वेळीं केशवन् यांच्या ठायीं मला प्रा. नारळकर यांची योजकता व तळमळ स्पष्ट दिसून आली. रु. ३३० ची बरीच वाढ करण्यासंबंधांत त्यांचीं त्यांच्या वरिष्ठाकडे बोलणीं चालू असल्याचें त्यांनीं सांगितलें. रु. ३३० च्या जोडीला अन्य कांहीं योग्य भरपाई करणारें कामहि माझ्यासाठीं योजल्याचें ते म्हणाले. कलकत्त्यांतील जागेची टंचाई व महागाई दूर करण्याविषयींहि योजना शिजवीत असल्याचें ते पुनःपुन्हां बोलले. एकूण प्रयत्न असा होता कीं हवा असलेला मनुष्य यावा व आल्यावर रमावा. राज्यदप्तरखाना अधिकारी डॉ पु. म. जोशी यांच्या ठायीं ही सहानुभूति व योजकता मला आढळली. प्रा. नारळकरांची हीच रीत होती. शिवाय "सुरू केलेलीं मोठालीं कामें, आखलेले संकल्प, हातीं घेतलें तें तें तडीस नेण्याची समर्थता असणाऱ्या हातगुणाचे" प्रा. नारळकर यांच्यासारखेच श्री. केशवन् आहेत हें कालक्रमांत सर्वांच्या प्रत्ययास

आलें आहे. त्या ग्रंथालयांतील सर्वच सेवकांच्या वेतनश्रेण्या त्यांनीं संतोषदायी रीतीनें सुधारल्या आहेत. 'वेल्व्हेडियर' राजवाड्याच्या आवारांतील मोकळ्या माळजागेंत अनेक उंच रुंद रहात्या इमारती त्यांनीं बांधवून भारताच्या अन्य सर्व प्रांतांतून जाणाऱ्या सहकाऱ्यांची अत्यंत कमी भाड्यांत आरामानें रहाण्याची सोय केली आहे. सर्व सेवक तेथें आपोआप रमून एकजीव होऊन गेले आहेत. हें त्यांनीं केलें नसतें तर? भारताच्या विविधभाषी प्रांतांतून कलकत्त्यास दूरवर हवे असणारे अधिकारी मिळाले नसते. भारतांत असणाऱ्या सर्व भाषांचीं मुद्रितें भारत सरकारच्या नियमान्वयें तेथे पोंच होत आहेत. आणि त्यांचें सर्व पद्धतशीर ग्रंथालयीन काम तेथे होत आहे. त्यांचें संग्रहण व संरक्षण करण्याप्रमाणेंच त्यांची पद्धतशीर सूचीहि तेथे होत असते. श्री. शंकर गणेश दाते यांनीं १८०० ते १९५० अखेरची मराठी ग्रंथाची सूची केली आहे. म्हणून १९५० पुढचें काम कलकत्त्यांत करण्याचा संकल्प आहे. १९५८ पासूनचें काम प्रत्यक्षतः करण्यांतहि आलें आहे. महाराष्ट्र राज्यांतील छापखान्यांकडून मराठी मुद्रितें पुण्यांत असलेल्या महाराष्ट्र ग्रंथालयाकडे संग्रहप्रती म्हणून राज्य सरकारच्या नियमान्वयें पोंच होत असतात. त्याप्रमाणेंच सर्व भारतांतील सर्व राज्यांमधील मुद्रणालयांनीं छापलेलें प्रत्येक पुस्तक वा त्याचा अंश कलकत्त्यास पोंच करावें असा भारत सरकारनें नियम केला आहे. त्या नियमान्वयें तेथे भारतांतील सर्व भाषांचे संग्रह पद्धतशीर स्थानांकित होत आहेत. ह्या प्रचंड राष्ट्रीय कार्यांत राष्ट्रीय अस्मिता आहे. तिची शानदार घडी श्री. केशवन् यांनीं घालून दिली आहे. या प्रचंड, भव्य कार्याकरतांच जणू ते जन्मले आहेत असें त्यांचें राष्ट्रीय ग्रंथपाल या नात्याचें अजोड काम पाहून प्रत्येकास वाटतें. आज त्यांस दिल्लीस इंस्डॉक या विज्ञान व तंत्रविषयक ग्रंथालयाचे सर्वाधिकारी म्हणून १९६३ पासून भारत सरकारनें नेलें आहे.

केशवन् हे बहुशिक्षित, बहुश्रुत, बहुभाषिक आहेत. कानडी, तमीळ व तेलगू या बालपणीं सभोवार असणाऱ्या तीन भाषांप्रमाणेंच त्यांस संस्कृत व इंग्रजी या भाषाहि उत्तम प्रकारें येतात. हिंदी, मराठी, गुजराती व बंगाली यांचा व्यवहारापुरताच ते उपयोग करूं शकतात. या बहुविध भाषाज्ञानाचा व त्यायोगें प्राप्त झालेल्या विविध मानवस्वभावज्ञानाचा त्यांस दैनंदिन व्यवहारांत अतिशय उपयोग होतो. ग्रंथालयाच्या प्रशासनांत, असंख्यविध संकल्प पुरे करून घेण्यासाठी

पुऱ्या करावयाच्या व उसंत न मिळू देणाऱ्या बारीकसारीक भेटी–गाठी–पत्र-व्यवहारांत ते मग्न असतांनाच कोणीहि, सामान्यांपासून असामान्यांपर्यंत येऊन भेटीचा हक्क बजावीत. कधी कोणी अठरा वर्षांची वंगकन्यका भाबड्या निर्भीड-पणें "तुमच्या इथे 'मानेवर शत्रु नारी' नाहीं ? ही कसली नॅशनल लाय-ब्ररी ?" असले प्रश्न करीत आली तर तिच्याच शब्दांत व आविर्भावांत ते तिला उगी करीत. निवृत्तिवेतन घेणारा कोणी जुनाट सरकारी नोकरी–निवृत्त एखाद्या जुन्या गॅझेट अंकाच्या पानाची पृच्छा करीत येई. राज्याचे सर्वोच्च न्यायाधीश कांहीं वेंचक संदर्भ शोधीत त्यांच्याकडे वळत. अशा सर्वांची तत्परतेनें व निरपवाद-पणें प्रतिष्ठा संभाळून त्यांस ते मार्गस्थ करीत. सामान्य सेवक व सहकारी यांच्याशीं ते अगदी सहानुभूतीनें व स्नेहानें वागतात. कोणा सेवकाच्या घरीं जन्मविषयक वा जीवनसमाप्तीविषयक कामगिरी निघेल तर गरज पडल्यास ते त्या सेवकाच्या कुटुंबांतलेच एक होऊन वागतात. यामुळे ते सहकारी–साहाय्यक–सेवकांचे मित्रच बनून गेलेले दिसतात. या राष्ट्रीय ग्रंथालयाला त्यांनीं भारत सरकारच्या अनंत हातांनीं सर्व समृद्ध बनविलें आहे व त्याचे ते अष्टपैलू ग्रंथपाल म्हणून सुविख्यात झाले आहेत. त्यांची चतुरस्र पात्रता ध्यानांत घेऊन माजी राष्ट्रपति नामदार राजेंद्रप्रसाद यांनीं त्यांना १९६१ मध्ये पद्मश्री पदवी दिली. ती निवड अचूक होती. ग्रंथपालनाचा दर्जा तीमुळे उंचावला. आम्हा ग्रंथपालांना फार आनंद वाटला. मी त्यांचें तत्काल अभिनंदन केलें—

नमः श्रीकेशवेभ्योऽस्तु । सानंदं चाभिनंदनम् ।।
'पद्मश्री' पदवीप्राप्त्या । भूषितं ग्रंथपालनम् ।।

* * *

[या शब्दचित्राकामीं कलकत्त्यास असणारे राष्ट्रीय ग्रंथालयांतील संस्कृत सूची विभागाचे संपादक श्री. ना. बा. मराठे यांचें साह्य घेतलें आहे.]

# १०. आमच्या ग्रंथालयाचे कनिष्ठ सेवक—

## कर्मण्येवाधिकारी कुलकर्णी

स्वातंत्र्य मिळण्याचे वारे वाहूं लागले असतांना आमच्या ग्रंथालयाची स्थापना झाली. त्या घडीपालटाच्या काळांत अनेक गोष्टींची मूल्यें बदलूं लागलीं. या बदलांची छाया अधिकारी आणि सहकारी यांच्या संबंधावरहि पडली. मग ते सेवक—सहकारी वरिष्ठ असोत कीं कनिष्ठ असोत. सहकाऱ्यांनाहि दर्जा आहे ही गोष्ट वरपासूनचे अधिकारी ध्यानांत घेऊं लागले. ध्यानांत न घेणाऱ्यांसाठी सरकारनें आज्ञापत्रेंहि काढलीं होतीं. आमच्या कचेरींत म्हणजे ग्रंथालयांत सगळाच जमाना नव्यानेंच थाटावयाचा असल्यानें या बाबतींत आमच्यापुरती आम्ही सर्वांनीं सुधारणा अंमलांत आणली. 'शिपाई' या शब्दाऐवजीं 'कनिष्ठ सहकारी' हा शब्द आम्ही वापरूं लागलो. 'अरे बाबू', 'अरे जगन्नाथ' किंवा 'अरे कुलकर्णी' अशा एकेरी हाकेऐवजीं 'अहो बाबूराव', 'अहो कुलकर्णी, असें त्यांना आम्ही सगळे संबोधूं लागलो.

परंतु या बदललेल्या घडीची जाणीव नसणाऱ्या त्या जीवांना 'अहो' च्या हाकेनें बुजल्यासारखें होई. आधींच्या सेवास्थळीं 'अरे जारे' वगैरे अरेरावीची नि आरड्याओरड्याची भाषा होती. नवा पालट कां झाला, तो बरा कीं वाईट हेंहि त्यांना लौकर उमगलें नाहीं. 'अहो'मुळे आपल्या सदऱ्याची गळपट्टी म्हणजे कॉलर वर उभी करण्याइतके ते चढलेहि नाहींत. उलट आमच्या कुळकर्ण्यांनीं तर मला चारदोनदा सांगूनहि पाहिलें कीं, "साहेब, मला 'अहो' नका म्हणूं. तें कानाला नीट लागत नाहीं नि व्यवहारांतहि बसणारं नाहीं." पण

याकडे दुर्लक्ष करून ती प्रथा आम्ही इतरांनीं पाडलीच. शिवाय आमचे कुलकर्णी आम्हा सर्वांहूनहि वयानें वडील आहेत. ह्या समर्थनानें त्यांची कशी तरी समजूत घातली.

कचेरीची सुव्यवस्था ही तेथल्या वरिष्ठांपेक्षा सहकाऱ्यांच्या—विशेषानें साध्या सेवकांच्या नेकीवर खरोखरी अवलंबून असते. पण होतें काय कीं, सुव्यवस्थेचें श्रेय वरिष्ठांच्या गळ्यांत कौस्तुभासारखें लटकतें नि गैरव्यवस्थेचें खापर कनिष्ठांच्या डोक्यावर फुटतें. वास्तविक ह्या दोन्ही प्रकारच्या व्यवस्थेंत एकजात सर्वांचाच वाटा असतो. पण हें लक्षांत न घेण्याची प्रवृत्तीच आढळते. कचेरी स्वच्छ नेटकी असणें, तेथल्या एकूण वस्तू सदैव जेथल्या तेथें रहाणें, कामापुरत्या त्या वस्तू त्यांच्या जागेबाहेर निघाल्यावर काम संपतांच त्या परत आपल्या जागच्या जागीं जाऊन बसणें म्हणजेच कचेरीची सर्व सोय नि सुव्यवस्था रहाणें हा अनुभव, जर कनिष्ठ सहकारी विश्वासू आणि कामसू असले तरच येतो. असा हा अनुभव आमच्या कचेरींत म्हणजे ग्रंथालयांत नित्य निरंतर मूर्तिमंत मिळतो. कारण आमचे कुळकर्णी आपल्या स्वतःच्या तसेच त्यांच्याहि कनिष्ठांकडून ठरलेल्या गोष्टी करून घेण्याच्या कामांत सतत दक्ष असतात.

आमचें ग्रंथालय सर्वजनांकरतां आहे. म्हणजेच मुक्तद्वार प्रकारांतलें आहे. सर्वजनांच्या सोईसाठी त्याची वेळ सकाळसायंकाळ मिळून दिवसांतून दोनदा म्हणजे अन्य सर्व कचेऱ्यांच्या अगदी उलट आणि आडनिडी आहे. येथल्या वेगवेगळ्या विभागांतून भरपूर उजेड नि खेळती हवा हवी म्हणून अगदी फाल्गुनरावाचीं सतरा दारें नि तेहतीस खिडक्या इथे नसल्या तरी बऱ्याच खिडक्या नि दारें आहेत. दोनहि वेळा ह्या सर्व खिडक्या नि दारें न चुकता उघडणें नि मिटणें भाग आहे. 'आव जाव घर तुम्हारा' असलें आमचें हें सदावर्त असल्यामुळे रोज किमान पांचशें बाळगोपाळ, स्त्रिया—पुरुष, वृद्ध-तरुण सगळे मिळून अनेक चालींचे, अनेक रीतींचे, अनेक गरजांचे अनेक सवयींचे वाचक अभ्यासक विविध विभागांतून पायधूळ झाडीत येतात नि जातात. त्यांच्या वर्दळीनें कमी नाहीं तरी रोज किलोकिलो धूळ वगैरे इतस्ततः मिळून पडते. वाचकांसाठी सकाळीं आठ वाजता, उन्हाळ्यांत तर साडेसात वाजतांच म्हणजेच बरेंच लौकर आणि थंडींत ऐन कडाक्यांतहि, ग्रंथालय उघडायचें असतें. तें

खुलें करण्याआधीं ही सर्व धूळ गोळा करून फेकून द्यावी लागते. खुर्च्या-टेबलें वगैरे सर्व बैठकीच्या जागा झटकाव्या लागतात. सर्व दारें नि खिडक्याहि खोलाव्या लागतात. पिण्याचें पाणी भरावें लागतें. जुने काढून त्यांच्या जागीं नवे अंक ठेवावे लागतात. यासाठीं कुळकर्ण्यांना आपल्या घरून सहाच्या सुमारासच बाहेर पडून झपझप चालूं लागावें लागतें. दुपारीं मध्यान्हीस ग्रंथालय बंद करावयाचें म्हणजे पुन्हां सर्व दारें खिडक्या मिटायच्या. तें करून ते साडेबारानंतर घरीं पोचत असावे. त्यानंतर परत संध्याकाळीं चार वाजतां ग्रंथालय उघडायचें म्हणून दुपारीं तीनलाच ते माझ्याकडून किल्ल्या घेऊन जातात. रात्रीं सव्वा आठच्या सुमारास सुटल्यावर ते पावणेनऊ नऊपर्यंत घरीं पोचत असावे. एकूण सकाळीं सहा ते रात्रीं साडेआठ नऊ, मध्यंतरीं फक्त १२॥ ते २॥ हे दोन तास सोडून त्यांचा सर्व वेळ, केवळ ग्रंथालयासाठींच बांधलेला असतो. त्यांचा हा इतका वेळ ग्रंथालयाकामींच द्यावा लागत असल्यामुळें घरांत चार शब्द निवांतपणें बोलायला किंवा हौस म्हणून बायकोमुलांसह मोकळेपणानें फिरायला जायला त्यांना केव्हां वेळ मिळत असेल तो असो. पण त्यांना तसे मोकळे असलेले कुणीच पाहिलेले नसणार. मुक्तद्वार ग्रंथालयांतील सर्व जनांच्या सोईच्या या वेळाच अशा आहेत कीं सांजसकाळच्या सोनेरी वेळांमध्ये ग्रंथालयसेवकांना सर्वसामान्यांच्या जगांत मोकळें फिरणें अगदी अशक्य व्हावें.

आजवर ग्रंथालयें म्हणून जीं ओळखलीं गेलीं तीं फक्त वर्गणीचीं व महाविद्यालयांचीं. मुक्तद्वार सार्वजनिक ग्रंथालय हा प्रकार अगदीं अलिकडे गेल्या सोळा अठरा वर्षांतच आपल्याइकडे सुरू झाला आहे. हीं ग्रंथालयें सुरू होतांना प्रथमारंभीं 'लोकांची सोय, ग्रंथालयीन ध्येयें उद्दिष्टं, संदर्भग्राह्य, मुक्तद्वार प्रवेश' यांच्याच उद्घोषांत कामाचा श्रीगणेशा झाला. आतां दीड तप होत आलें. या संपलेल्या कालावधींत या सर्व उच्च घोषांनुसार कामें करतां करतां माझ्याहूनहि वयानें जास्त असलेले आमचे कुलकर्णी थकले आहेत. त्यांचे पाय तिरके पडूं लागले आहेत. हात कापूं लागले आहेत. डोळे लक्ष जुळवण्यासाठी लहान मोठे होऊं लागले आहेत. कानामागे तळहाताची भिंत द्यावी लागते. दात मधून मधून ठणकतात. गुडघे दुखतात. जिन्यांच्या चढ उतारानें धाप लागते. तारुण्य संपेपावेतोंच्या जोमांत

असतांना घरामध्ये कालक्रमानें पांच–चार लहानगीं अवतीर्ण झालेलीं आहेत. हा तसा मोठा नाहीं, पण सहासातांचा संसार आहे. कालमानानुसारच्य योजनाबद्धतेकडे कुळकर्ण्यांनीं लक्ष दिलेलें असल्यामुळेंच याहून जास्त पसार त्यांच्या संसारांत झालेला नाहीं. पण जो आहे त्याचीच चिंता त्यांना ग्रासून राहिली आहे. कालक्रमांत हें सर्व वाढलें. त्यांचें वय वाढलें. वरचीं खर्चाचीं तोंडें वाढलीं. नोकरीचीं वर्षें वाढलीं नि संपतसुद्धा आलीं. सेवास्थानांतलें सर्वच काम वाढलें. तें तर कधींहि न संपणारें आहे. पण कुलकर्णी मात्र होते तिथेंच आहेत! नव्हे, क्रमशः थकत आहेत.

केवळ 'लोकांची सोय, ग्रंथालयीन ध्येयें–उद्दिष्टें, संदर्भ–साह्य, मुक्तद्वार प्रवेश' यांच्या गदारोळांत फक्त 'लोकांचें वाचन, मुक्तद्वार पद्धति नि जास्तींत जास्त वेळ सोय' यांचाच विचार सर्व जाणत्यांकडून झाला. ग्रंथालयीन ध्येयें व उद्दिष्टें म्हणून जीं म्हणावयाचीं त्यांमध्यें ग्रंथालयाचें स्थळ, सामग्री, सेवक–त्यांची संख्या–शिक्षण–वेतन, त्यांच्या सुट्या व रजा, त्यांचें कार्यक्षम वयांतील व निवृत्तीनंतरच्या काळांतील स्वास्थ्य इत्यादींचाहि अवश्यमेव समावेश होतो. पण या महत्त्वाच्या गोष्टींचाच कांहींहि विचार झाला नाहीं. याबाबतींमध्यें आरंभ म्हणून जें जें एकवार सुरू झालें त्यांत वाढ अशी कांहींच झाली नाहीं. पण खरें म्हणावयाचें तर तो आरंभ म्हणूनसुद्धां कांहीं उच्चारावें असें कांहींच नव्हतें. कारण त्याबाबतींत बहुशः सगळेच ठार नेणते होते. आणि तेच विचार करणारे नि जाणते म्हणून पुढें झाले–घेतले गेले होते!

ज्या थोड्यांचें याकडे लक्ष गेलें ते ग्रंथालयांतले गरीब बापडे सेवकच होते. त्यांनीं याचा उच्चार केला तर त्यांच्यांत त्यागबुद्धि नि सेवावृत्ति नाहीं असें म्हटलें जाई. अद्यापीहि म्हटलें जातें आहे. मात्र हें असें म्हणणारे त्यांच्या त्यांच्या कचेऱ्यांतून या गोष्टींसाठींच युक्तीप्रयुक्तीनें झटत-झगडत असतात. त्या इतर कचेऱ्यांतील सेवकांची संख्या शेकड्यांच्या–सहस्रांच्या पाढ्यांत असल्यानें त्यांचें झगडे व संप अर्थातच अनुकूल फलदायी होतात. पण खुद्द ग्रंथालयें नि त्यांमधले सेवक यांची संख्या फार कमी आहे. त्यामुळें ज्या पद्धतीमुळें ग्रंथालयाची सोय सर्वजनांना मिळाली आहे, तीमध्यें ग्रंथालयसेवक अजूनहि दुर्लक्षितच राहिले आहेत. त्यांचा आवाज मुळांतच निघत नाहीं आणि निघालाच तर तो चिरडण्याकडेच इतकीं वर्षें लक्ष होतें. परंतु तरीहि अलिकडे त्यांचा आवाज

थोडा थोडा उठूं लागला यामुळेंच आतां ग्रंथालय कायदा आकार घेत आहे.

आमच्या कुलकर्ण्यांनीं आतां वय बावन्नत्रेपन्नपर्यंत आपलें काम अत्यंत चोखपणानें व नेकीनें रेटलें आहे. काम खूप वाढलें आहे, साचत राहिलें आहे. तरीहि हवी ती मदत त्यांना मिळालेली नाहीं. याहि स्थितींत कांहीं हुरूप दाखवावा व कामांत भोळ्या चिकाटीनें व कांहीं भावी बऱ्याच्या आशेनें राबत रहावें अशीहि परिस्थिति कायम नि खात्रीची नाहीं. कारण वेतनें हर्षामर्षादींच्या लहरींवर आधारल्याचें दिसतें. त्यांविषयीं नियम व नीतीहि कांहीं नाहीं. त्यामुळें बढतीऐवजी कपातीचेहि प्रसंग नि प्रसाद बाधल्याची उदाहरणें आहेत. कारण अनेक बाबतींत वेतनादींचे लेखी पक्के ठरावच नाहींत. कित्येकदां ते तोंडीच असतात. तोंडीच जे झाले त्यांत तोंडोतोंडींच फेरफार घडूं शकतात. कारण सार्वजनिक समजल्या जाणाऱ्या संस्थांमध्यें ठरीव कालक्रमानें निवडणुका होतात. चेहरे बदलतात. मोहरे पालटतात. ' कर्मीत कमी पैशांत जास्तींत जास्त लोकसेवा ' या ध्येयावरच भर दिला जातो. त्याचा दरसाल नवा उच्चार नव्या दमानें व जोमानें होतो. यामुळें सेवकांची संख्या व त्यांच्या सोयी—सवलती वाढत नाहींत. आश्वासित असलेल्यासुद्धां प्रत्यक्षांत क्वचित्‌हि दिसत नाहींत. उलट लोकांची जास्तजास्त सेवा करण्याच्या जोरदार विचारप्रवाहाच्या लाटेंत नि सपाट्यांत इतर सार्वजनिक सोयीसाठीं सेवकांच्याच संख्येंत कपात घडते. यामुळें साध्या किरकोळ रजासुद्धां निर्वेधपणें उपभोगण्याचें भाग्य कुलकर्ण्यांना आणि त्यांच्यासारख्या इतरांना लाभत नाहीं. मग ' हक्काची रजा ' हा शब्द कोठला ? तो उच्चारण्याचाच मुळांत त्यांना कोणालाहि हक्क नाहीं. नियत वेतनादि सेवानियमांची ही कथा ! मग निवृत्तिकालाचें काय बोलावें ? तीं अक्षरें फारच झालें तर कागदावर उतरलीं जातात नि ते कागद वाऱ्यावर नि कालप्रवाहांत अनियंत्रितपणें सोडले जातात. यावर कोणाचाच इलाज नाहीं. सेवकांचा तर नाहींच. पण सरकारच्या संबंधितांचाहि नाहीं. म्हणून तर या मुक्तद्वारांना दीडतप होत आलें पण तरीहि सर्व कांहीं होतें तेथेंच नि तसेंच जुन्या जमान्याच्या निरंकुशपणें आधीन राहिलेलें आहे. या सर्वांचा परिणाम म्हणूनच कुळकर्णी अलिकडे झपाट्यानें थकूं लागलेले मी पाहातो आहे. भीति आणि निराशा या अटळपणें सांसर्गिक आहेत. जीवनांतील ही अशी तीव्र निराशा व कुटुंबांतील

जिवलगांच्या भवितव्याविषयींची निरुपायाची स्थिति यांनीं त्यांना ग्रासलें आहे.

कुळकर्ण्यांनीं शंभर टक्के इमानानें येथें काम केलेलें आहे. अगदीं सुरुवातीपासून ते येथें असल्यामुळें त्यांना येथली सर्व खडान् खडा माहिती आहे. प्रथम कामाचा केवढा डोंगर होता, तो आटपतो तोंच आणखी व्याप कसकसे आले, ते कोणी उभे केले, किती प्रशासक आले नि गेले, त्यांतील प्रत्येकानें कोणाकोणाला शासन केलें, कोणावर मेहेरनजर केली, कोणी खळबळ उडविणारें शेलकें काम केलें, त्या कामांचा उपसर्ग जाग्यावर असणारांना नि बसलेल्यांना किती झाला, समारंभ–निवडणुका–वादंगें यांचे पसारे कसे पार पडले इत्यादि एक ना दोन असंख्य प्रसंग नि पेच, प्रकृती नि पर्यवसानें त्यांनीं जवळून पाहिलीं–अनुभविलीं आहेत. कोणी नवा सहकारी आला कीं त्याला अचूक शब्दांत कुळकर्णीच सर्व ओळख करून देतात. ग्रंथालयांतील सामानसुमान व वाचकमंडळी यांची तर त्यांना तळहाताप्रमाणें माहिती आहे. तीहि ते मार्मिकपणें देतात. आमचें ग्रंथालय वाचकांनीं सदैव भरलेलें असतें. त्यांमध्यें हातचलाखी करणारे असतात. दुसऱ्यांच्या हक्कांवर अतिक्रमण करणारे असतात. कांगाव्यानें तक्रारी करणारे असतात. निनांवानें किंवा टोपणनांवानें कुचाळक्या करणारेहि आढळतात. या उपद्रवी मानवांप्रमाणेंच उंदीर, कावळे, पारवे, डास, ढेकूण, झुरळें हे मानवेतर प्राणीहि ग्रंथालयांत वस्ती करूं पाहातात. गैरशिस्त वाचकांना कुळकर्ण्यांनीं आपल्या कडक पहाऱ्यामुळें उत्तम शिस्त लावून टाकली आहे. कोणाचाहि कोणालाहि हस्तपादस्पर्शच काय, नुसता नेत्रस्पर्शहि क्वचितच होत असेल. एवढी जरब त्यांनीं याविषयीं निर्माण करून ठेवलेली आहे. निरुपद्रवी व अभ्यासाचे निदिध्यासी असणाऱ्या वाचकाभ्यासकांना कालिकांचे अगणित जुने अंक व फायली संदर्भार्थ निरलसपणें देऊन त्यांचे ठायीं स्वतःविषयीं त्यांनीं आदर नि स्नेह निर्मिलेला आहे.असंख्यांच्या विसरलेल्या वस्तू निरपवादपणें त्यांचे मालक शोधून काढून त्यांना परत दिल्या आहेत. त्यामुळे शिस्तपालनाकामीं त्यांच्या शब्दाला कोणीहि आव्हान देत नाहीं. उंदीर वगैरेंच्या राहुट्या त्यांनीं पार मोडून टाकल्या आहेत. डास, ढेकूण नि बागुडयांवर सतत डी. डी. टी फवारलें आहे. झोपेच्या दृष्टीनें आमच्या येथल्या खुर्च्या विनचावऱ्या आहेत. परंतु तरीहि तेथे कुळकर्ण्यांच्या दक्ष नजरेपुढें झोप मात्र कोणीहि घेऊं शकत

नाहीं. एवढ्या मोठ्या धबडग्यांत खुर्च्याटेबलांमधल्या फटींतील चुका बाहेर डोकावूं पाहातात. पण कुळकर्ण्यांच्या हातांतल्या जबरदस्त हातोड्यापुढें त्या डोकें वर करण्यास धजत नाहींत.

आमच्या ग्रंथालयांत प्रथमारंभीं जो देणगीनें मिळालेला संग्रह भरण्यांत आला तो वर्षानुवर्षे केवळ पडलेला होता. त्यांतील अक्षरशः हजारों पुस्तकांना कुळकर्ण्यांच्या हातानें डागडुजी झालेली आहे. ती जर त्यांनीं केली नसती तर एव्हांना त्या जराजीर्ण पर्णांचा चुराच उरला असता.

हो, पर्णांच्या चुऱ्यावरून आठवण झाली. सकाळीं ग्रंथालय सुटल्याची घंटा होऊन वाचक मार्गस्थ झाले नि नंतरच्या पांचदहा मिनिटांतली आवराआवर संपली कीं कांहीं क्षणच कपाटांनीं बंदिस्त झालेल्या कोठल्या तरी कोपऱ्यांत उभे राहून आपल्या हातावर तंबाखूचीं पर्णें चुरून त्यांची लज्जत घेण्याची कुळकर्णी तजवीज करतात. नि मग पुनरपि त्यांच्या कधींहि न संपणाऱ्या कामाकडे ते वळतात. त्यांना विश्रांति घेण्यासारखी तशी मोकळी जागाच येथे नाहीं. ' कमींत कमी खर्चांत म्हणजे कमींत कमी भाड्यांत मिळवलेली जागा, कमींत कमी वेतनखर्च नि त्यावर अवलंबित तुटपुंजी सेवकसंख्या आणि कमींत कमी साधनसामग्री यांमध्यें जास्तींत जास्त लोकसंख्येची, जास्तींत जास्त कार्यक्षमतेची व जास्तींत जास्त मुक्तद्वार सोय करणें, हेंच ग्रंथालयीन ध्येय धोरण आहे.

हें आमच्या कुळकर्ण्यांचे चित्र प्रातिनिधिक आहे. अनेक ठिकाणीं आराम टाकून कामांत गुंतणारे गंगाराम–बाळाराम आहेत. तोंडपाटिलकीचा स्पर्श न होऊं देतां काम उरकणारे पाटील आहेत. अक्षरशः एका पायावर चालून तयार राहाणारे पांगळ आहेत. आळके आहेत. त्या सर्वांची स्थिति बहुशानें समान आहे. भविष्याची काळजी तर दूरच. प्राप्त काळचें जें मिळेल ह्यांतच ते चूर आहेत.

★ ★ ★

१३८१०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थिरप्रत.
अनुक्रम ३६८७८ वि: धार्मि
क्रमांक १२७४ नों: दि: ३/५/७५